रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३० जुलै २०२३




# काँग्रेस, विरोधी पक्षांकडून संसद वेठीला ?

भारताच्या इशान्य भागात मणिपूर हे राज्य आहे. ब्रिटीश साम्राज्याच्या काळात मणिपूर संस्थान होते. या संस्थाचे राजे बुधचंद्र (१९१७- १९३९) हा कार्यकाळ होता. तेथील लोकांनी लोकशाहीसाठी संस्थानवर दवाब आणला. दुसऱ्या महायुध्दानंतर वाटाघाटी झाल्या व राजाने भारतात येण्यास मान्यता दिली. १९४२ मध्ये जपानी हल्लखोरांनी राजधानी इम्फालवर हल्ला केला होता. तेंव्हा तेथील लोकांनी मोठ्या प्रमाणात पलायन केलेले होते. त्यावेळी राज्यात पहिल्यांदा तिरंगा ध्वज फडकविला होता. तेंव्हा नेताजी सुभाषचंद्र बोस यांची भारतीय राष्ट्रीय सेनाने हल्लेखोरांचा मुकाबला केला.नंतर २१सप्टेंबर १९४९ मध्ये राजा बुध्दचंद्र यांनी भारताच्या विलिनीकरणावर स्वाक्षरी केली. तेंव्हापासून मणिपूर भारताचे राज्य झाले आहे. केंद्राने हे राज्य केंद्रशासित केले गेले. त्यासही मणिपूर जनतेचा तीव्र विरोध होता. या राज्याची लोकसंख्या सुमारे ३५ लाखपास आहे. राज्यात मैतई, नागा, आणि कुकी समाजाचे या तीन समाजाची संख्या अधिक आहे. मैतई समाजात हिंदू. तर नागा व कुकी समाजात खिश्चन आहेत. हा समाज इम्फाल खोरे व डोंगरी भागात राहतात. हिंदू व खिश्चन या दोन समाजात संघर्ष आहे. मैतई समाजाची संख्या ५३ टक्के आहे. राज्यात हिंसाचारात २००९- २०१८ पर्यंत एक हजाराच्यावर लोकांचा बळी गेला आहे. मैतई समाजाला अनुसूचित जातीचा दर्जा हवा आहे. या मागणीसाठी कित्येक वर्षापासून तेथे संघर्ष सुरू आहे. मणिपूर राज्याची स्थापना १९६३ मध्ये झाली. तेंव्हापासून एकूण बारा मुख्यमंत्री झाले. यात ६० पैकी ४० आमदार मैतई समाजाचे आहेत. राज्यात काँग्रेस पक्ष अनेक वर्षे सत्तेत होता. पण काँग्रेस सरकार मैतूई समाजाचा आरक्षणाचा प्रश्न सोडवू शकला नाही. राज्यात समाजात विविध कारणावरुन संघर्ष, हल्ले, हत्या होत गेल्या. यात १९९३ मध्ये हिंसक हल्यात १५० वर जवान व अधिकारी मृत्त पावले आहे.तत्कालिन पहिले पंतप्रधान पं.नेहरू १९५८ मणिपूरला गेले होते. तेव्हा या राज्यात सशस्त्र बळ अधिनियम लागू केला गेला. तेंव्हापासून मणिपूर जळतोय! तेंव्हा ही समस्या जुनी आहे. राज्यात सशस्त्र संघटना कार्यरत आहेत. केंद्रातील काँग्रेस सरकार छोटे राज्य म्हणून समाजाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले.त्याचे परिणाम आज मणिपूरचा भोगतो आहे. राज्यात २०२२ मध्ये भाजपाचे एन. बिरेनसिंह मुख्यमंत्री आहेत.या राज्याच्या निवडणुकीनंतर काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी तर 'मणिपूर हे छोटे राज्य आहे, तेंव्हा फारसे लक्ष देण्याची गरज नाही, असे म्हणाले होते. आता या राज्यात भाजपाचे सरकार आहे,हेच गांधी परिवाराचे व काँग्रसचे दुःख आहे. त्यांना देशातील महिला अत्याचाराची चिंता नाही. देशात काँग्रेसच्या मानसिकतेमुळे पूर्वोत्तर राज्यात, इशान्य राज्यात तसेच जम्मू व काश्मीर समस्या निर्माण झालेले आहेत. हे काँग्रेसचे पाप आहे.काँग्रेस राज्यातील हिंसाचार व महिला अत्याचारावरुन मोदी व भाजपाला बदनाम करुन सहानुभूती मिळवण्यासाठी राजकारण करत आहे. मणिपूरची घटना राजकीय प्रेरित नाही.तेथे दोन समाजातील संघर्षातून घडत आहे.त्यात महिला अत्याचाराची घटना अतिशय निंदनीय आहे. विरोधी पक्ष याच घटनेवर लक्ष्य करत आहे.यातही विरोधी पक्ष राजकीय स्वार्थ शोधला आहे. संसदीय नियमाचे धिंडवडे उडवित आहे.राज्यातील आरक्षणावरुन १ एप्रिल २०२३ रोजी मणिपूरच्या उच्च न्यायालयाने मैतई समाजाला अनुसूचित जातीत घेण्याबाबत मणिपूर सरकारला चार आठवड्यात निर्णय घ्यावा, असा निर्देश दिला आहे. न्यायालयाच्या निकालाच्या विरोधात 'ऑल ट्रायबल युनियने' चुराचांदपूर जिल्ह्यातील तोरबंग येथे आदिवासी एकता रॅलीचे आयोजन केले होते. यातून आदिवासी व गैरआदिवासी समाजात संघर्ष सुरू झाला, घरावर हल्ले, जाळपोळ, गोळीबार झाले. यात आतार्यंत १६० जण मृत्यू पावले. महिला अत्याचाराची घटना घडली. या घटनेची संपूर्ण माहिती समोर आलेली नाही. मणिपूरला ७५ दिवसापासून संघर्ष व हिंसाचार चालू आहे,हे,ही खरे आहे! पण हा संघर्ष नवीन नाही, हा रोग जूनाट आहे. त्यावर काँग्रेस सरकारने उपचार का केला नाही ? पण मणिपूर जळतोय ? मोदी काय करता आहेत ? असा प्रश्न विचारला जातोय ? पश्चिम बंगालमध्ये नित्य बाँम्ब स्फोट,हत्या होतात, मग तो जळतोय की नाही ? तेथे विरोधी पक्षाची दातखिळी बसते ! मणिपूरच्या जुनाट रोगावर भाजपा सरकार प्रामाणिक उपचार करत आहे,पण त्याला वेळ लागेल. केंद्रिय गृहमंत्री शहा मणिपूर गेले होते,त्यांनी तेथील प्रशासन, पोलिस यंत्रणा व तिन्ही समाजाच्या लोकांची बैठक घेतली. मोदींनी दिल्लीत मणिपूर घटनेबाबत आढावा घेतला. भाजपा सरकार मणिपूर व पश्चिम बंगाल, राजस्थान या राज्यातील महिला अत्याचारावर नियम १७६ नुसार चर्चा करण्यास तयार होते.पण विरोधी पक्षाने नियम २६७ आग्रह धरला,त्यावरही सरकार चर्चा करण्यास झाले.तरी विरोधी पक्ष चर्चेला तयार होईना! आता नवीन पवित्रा घेतला असून पंतप्रधान मोदींनी प्रथम संसदेत निवेदन देण्याचा हट्ट धरला आहे.तो संसदयीय नियमाला धरुन मुळीच नाही. त्यांना केवळ मोदींना लक्ष्य करवयाचे आहे. मोदी अंहकारी असल्याचे आरोप केला जातोय. तर काँग्रेस, विरोधी पक्ष मोदी व्देषी नाहीत काय ? म्हणे, या विषयावर विरोधी पक्ष आक्रमक झाला असे, नाही, तो आगस्ताळपणा अगावूपणा, करत आहेत. संसदेच्या नियमानुसार राज्यातील घटना व कायदा व सुव्यवस्थेवर संसदेत प्रथम चर्चा होते. त्यानंतर गृहमंत्री उत्तर देत असतात! गृहमंत्री शहा यांनी तर चर्चेची तयारी दर्शविली आहे. विरोधी पक्षाच्या एकजूटीमुळे भाजपा मग विरोधी पक्ष चर्चेला तयार होत नाही. मोदी हे बोलायला घाबरत घाबरला आहे. उलट मोदी पराभूत करण्यासाठी एकमेकाचे वैरी व भ्रष्ट नेते एकत्र येत आहेत. विरोधी पक्ष एकत्रित आल्याशिवाय मोदींचा पराभव करणे अशक्य आहे, असे राहूल गांधी व नितीशकुमार म्हणालेले आहेत. मोदी यांनी सदेत काँग्रेस व विरोधी पक्षाची चीडफाड केली आहे. हे देशाला माहित आहे ? मोदी अविश्वासाच्यावेळी तडाखेबंद उत्तर देतील. यातून विरोधी काय साधले! संसदेत मोदी बोलतील तेंव्हा विरोधी पक्ष पलायन करतील! विरोधी पक्षाने एकजुटीचा प्रयोगासाठी अविश्वास प्रस्ताव आणला आहे. त्यांनी मोदींनी बोलायचे लावून स्वतः पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. मोदी सरकार महिला अत्याचाराचे समर्थन केलेले नाही.जेव्हा देशाचे पंतप्रधान घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त करतात, तेंव्हा ती देशाची भावना असते. याचे विरोधी पक्षाला याचे सामान्य ज्ञान नाही काय ? याचे आश्चर्य वाटते. मोदी सरकार मणिपूर राज्यात शांतता स्थापित प्रयत्न करत आहेत.




कमलाकर जोशी

ज्येष्ठ पत्रकार, नांदेड


संपर्क क्र. 9422170850


> **आधुनिक केसरी**
>
> मणिपूर राज्यात दोन महिलांना विवस्त्र करून धिंड काढण्याची घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला. ही घटना निंदनीय संतापजनक आहे. संसदेत विरोधी पक्ष चर्चा करावयास तयार नाही. तो गोंधळ घालून कामकाज होऊ देत नाही. विरोधकांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची वेध लागले आहेत. यासाठी मोदी सरकारला लक्ष्य करत आहे.देशाचे दुर्देव, असे की विरोधी पक्षाने मणिपूर घटनेच्या चर्चेपासून पळ काढला आहे. आता मोदी सरकारच्या विरोधात अविश्वास ठराव डाव खेळला आहे. त्यांनी या कारणावरून पक्षानी संसदेला वेठीला धरले आहे विरोधी पक्ष दुबळा आहे! तो पक्ष सक्षम नाही, हेच दिसतेय!

यासाठी विरोधी पक्ष सरकारला विधायक सूचना करू शकतो. काँग्रसचे नेते राहूल गांधी मणिपूरला जाऊन आले, मग त्यांनी तेथे जाऊन काय दिवे लावले! त्यामुळे मणीपूर शांत का केले नाही ? ते केवळ आगीत तेल टाकून आले आहेत. संसदेचे अधिवेशन २० जुलै होते. म्हणून एकच दिवस १९ जुलै मणिपूरला दोन महिलेना विविस्त्र घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे! ही घटना ४ मे ची आहे. संसद अधिवेशनापूर्वी अश्या घटना प्रकार प्रसारित होत आल्या आहेत. मग त्यावरुन विरोधी पक्ष त्याचे राजकीय भांडवत करत आला आहे. यामागे रहस्य काय ? यात मणिपूरची येथील महिला अत्याचाराची घटना गंभीर आहे. ती उशीरा देण्यामागे कोणाचे कारस्थान कोणाचे आणि का ? ही घटना लपवून कोणी ठेवली ? या घटनेची संपूर्ण माहिती समोर आलेली नाही मणिपूरचे प्रशासन झोपेले होते काय ? या घटनेचे भारतात तीव्र पडसाद उमटले. पंतप्रधान मोदींनी मणिपूर घटनेवर संताप व्यक्त केला. ही घटना देशासाठी अत्यंत लज्जास्पद आहे. या घटनेबाबत कठोर कारवाईचे आश्वासन दिलेले आहे. त्यावर विरोधी पक्ष समाधानी नाही. वास्तविक महिला अत्याचार घडना कोठेही घडत असेल तर त्याचा विरोध केलाच पाहिजे, ही काँग्रेस व विरोधी पक्षाची भूमिका असावयास पाहिजे. ते महिला अत्याचारात मतभेद करत आहेत. विरोधी पक्षाला महिला अत्याचाराची चिंता मुळीच नाही! जर असती तर विरोधी पक्षाने बंगलोरच्या बैठकीत मणिपूर घटनेचा निषेधाचा व शांततेचे प्रस्ताव का संमत केला नाही ? काँग्रेस व विरोधी पक्षाने संसदेत शांततेचा प्रस्ताव आणलेला नाही. यावरुन काँग्रेस व विरोधी पक्षाचा दुप्पटीपणा दिसतोय. विरोधकांनी संसदेच्या सभागृहाचा राजकीय आखाडा बनविला आहे. या घटनेवर चर्चा करावयाची सोडून ते हैदोस घालत आहेत. संसदेत विचित्र आवाज काढणे, घोषणा देणे, तसेच इतर सदस्य अथवा मंत्री, सभापती असनासमोर फलक धरत आहेत. असे कृत्य करणे, हे संसदेच्या नियमा- नुसार गैरवर्तन ठरते !सभापती विरोधी पक्षाला वारंवार चर्चा करण्याची विनंती करत होते, तरी काँग्रेस सदस्य गोंधळ घालत होते. आम आदमीचे सदस्य संजयसिह यांना निलंबित केले. यात काय चुकले! विरोधी पक्षांला चर्चेतून सत्ताधारी पक्षाला सरकारला चर्चेतून अडचणीत आणता आले असते जर ! देशातील महिला संरक्षणाच्या कायद्यात त्रुटी असतील तर त्यात दुरूस्त्या करता आल्या असत्या पण विरोधी पक्षाने आठवडाभर संसदेचे काम होऊ दिलेले नाही. संसदेच्या एका दिवसाच्या कामावर १० कोटी खर्च होतो! अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्यावेळी गोंधळ विरोकांनी धुडगूस घालून संसदेचे होऊ दिले नाही.त्यामुळे २०० कोटी रु. पाण्यात गेले. हा जनतेचा पैसा आहे. तो काँग्रेस व गांधी परिवाराचा नाही,याचे भान आहे काय ?राहूल गांधी यांची सदस्यता गेल्याने हा परिवार मोदीवर राग काढत आहे. हे गोंधळ गांधी परिवाराच्या इशाऱ्यावरुन घडत आहे. काँग्रेसचे राजवटीत अनेक लाजीरवाण्या घटना घडल्या आहेत. काँग्रेस नेत्याने १९९५ मध्ये महिलेला तेंदूर भट्टीत जाळले. तसेच १९७५ मध्ये मराठवाडा नामांतर विरोधकांनी दलितांच्या वस्तीवर हल्ले केले व घरे जाळली,दलितांच्या हत्या झाल्या. २००६ मध्ये भंडारा जिल्ह्यात खैरलांजी दलित कुंटुबाची निर्घृपणे हत्या झाली व महिलांना निवस्त्र केले गेले. दिल्लीत २०१२ मध्ये निर्भया बलात्कार व हत्याकांड घडले. तसेच मुबंईत एका तरुणीवर व महिला छायाचित्रकारावर सामुहिक बलात्कार झाला. तेंव्हा केंद्रात व राज्यात काँग्रेसचे सरकार होते ना! एन. सी. आर. बी.च्या २०२२ च्या अहवालानुसार काँग्रेसशासित राजस्थान हे राज्य देशात महिला अत्याचारात पहिल्या क्रमांकावर आहे. पश्चिम बंगालमध्ये नित्य हत्या, जाळपोळ बॉम्ब हल्ले मग तेथे कायदा व व्यवस्था व तेथे लोकशाही आहे काय ? बिहारमध्ये हिंसा रोज घडतात, यावर बोलायचे नाही काय ? काँग्रेस पक्ष व गांधी घराणे सोयीचे राजकारण करत आहे! काँग्रेस राजवटीत महिला, दलित, आदिवासी अत्याचाराची, भ्रष्टाचाराची यादी फार मोठी आहे. हे जर मोदींनी सांगितली तर काँग्रेस नेत्यांना तोंड सुध्दा लपविणे कठीण जाईल. काँग्रेस सत्तेत असताना पंतप्रधानांनी माफी मागितली होती काय ? खर तर ! महिला अत्याराचाच्या प्रश्नावर सामुहिकपणे आवाज उठवायला हवा होता! यावर सत्ताधारी व विरोधी पक्षाने एकजुट दाखविली असती देशातील अत्याचारग्रस्त महिलेला न्याय मिळाला असता! महिलावरील अत्याचार व बलात्कार सारख्या घटनेला अंकूश बसू शकला असता. हे दुर्देव ! विरोधी पक्ष निवडणुकीच्या निमित्ताने मोदी व भाजपाला सरकारला घेरत असला तरी २०२४ मध्ये पुन्हा भाजपाचा येणार, असा दावा मोदींनी केला आहे. तेंव्हा 'इंडिया विरूध्द भारत' असा सामना, होईल, असे दिसतेय!







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'राजेश, पिंकी, अरे बेलपत्र किंवा बेलाची पाने भोलेनाथांना अतिशय प्रिय बरं का ! श्रावणात तर दर सोमवारी भगवान शंकरांना बिल्वपत्रे अर्पण करतात. तुम्ही देव दानवांनी केलेल्या समुद्र मंथनाबद्दल ऐकले असेलच. त्यावेळी समुद्र मंथनातून निघालेले हलाहल शंकरांनी प्राशन करून आपल्या कंठात धारण केले. त्यांच्या सर्वांगाचा भयंकर दाह म्हणजे आग व्हायला लागली. तेव्हा त्यांच्या मस्तकावर बेलाचे पान ठेवण्यात आले. तेव्हापासून शंकराला बेलपत्र वाहण्याची प्रथा आहे. बेलाची तीन पाने सुद्धा अतिशय महत्वाची आहेत बाळांनो. तीन पाने म्हणजे भगवान शंकरांचे त्रिनेत्र, तशीच ही पाने म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश म्हणजेच महादेव या तिन्ही देवांचे प्रतिनिधित्व करतात.'

'अरे बापरे ! केवढे महत्व आहे बिल्वपत्राचे !' पिंकी म्हणाली. 'आई, तू कोणता मंत्र म्हणत होतीस बेल अर्पण करताना ?'' सांगते,' आई म्हणाली. भोलेनाथांना बेलाचे पान अर्पण करताना, 'त्रिदल त्रिगुणाकार त्रिनेत्रं च त्रिधायुतम | त्रीजन्मपापसंहारम बिल्वपत्रं शिवार्पणम' या पौराणिक मंत्राचा जप करतात बरं का पिंकी. या मंत्राचा अर्थ असा आहे की तीन गुण, तीन डोळे, त्रिशूल धारण करणारे आणि तीन जन्मांचे पाप नष्ट करणारे हे भगवान शिव, तुम्हाला तीन पाने असलेले बेलाचे पान आम्ही अर्पण करतो. बेलाच्या पानांमध्ये विषनाशक गुणधर्म असतो. शिवाला बेल वाहताना आपल्या हातावरील विषाणू तर नष्ट होतातच पण त्या पानांचा एक प्रकारचा सुगंधही आपल्या हाताला येतो.'

'आणि आणखी एक महत्वाची गोष्ट सांगते तुम्हाला. भगवान शंकरांना हे बेलपत्र इतके प्रिय आहे की आपल्याजवळ दुसरे काही नसेल आणि आपण भक्तिभावाने एखादे बिल्वपत्र जरी त्यांना अर्पण केले, तरी ते संतुष्ट होतात. म्हणूनच त्यांना 'आशुतोष' म्हणतात. आशुतोष म्हणजे सहज संतुष्ट होणारा. भगवान शंकर आपल्याला जणू सांगतात की तुम्ही सुद्धा माझ्यासारखे सहज संतुष्ट, समाधानी असणारे व्हा.' 'आई, आशुतोष या नावाचा किती सुंदर अर्थ सांगितलास. माझ्या वर्गात शेखरकाकांचा मुलगा आशुतोष आहे ना. तो माझा चांगला मित्र आहे. पण आता मला या नावाचा अर्थ कळला.' राजेश आनंदाने म्हणाला.

'खरंच आई, आपल्या देवांची नावं, हे बिल्वपत्राचं महत्व, आपल्या वनस्पती आणि एकूणच सगळ्या गोष्टी, परंपरा किती अर्थपूर्ण आहेत ! पण कोणी अशा त्या समजावून सांगत नाही.' श्यामराव म्हणाले, 'अरे, पण बेलाच्या झाडाची माहिती तर तुम्हाला आईने सांगितलीच नाही. तुम्हाला ऐकायची आहे का ?'


समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

# सुखासाठी सुखासनाचीच सुरुवात सुंदर

आधुनिक केसरी

प्रत्येकाची सुखाची व्याख्या निराळी असते. अर्थातच ती ज्याच्या त्याच्या अनुभूतीवर ठरत असते. कोण कशात सुख शोधेल ते सांगता येत नाही, समजूही शकत नाही. सुख म्हणजे नक्की काय असतं, हे ज्यानं त्यानं अनुभवल्या शिवाय कळू शकत नाही. सर्वांच्या नशिबात सुखाचा उपभोग लिहिलेला असतोच; ते काहींना ओंजळभर मिळतं, तर काहींना रांजणभर मिळतं. पण त्यांतून मिळणारा आनंद ज्याला कळतो तोच जगणे शिकतो.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दुःखाच्या समुद्रात सुखाची लाट असतेच; फक्त थोडी वाट पहायची असते. विमानाला सुद्धा उडण्याअगोदर धावपट्टीवर वेगाची सीमा गाठण्यापर्यंत धावावंच लागतं, तेव्हा कुठे जाऊन ते आकाशांत भरारी मारू शकतं, उडू शकतं. आयुष्याचा सुद्धा हाच नियम आहे; सुखाच्या आकाशांत उडण्या अगोदर दुःखाच्या धावपट्टीवर सहनशीलतेची सीमा आपल्याला गाठवीच लागते, त्याच्याशिवाय आपण सहज आनंदाची भरारी घेऊ शकत नाही. लहान सहान गोष्टीतही सुख, शोधलं तर सापडतं. सुख म्हणजे काय असतं तसं बघितलं तर आपण दैनंदिन जीवनांत नेहमीच अनुभवत असतो. जसं खूप दिवसापासून हरवलेली एखादी अत्यंत आवडीची वस्तू अचानक सापडते तेंव्हा, ट्रॅफिक जॅममध्ये आपण फसलेले असतो तेव्हा शेजारच्या गाडीतलं लहान मूल आपल्याकडे बघून गोड हसतं तेंव्हा, आकाशात पूर्ण गोल चंद्र दिसतो तेंव्हा जे काही अंतर्मनाला होतं ना त्यांतही अनोखे सुख सामावलेलं असतं. म्हणजेच सुख एखाद्या वास्तुसारखं दिसत नसलं तरीही आपल्याला मिळालेल्या सुखाची अनुभूती आपल्या चेहेऱ्यावर दिसू लागते. कमी अधिक प्रमाणात सर्वांच्याच वाटेला कष्ट, दुःख येत असतात, परंतू त्यावेळी मन प्रसन्न, आनंदी ठेवलं कि सुख आपोआप आपल्याला शोधत येतं. मन प्रसन्न आणि आनंदी ठेवण्यासाठी दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचाराने करण्याची जरुरी असल्याचं आपण समजून घेतलं पाहिजे.

# फूल ....

आधुनिक केसरी

फुलासारखे कोमल असावे फुलासारखे आनंदी राहावे फुलासारखे गोड असावे फुलासारखे सुगंधी व्हावे... फुलाला कितीही उपमा दिल्या तरी कमीच पडतील. एवढे गुण या फुलांमध्ये आहे. फूल झाडावरून तोडले काय किंवा सुकले काय !! त्याचा सुगंध कमी होत नाही. फूल हाताने चुरगाळले तरी त्याचा सुगंध आपल्या हाताला लागतो. किती सुंदर आयुष्य जगते ना हे फूल ! काट्यात, चिखलात कुठेही फुले टवटवीत राहते .सदा आनंदी, कधीही दुःखी नसते. आम्ही पामर मात्र ही देवाची सर्वांग सुंदर निसर्गातील निर्मिती सहज हाताने तोडतो. आणि देवावर जणू उपकार करत आहे अशा अविर्भावात त्याची निर्मिती त्यालाच अर्पण करत असतो. ही सृष्टीच त्याने निर्माण केली आहे आम्हा पामरांसाठी. त्याचे रक्षण करण्याऐवजी आम्ही मात्र स्वैर वागत असतो. झाडांवरचे फुल झाडांवरच छान दिसते. देवाला फक्त भावपुष्प वाहिले तरी ते अर्पण होतात व देव प्रसन्न होतो . तो हार ,तुरे ,नैवेद्य पंचपकवांना पेक्षा भक्तीचा भुकेला आहे. हे परमेश्वरा आम्हा सर्वांना सद्बुद्धी दे झाडांची पाने फुले न तोडण्याची. सणावाराला, उपवासाला आम्ही याचक झाडे ओरबाडून काढतो. अज्ञान आणि सज्ञान सगळे सारखेच आहेत. गुढीपाडवा असेल तर सकाळी फिरताना सगळ्यांच्या हातात लिंबाचे तोडलेले शेंडे असतात. दसऱ्याला आंब्याचे पान हातात दिसतात. हरितालिकेला सर्व झाडे ओरबडतात अगदी सुशिक्षित लोक सुद्धा .खूप कीव येते त्यांची .

संस्कारधन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग...९

लहान लहान मुले जणू गुलाबाची फुले वाऱ्यावर डोले फुले गाण्यावर डोले मुले....१ काय सांगू बाई फुलांची गंमत सुकलेल्या फुलांना नाही काही किंमत ....२ मोगरा शेवंती जाई जुई सगळ्यांना मागणी लईलई....३ कळी नको कोणाला आवड सर्वांची फुलाला जीव लावा झाडाला फुले वाहू देवाला ....४ हसा खेळा सदानकदा फुलासारखे गोड गोड रहा मधासारखे....५ असो फुलांसारखे आपणही आनंदी जगायला शिकू. झाडं ओरबाडणार नाही अशी प्रतिज्ञा करू. फुला पानांसारखं एकत्र राहू, काटे जवळ असले तरी सुखी राहु. फुलांचा सुगंध वाऱ्या सोबत पसरतो ,तसाच आपल्या कार्याचा सुगंध वागण्यातून पसरतो. फुल हे गुलाब का। खुशबू लिया करो ।कभी कभी तो मेरे दोस्तो। खुश रहा करो ।

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

बैसवुनि फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥१॥
पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥ध्रु.॥
बोले बोलतिया सवें । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥२॥
तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ॥३॥
आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारीसें । कान्होबाचे अंतरीं ॥१॥
पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥ध्रु.॥
खेळ खेळे न पडे डाईं । ज्याचा भार त्याच्या ठायीं । कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगवीती ॥२॥ तुका म्हणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ । देतो ज्यांचें बळ । त्यांसि तैसा विभाग ॥३॥
काम सारूनि सकळ । आले अवघे गोपाळ । जाली आतां वेळ । म्हणती आणा सिदोऱ्या ॥१॥
देती आपुलाला झाडा । गाई बैसविल्या वाडां । दोंदिल बोबडा । वांकड्याचा हरि मेळीं ॥ध्रु.॥
आपुलालिये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनियां गोडी । हरि मेळवी त्यांत तें ॥२॥
भार वागविला खांदीं । नव्हती मिळाली जों मांदी । सकाळांचे संदी । वोझीं अवघीं उतरलीं ॥३॥
मागे जो तांतडी । त्यासि रागा येती गडी । तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ॥४॥
एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रम्हानंदें । तुका म्हणे पदें । या रे वंदू हरीचीं ॥५॥
यमुनें पाबळीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी ।

# निरूपण

आधुनिक केसरी

त्वां जगज्जननीं देवीं चन्द्रशेखरवल्लभाम् | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५४ || तुला जगज्जननीला, भगवान महादेवाच्या प्रिय देवीला, दुर्गा देवीला दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी नमन करतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

ज्ञान बिना निर्जीव है, सकल धर्म का रुप ।
ज्ञान से अनुभव होत है, सारशब्द का रुप
।।२६।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)
०४/०४/२६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्ञानाशिवाय समस्त धर्मांचं स्वरूप जीवनहीन आहे. ज्ञानाद्वारेच सत्पुरुषाच्या म्हणजेच परमेश्वराच्या अस्तित्वाचा साक्षात्कार होतो. शब्दस्वरुप सत्पुरुषाची प्राप्ती ज्ञानामुळेच अनुभवास येते.


स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# मोक्षलक्षण

आधुनिक केसरी

या जन्मामध्ये जीव उगाच भ्रामक कल्पना करून आयुष्य वाया घालवतो. हा जन्म फुकट गेल्यानंतर पुढचा जन्म माणसाचाचं येईल याची खात्री नसते.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

म्हणून तो दान करतो. दान केल्यास आपला संसार सुखाचा होईल. गेल्या जन्मी काही दान न केल्याने मी गरिब राहिलो असं अज्ञानी माणसाला वाटते. दान करायचे म्हणून एक जूने वस्त्र एक तांब्याचा पैसा काढतो, आणि तो विचार करतो की मी एवढं दान केलं आहे आता मला पुढच्या जन्माच्या वेळी कोटीच्या कोटी पुण्य मिळेल. तो तिर्थक्षेत्रांचा महिमा जाणतो तिथेही भरपूर प्रमाणात पुण्य मिळेल. या आशेवर राहून आलेल्या अतिथिला घासभर अन्न देतो, पैसा अडका देतो, आणि आशा करतो की पुढच्या जन्मात कोटीच्या कोटीरूपयांच्या राशी पायाशी लोळण घेतील. तेव्हा आपण ऐषोआरामात जीवन जगू. आजचा दिवस माझा नाही ना!!! मग ऊद्याच्या दिवशी मी खुप श्रीमंत असेल


अशी विनाकारण भ्रामक कल्पना तो मनात करतो*

जन्मकर्माच्या फेरीत अडकून बसतो.कर्मामध्ये माणसाची वासना गुंतून रहाते, या जन्मी जे दान देतो ते पुढच्या जन्मी अनेक पटीने मिळेल अशी जो कल्पना करतो तो अज्ञानी असतो तो बध्द म्हणून ओळखावा.

# प्रपंचातले सुख-दुःख हे केवळ जाणिवेत

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे.


विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

तेव्हा अनुग्रहित होण्या विषयी शंका बाळगू नका .व नंतर तर शंका बाळगण्याचे काहीही कारण नाही कारण त्यांचे आज्ञा पालन हेच आपले ध्येय आपण ठरवले असल्यामुळे उर्वरित जवाबदारी सांभाळण्यास तुम्हाला आज आहात त्यापेक्षा जास्त वैभव व समाधानात पहाण्यास ते समर्थ आहेत.त्यांचे नांवच समर्थ ,मग उशिर कशाला ? गुरुला सर्वस्व मानुन त्यांची आज्ञा पाळुन तर पहा त्यातच स्वर्ग सुख असल्याचा अनुभव आल्याशिवाय रहाणार नाही. आपल्या गुरूने जे सांगितले ते सत्य मानावे. "या मार्गाने शंभर पावले गेलास तर खजिना सापडेल." असे गुरूने सांगितले, तर दुसऱ्या मार्गाने दोनशे पावले जरी गेला तरी त्याचा काय उपयोग ? क्रमशः

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

पादाहतं यदुत्थाय मूर्धानमधिरोहति ।स्वस्थादेवापमानेषु देहिनस्तद्वरं रजः ॥स्पष्टीकरण – अपमान सहन न करणे हे तेजस्वितेचे लक्षण आहे. तुम्ही अपमान सहन करता हे एकदा कळले, की लोक तुमचा वारंवार अपमान करतील. त्यामुळे तुमचे मन हळूहळू दुबळे बनत जाईल. तुमचा पुरुषार्थ खच्ची होईल. तुमचा आत्मविश्वासच ढासळेल. माणसे राखेचा ढीग मार्गांत आला, तर त्याला तुडवून पुढे जातात; पण जळते निखारे दिसले तर ! तर त्यांना दूर ठेवून मार्गस्थ होतात. तुम्ही तेजस्वी हा तुमचा, तुमच्या देशाचा, तुमच्या धर्माचा अपमान कधीही सहन करू नका.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ३० जुलै २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 30 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-6 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5


# असंख्य नयनांनी अनुभवली आभाळाच्या रंगमंचावर गगनचुंबी ताबूतांची गळाभेट



आधुनिक केसरी न्यूज

**सदानंद माळी**

**कडेगाव :** हिंदू-मुस्लीम साथ रहेंगे। एकीसे सागर पार करेंगे ।अशी ऐक्याची हाक देणारा व सामाजिक सर्व धर्म समभाव जपणारा गगनचुंबी ताबूतासाठीचा मोहरम कडेगावचा प्रसिद्ध आहे. ताबूत भेटीचा सोहळा भाविकांच्या उपस्थितीत असंख्य नयनांनी अनुभवला.

हा ताबूत भेटीचा सोहळा पारंपारिक पद्धतीने साजरा झाला. या गगनचुंबी ताबूताच्या गळाभेटीची मोहरम यात्रा दोन वर्ष कोरोना व गतवर्षी पावसामुळे झाली नाही. यंदा पावसाने दिलेली उघडीप व कृपादृष्टीमुळे तीन वर्षानंतर गगनचुंबी ताबताची गळाभेट शनिवारी दुपारी हजारो भाविकांच्या उपस्थितीत झाली. कडेगाव येथील आभाळाच्या रंगमंचावर नयन मनोहरी ताबूत यांची गळाभेट असंख्य नयनांनी अनुभवली. तर अनेक भाविकांनी मोबाईलवर या गगनचुंबी ताबूत गळाभेटीचे अविस्मरणीय असे क्षण टिपले. सकाळी पारंपरिक पद्धतीने कडेपूर, शिवाजीनगर, विहापूर, सोहोली, निमसोड, वगैरे गावातील मानकऱ्यांना वाजत- गाजत आणण्यात आले. त्यानंतर विधिवत मानकऱ्यांच्या हस्ते पूजाअर्चा करून सकाळी 11 वाजता मानाचा सातभाई ताबूत उचलण्यात आला. येथून भेटी सोहळ्यास प्रारंभ झाला. हा ताबूत विजबोर्डजवळ येऊन थांबला. तेथे देशपांडे, हकीम, शेटे यांचे ताबूत येऊन मिळाले. त्यानंतर बागवान, आत्तार, शेटे, माईनकर आणि अन्य उंच ताबूत माना प्रमाणे उचलण्यात आले. त्यानंतर हे सर्व ताबूत पाटील चौकात आणण्यात आले. पाटील यांचा भव्य मोठा आकर्षक ताबूत उचलण्यात आला आणि सातभाई- पाटील - बागवान - अत्तार - हकीम, या उंच ताबूतांच्या प्राथमिक भेटी 11.30 वाजता संपन्न झाल्या. त्यानंतर हे सर्व ताबूत मानाप्रमाणे वाजत गाजत मुख्य भेटीच्या ठिकाणी सुरेशबाबा देशमुख चौक (मोहरम मैदान) कडे निघाले. यावेळी इमाम हुसेन झिंदाबाद, मौला अली झिंदाबाद, धुला.. धूला आशा घोषणा देण्यात येत होत्या. दरम्यान वाटेत तांबोळी, शेटे व अन्य ताबूत सहभागी झाले. त्यानंतर माईनकर यांचा ताबूत उचलण्यात आला. नंतर मानकऱ्यांमार्फत इनामदार व सुतार यांचे उंच आकर्षक ताबूत आणले गेले.

सर्व ताबूत मानाप्रमाणे सुरेश बाबा देशमुख चौक (मोहरम मैदान) या ठिकाणी एकत्रित केले गेले. त्या ठिकाणी मेलवाल्याकडून ऐक्याची हाक देत राष्ट्रीय एकात्मतेची गाणी म्हणण्यात आली. त्यानंतर हिंदू मानकऱ्यामार्फत मसूद माता ताबूत पंजे, बारा इमाम पंजे मानकऱ्यामार्फत आणण्यात आल्यावर मुख्य भेटी सोहळा सुरू झाला. त्यानंतर सर्व ताबूत आपापल्या पद्धतीने मार्गस्थ झाले. दुपारी 2.30 वाजता भेटी सोहळा आटोपून सर्व ताबूत आपल्या जागी येऊन बसले. यावेळी मोहरम भेटी सोहळा पाहण्यासाठी माजी मंत्री आमदार डॉ.विश्वजित कदम, आ. अरुण लाड, मा. आ. मोहनराव कदम, मा. आ. पृथ्वीराज देशमुख, संग्रामसिह देशमुख, ॲड. महेश शानबाग, भाजपचे राजाराम गरुड, डॉ जितेश कदम, नगराध्यक्ष धनंजय देशमुख, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, चंद्रसेन देशमुख, सुरेश निर्मळ, गुलाम पाटील, डी. एस.देशमुख, विजय शिंदे, रविंद्र देशपांडे, तहसीलदार अजित शेलार, गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, पोलीस उपअधीक्षक पद्मा कदम आदी मान्यवर व नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक यांचेसह हिंदू-मुस्लिम बांधव, भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्तृत्व नसताना पंडित नेहरू पंतप्रधान : भिडे

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** अखंड हिंदुस्थानासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नखाएवढेही योगदान नाही. मात्र कोणतेही कर्तृत्व नसताना ते भारताचे पंतप्रधान झाले, अशी टीका श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे गुरूजी यांनी येथे केली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, यवतमाळ विभागाच्या वतीने शनिवारी बलवंत मंगल कार्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, नेहरूंना हिंदुस्थानाप्रती कोणतेही प्रेम नव्हते. देशासाठी नेहरूंचे नखभरही योगदान नसताना ते पंतप्रधान झाले, याचे शल्य त्यांनी व्यक्त केले.










# बहुआयामी मैत्रीचे नवे पर्व



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**केवळ आर्थिक आणि व्यापारी दृष्टीने नव्हे तर भूराजनैतिकदृष्टीनेसुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संयुक्त अरब इमिरात राष्ट्राच्या दौऱ्यास विशेष महत्व आहे. 2014 साली नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तेव्हा ते आखाती देशासीसंबंधीत देशवाशीयांचे व जगाचे लक्ष होते. गुजरामधील गोधरा दंगलीनंतर त्यांच्या नेतृत्त्वावर अनेक प्रश्न उभे केले जात होते. परंतु आखाती देशासी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करून त्यांनी एक नवा इतिहास रचला आहे. त्यामुळे भारतामधील अल्पसंख्यांक मुस्लिम नेत्यामध्येसुद्धा नवे विश्वासाचे वातावरण तयार झाले आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 34 वर्षापूर्वी अबूधाबीस भेट दिली होती, त्यानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा पाचवा दौरा होता . म्हणजे यापूर्वी 2014 नंतरसत्यांनी 4 वेळा या देशाला भेटसदिली आहे. अमेरिका आणि चीननंतर भारताशी प्रभावी व्यापारीसंबध असलेला यु.ए.ई. हा तिसरा मोठा व्यापारी भागीदार आहे.**

आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्यामुळे उभय राष्ट्रामध्ये आर्थिक व व्यापारी संबधाच्या इतिहासात एक नवे पर्व उदयास आले आहे. यादौऱ्यामुळे आखाती देशावर काय परिणाम होतील भारत या देशांना कोणत्या प्रकारची मदत करत आहे, पुढे चालून हे देश भारताच्या बाजूने कसे उभे राहतील या सर्व प्रश्नांची उत्तरे या लेखात शोधली आहेत. बहुध्रुवी जगामध्ये द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी यु.ए.ई.चे अध्यक्ष शेख महोम्मद बिन झायेद अल्लनाहयान यांच्याशी मैत्रीपूर्ण उबदारवातावरणत चर्चा केली. या चर्चे दरम्यान दहशतवाद निर्मुलनासह अनेक विषयावर चर्चा झाली. नव्या जगामध्ये भारत आणि यु.ए.ई. दरम्यान असलेल्या संबंधांना अबुधाबी येथील चर्चेत व्यापक सर्वसमावेशक दृष्टीने तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पहिला म्हणजे भारत आणि यु.ए.ई. नेत्यांच्या चलनामध्ये व्यापार सेटलमेंन्ट सूरू करण्यास अनुमती देण्यात आली. भारत युनिफाईड आखाती देशाच्या इंनस्टंट पेमेंन्ट इंटर फेसला जोडण्याचे मान्य केले. तेथील अध्यक्षाची भेट घेतल्यानंतर मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या वर्षी दोन्ही देशांनी आर्थिक भागीदारवर सह्याहकेल्यानंतर भारत यु.ए.ई. व्यापारात 20 टक्के वाढसझाली आहे. दोन्ही देशांच्या चलनामध्ये व्यापार करण्यासाठी करण्यात आलेल्या करारामुळे दोन्ही राष्ट्रातील अर्थिक संबध अधिक मजबूत होतील आणि परस्परामधील संबंध वाढेल. सिमापार व्यापारासाठी रूपया आणि यु.ए.ई. येथील चलनात करण्यात आलेला व्यापार महत्वाचा असून त्यासाठी भारतातील रिजर्व बँकेत तसेच यु.ए.ई. येथील सेंन्ट्रल बॅक यांचातील परस्पर व्यापारासाठी दोन करारावर सह्या करण्यात आल्या.त्यामुळे दोन्ही राष्ट्रातील व्यापाराला अधिक प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच दोन्ही नेत्यांनी स्थानिक चलनामध्ये व्यापार करण्याच्या धोरणास सहमती दिल्यामुळे या कराराचे भविष्यकालीन आर्थिक विकासावर चांगले परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच दुसरा नव्वी दिल्ली येथील भारतीय प्रोद्योगिकी संस्था म्हणजे आय.आय.टी.ची शाखा आबुधाबी येथे उघडण्यात येणार आहे. त्यामुळे भारतातील प्रगतस्तर तंत्रज्ञान शिक्षण यु.ए.ई. मधील विद्यार्थ्यांना प्राप्त करूण घेता येईल. पदवीपासून पीएच.डी.पर्यंत उच्च दर्जाचे शिक्षण प्राप्त करून घेण्यासाठी तेथील विद्यार्थ्यांना नव्या तांत्रिक शिक्षणाच्यासंधी उपलब्ध होऊश कतील. या दौऱ्याचे तिसरे महत्वाचे फलित म्हणजे उभय राष्ट्रातील व्यापार व शिक्षणाप्रमाणेच पर्यटन आणि सांस्कृतिक संबंधात महत्वाची गति मिळणार आहे. यु.ए.ई.च्या अध्यक्षाने मागील वर्षी पजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमास विशेष उपस्थिती दर्शविली होती. यादौऱ्यामुळे उभय राष्ट्रातील ऐतिहासिकसंबंध अधिक दृढ झाले आहेत. अरब इमारात येथील 10 लक्ष लोकसंख्ये पैकी 35 टक्के लोक भारतीय असून हे भारतीय लोक सर्वात मोठा समुदाय आसून दोन्ही देशामधील संबध मजबूत करण्यासाठी या लोकसंबंधाना विशेषमहत्व आहे. लोक व लोकामधील



मैत्रीमूळे भावी सांस्कृतिक संबंधाना अधिक चालना मिळणारआहे. भारतयु.ए.ई. दरम्यान चाव्यापार 59 अब्ज डॉलर्स ऐवढा आहे तो भविष्य काळात दुप्पट करावयाचा आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या सबळ माहितीनुसार तेलसमृद्ध आखाती देशभारताच्या 2019-20 या वर्षातील चीन व अमेरिकेच्या व्यापारानंतर सर्वात मोठा आर्थिक भागिदार बनला आहे. तेलाच्यापलिकडे भारत इतर अनेक वस्तुची निर्यात यु.ए.ई. ला करत आहे. दोन्ही देशात 2020-21 मध्ये 16 अब्ज डॉलर्सची उलाढाल झाली. प्रमुख निर्यातीमध्ये पेट्रोलिअम उत्पान मौल्यावान रत्ने, दगड रत्ने, सोन्या चांदीचे दागीने, खाद्य अन्नपदार्थ आणि कापड उद्योग इत्यादीचा समावेश होतो. आता या दौऱ्यानंतर सहकार्याची नवी शितीजे विकसित होत आहेत. आगामी पाच वर्षात पुढील काळात अनेक नवीन क्षेत्रामध्ये या दौऱ्यामुळे उभय राष्ट्रात नवीन क्षेत्रांचा विकास होणार आहे. शिक्षण विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यटन, संस्कृतिक देवाण-घेवाण तसेच संरक्षण क्षेत्रातील सहकार्याला विशेष महत्त्व आहे. यु.ए.ई. भारताकडून भ्रमूक्षेपअस्त्रे विकत घेण्याची शक्यता आहे. आता नव्या युगामध्ये यु.ए.ई.भारतामध्ये 1 ट्रिमीयन डॉलर्स एवढी गुंतवणूक करणार आहे. उभय राष्ट्रामध्ये सर्व कठीण आणि जटिल समस्यावर मात करून विकास प्रक्रियेला गतीदेण्यासाठी ही नवी क्षेत्रे उपयुक्त ठरू शकतात. सहकार्याच्या या नविन क्षेत्रांना अधिक व्यापक करून देण्याचा प्रयत्न या दौऱ्यातून करण्यात आला. शांतता विकास धार्मिक सहिष्णूता, संहार्ध आणि सर्वसमावेशक विकासाचे प्रतिक म्हणून उभय राष्ट्रांनी समान श्रद्धांचा विकास केला आहे. शांतता व विकास ही मुल्ये अंतर्भूत असून त्या आधारे या नव्या क्षितीजांना अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

**नव्या व्यापार संधी :** उभय राष्ट्रामध्ये आर्थिक प्राधन्यक्रम लक्षात घेऊन नव्या व्यापारी संधीचा विकास केला जात आहे. त्यामुळे आखाती देशामध्ये भारतीय तरूणांना अधिक नव्या रोजगारसंधी उपलब्ध होणारआहेत तसेच भारतामध्ये तयार होणाऱ्या उत्पादीत वस्तू व सेवांना अधिक मागणी प्राप्त होणार आहे. नित्यपयोगी कृषी अद्योगिक वस्तू व सेवा भारत यु.ए.ई.ला पुरवित आहे. भविष्य काळातसुद्धा दोन्ही राष्ट्रातील व्यापार वृद्धीला त्यामुळे शक्य होणार आहे. या दौऱ्यामुळे उपलब्ध होणाऱ्या व्यापार कराराचे फायदे वाढवू शकतील. आज भारत जगामध्ये 5 व्या क्रमांकाची अर्थसत्ता असून भारत जगामध्ये 3 ऱ्याक्रमांकावर पोहचण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारताच्या वाढत्या आर्थिक सामर्थ्यांचा फायदा आखाती देशांना होणारआहे. यु.ए.ई. ला सुद्धा पेट्रोलियम वगळता इतर अनेक वस्तूबाबत भारताशी करार करावयाचा आहे. कारणत् यांना तेलप्रधान अर्थव्यवस्थाही आपली प्रतिमा बदलावयाची आहे. उभय राष्ट्रामधील वाढत्या व्यापारामागे वस्तू व सेवांची नवी मागणी आणि भक्कम पुरवठा साखळी हे महत्त्वाचे सुत्र आहे.

**शैक्षणिक आदान प्रदान:** या दौऱ्याचे सर्वात महत्वाचे फलितम् हणजे शैक्षणिक आदान प्रदान हे होय. सोलार तंत्रज्ञान म्हणजे सौर ऊर्जा, अनु ऊर्जा अंतराळ संशोधन या क्षेत्रामध्ये भारताने मोठी झेप घेतली आहे. काळाप्रमाणे जर बदलावयाचे असेल तर आखाती देशाला विज्ञान व तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही हे लक्षात घेऊन यु.ए.ई. ने भारताबरोबर शैक्षणिक विकासाठी हात पुढे केला आहे. आता अबुधाबी या राजधानीच्या शहरात भारताच्या विशेष सहकार्यामुळे भारतीय तंत्रनिकेतन आय.आय.टी. नवी दिल्लीची विशेष शाखा उभारली जाणार आहे. आखाती देशांच्या सर्वांगिण विकासाचा मार्ग प्रगत विज्ञान तंत्रज्ञानात आहे हे ओळखून हा नवा करार करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही सर्वात मोठी यु.ए.ई. ला भेटआहे.

**समारोप :** या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की या नव्या करारामुळे भारत आणि आखाती देशामुळे मैत्रीपूर्ण संबंधाचे एक नवे पर्व उदयास येत आहे. आता भविष्यकाळात दोन्ही राष्ट्रांनी मैत्रीचे हे बंध अधिक मजबूत करून दूरचा पल्ला गाठला पाहिजे. आपल्या सर्वांगिण विकासाठी सर्व आखाती देशाला भारतावर अवलंबून राहवे लागेल. हा या दौऱ्यांचा संदेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 जुलै रोजी अबुधाबीस दिलेली ही भेट म्हणजे बहुआयामी मैत्रीचे नवे पर्व होय.

# श्रद्धा



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**दुसऱ्या महायुद्धानंतर विकसित राष्ट्रांच्या उत्पादन वाढीस नवी बाजारपेठ निर्माण करून देण्याच्या उद्देशाने निव्वळ आर्थिक हित समोर ठेवून विकसनशील राष्ट्रांना विकासाचे स्वप्न दाखवत उभी केलेली भांडवली आंतरराष्ट्रीय संरचना म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण ही प्रक्रिया लोकांनी स्वीकारलेली नसते. लोकशाहीमध्ये लोक प्रत्यक्षपणे सहभागी होत नसतात तर त्यांचे प्रतिनिधी दिशा ठरवत असतात. विशेषतः नुकत्याच स्वतंत्र झालेल्या आणि सामंतीपणाच्या खुणा बाळगणाऱ्या आणि अर्ध वसाहतिक असलेल्या भारतासारख्या राष्ट्रांमध्ये तर आपले प्रतिनिधी जनतेचा विचार न करता स्वतःच्या सामंती वृत्तीचा विचार करूनच निर्णय घेत असतात.**

दैनंदिन जीवनात आपण अनेक प्रकारचे शब्द वापरतो, पण त्याचा अर्थ आपणास कितपत उमगला हे एक प्रश्नचिन्हच असते. विश्वास, भक्ती, श्रद्धा, अंधश्रद्धा, स्वातंत्र्य, गुलामी, पुरोगामी, प्रतिगामी असे एक ना अनेक शब्द आहेत जे केवळ शब्दच नसून संकल्पना आहेत. सांकल्पनिक शब्दांच्या अर्थाचा पट विस्तीर्ण असतो, त्यास अनेक बाजू असतात. समग्ररीत्या समजून घेतल्यासच तो शब्द किंवा ती संकल्पना आपणास समजते. अशीच एक संकल्पना म्हणजे श्रद्धा होय. जी आधुनिक काळात काही प्रमाणात विवाद्य ठरत आहे. माणसाला श्रद्धेची गरज का पडते? श्रद्धेशिवाय माणूस जगू शकणार नाही का? किंवा मनुष्याला मनुष्यत्व प्रदान करण्यात श्रद्धेची भूमिका आणि तिचा वाटा किती? या किंवा अशा प्रकारच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आपणास श्रद्धा म्हणजे काय? इथपर्यंत पोहचता येऊ शकते. जीवसृष्टीच्या म्हणून ज्या काही मर्यादा आहेत त्या माणसाला देखील लागू आहेत. त्यातल्या त्यात माणसाने आपल्या बुद्धीच्या आधारे या मर्यादा उल्लंघन करण्याचे आणि आपल्या

परीने जगताची व्यवस्था लावण्याचे काम केले. त्याच्या या कृतीतून निश्चितच ज्ञानतत्त्वाची निर्मिती झाली, जी माणसाच्या उत्क्रांतीला, प्रगतीला फायदेशीर ठरली. ज्ञानतत्त्वाचे मूळ हे सत्त्वगुणाची वाढ करून जिवात्म्याचा संयोग घडविण्याची बुद्धी विकसित करणे हे आहे. आपणास हे वाक्य उच्चारायला क्षणभर देखील अवधी लागणार नाही, पण या वाक्यात अनेक गोष्टी अंतर्भूत आहेत. सत्त्वगुणाची वाढ आणि जिवात्म्याचा संयोग यात अख्खे ब्रह्मान्ड दडलेले आहे. गुण किती प्रकारचे आहेत? कोणत्या गुणाच्या वाढीमुळे जीवास कोणती दशा प्राप्त होते? विशिष्ट गुण

वाढीसाठी कोणत्या प्रयत्नांची गरज आहे? जीव म्हणजे काय? जीवाची निर्मिती कशी होते? जीवात्मा आणि परमात्मा यात काय फरक आहे? या दोन्हींचा संयोग होऊ शकतो का? होत असल्यास मार्ग कोणता? असे एक ना अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात. सांख्यदर्शनामध्ये प्रकृती आणि पुरुषाच्या अनुषंगाने पंचवीस सूत्रांच्या आधारे सिद्धांताची मांडणी केली आहे. तर न्यायदर्शनात विशिष्ट वस्तूकडे पाहण्याचे, ती समजून घेण्याचे किती मार्ग असू शकतात याचे साद्यंत वर्णन आलेले आहे. प्रमाण, प्रमिती आणि प्रमेय म्हणजे काय? प्रमाण किती प्रकारचे असतात? कोण सामान्य माणूस हे सर्व समजून घेण्याचा उपद्व्याप करेल? बरे हे केवळ एकच शास्त्र आहे का? नाही. फक्त भारतीय दर्शनशास्त्राचा विचार करता सहा आस्तिक दर्शने आणि नास्तिक तीन दर्शने यात येतात. पाश्चात्य दर्शनमीमांसा वेगळेच. आता कोठे आम्ही कार्ल मार्क्स पर्यंत पोहचलो. हेगेल समजून घ्यायला आमचे अर्धे आयुष्य खर्ची घालावे लागेल. गौतम बुद्ध म्हणतात, दुःखाचे मूळ तृष्णेत आहे आणि तृष्णा किती पद्धतीने निर्माण होते, ती दूर करण्याचे उपाय काय? निर्वाण म्हणजे काय? असे खूप विषय आहेत. आस्तिक दर्शनशास्त्र सर्व प्रकारच्या दुःखाना तीन वर्गात समाविष्ट करते. अध्यात्मिक, आधिभौतिक, अधिदैविक. मग या प्रत्येकाची व्याख्या आणि त्यात येणारी दुःखे, त्यावरील उपाय वेगळे. कोणत्याही सामान्य मनुष्याकडे हे सगळे समजून घेण्यात काडीचाही रस नसतो. कारण त्याचा चरितार्थ त्याच्यासाठी महत्वाचा असतो. मग यातील जे जाणकार मंडळी असतात त्यांचा शब्द प्रमाण माणून वर्तन करणे सुरू होते. यास आपण श्रध्दा म्हणतो. श्रद्धा प्रमाण मागत नाही, शंका उपस्थित करत नाही. शंका दोन पद्धतीची असते. एक समजून घेऊन आपले आकलन वाढविण्याच्या उद्देशाने निर्माण झालेली आणि दुसरी म्हणजे जे आहे ते अनुचित असून दुसरा यापेक्षा




वेगळा मार्ग आहे याविषयी वाद घालण्याच्या उद्देशाने उपस्थित केलेली. बरे ही माणसे शंका कोणासमोर उपस्थित करतात तर श्रद्धावानांसमोर. कोणताही श्रद्धावान हा फक्त वाहन चालकासारखा असतो. वाहन कसे चालवायचे एवढेच त्याला ज्ञात असते, पण हे वाहन कोणत्या नियमाने चालते, त्याची कार्यप्रणाली कशी काम करते याविषयी तो अनभिज्ञ असतो. श्रद्धा केवळ पारंपरिक स्वरूपाच्या असतात असे नव्हे तर अगदी वैज्ञानिक श्रद्धा देखील असतात. वैद्यकावरील आपली श्रद्धा अर्धा आजार दूर करते असे म्हटले जाते. कोरोनाकाळात जे विविध प्रयोग झाले ते आपल्या श्रद्धेच्याच

कक्षेत येतात. आपण ते निमूटपणे स्वीकारले. कारण मरणाची भीती माणसाला भौतिक श्रद्धा स्वीकारायला भाग पाडते तर जीव आणि जगत समजून घेणारी श्रद्धा त्यातील जाणकारासमोर नतमस्तक होते. जी गोष्ट आपण पाहिलेली नाही, ज्याविषयी कोणतीही कल्पना आपणास नाही म्हणजे ती वस्तू तेथे नसतेच असे नाही. क्वांटम फिजिक्स असे सांगते की, आपण एखादी वस्तू पाहतो तेव्हा अनुरुपाने आपल्यासमोर दृश्यमान होते तर आपल्या अनुपस्थितीत ती वेव्ह स्वरूपात म्हणजेच लहरींच्या रुपात असते. एवढेच कशाला एखादा वैद्यक आपल्या शरीरात सुई टोचवतो व आपण बरे होतो, ही आपली त्या वैद्यकावरील, औषधावरील श्रद्धाच असते. त्या त्या विषयातील

निष्णात लोकांवर कल्याणाच्या हेतूने टाकलेला विश्वास म्हणजे श्रद्धा होय. श्रद्धा सामर्थ्य प्रदान करते. कारण आपण एकटे नाही तर आपल्या सोबतीला कोणीतरी आहे, हा दिलासा आपणांस ऊर्जा देत असतो. जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर, असे म्हणणे म्हणजे आधुनिक शब्दावलीमध्ये लॉ ऑफ रिऍक्शन होय. परंपरा त्याला कर्मसिद्धांत म्हणते एवढेच. या जगताला चालविणारी कोणतीतरी एक शक्ती आहे, त्यास तुम्ही निसर्ग म्हणा किंवा काहीही. ही निर्गुण, निराकार शक्ती कोणी मूर्तीत पाहत असेल, कोणी शब्दात साधत असेल, तर कोणी कशात बांधण्याचा प्रयत्न करत असेल. निराकाराला आकार देण्याच्या विश्वासातून श्रद्धेचा जन्म होतो. तुकाराम महाराज म्हणतात, केला पाषाणाचा विष्णु, परि पाषाण नव्हे विष्णु, विष्णुपूजा विष्णूशी अर्पे, पाषाण राहे पाषाणरूपे. त्यामुळे श्रद्धेमागची तात्त्विक भूमिका लक्षात घेऊन कार्य झाले पाहिजे. गीतेमध्ये स्पष्टच सांगितले आहे, प्रतिकांची पूजा ते ब्रह्म आहे असे समजावे. मात्र ब्रह्म म्हणजेच समोरचे प्रतीक असे मानू नये.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**


हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## प्रासंगिक

# तत्वाशी व पक्षाशी एकनिष्ठ असलेले बाबाराव पाटील खडसे

### राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नवे कर्णधार



ज्यांना पद दिली, ताकद दिली त्यापैकी बरेच जण दादासोबत सत्तेत ' लँड ' झाले. मात्र, तत्त्वाची व पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या अनेक नेत्यांचा विश्वास आजही "पवार ब्रँड" वरच असल्याने ते शरदचंद्र पवार साहेबांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. ज्या शरद पवार साहेबांनी पद, प्रतिष्ठा आणि नाव मिळून दिले त्या "बापमाणसाला " या वयात रस्त्यावर उतरायला लावणाऱ्यांच्या विरोधात ताकदीने लढा देण्याचा निर्धार वाशिम जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी निर्धार केला असून, दस्तुरखुद शरद पवार यांच्या सांगण्यावरून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बाबाराव पाटील खडसे यांची वाशिम जिल्हा अध्यक्षपदी निवड करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कर्णधार पदाची जबाबदारी टाकली आहे.

विज्ञान कृषी शाखेतून सुवर्णपदकासह पारंगत ( Msc.Agri ) झालेले बाबाराव खडसे पाटील यांची अभ्यासू, दूरदृष्टी, संघटन कौशल्य आणि सांस्कृतिक समज ही जिल्ह्यातील कोणाही नेत्यापेक्षा उत्तम असून, शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू व जवळीक असलेले नेते म्हणून बाबाराव पाटील जिल्हाभरात सुप्रसिद्ध आहेत. विज्ञान कृषी शाखेतून पारंगत झाल्यानंतर शेतीनिष्ठ असलेले खडसे पाटील यांनी आपल्या शिक्षणाचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा, या उदात्त हेतूने क्रांती कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचा समाजसेवेचा प्रारंभ केला. त्यानंतर त्यांची जिल्ह्यातील बालाजी सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदी वर्णी लागली. आणि खऱ्या अर्थाने संपूर्ण जिल्ह्यात बाबाराव पाटील खडसे या नव्या पर्वाची सुरुवात झाली. त्यांची दुसरी जमेची बाजू म्हणजे, त्यांनी जिल्ह्यात संस्थानिक जाळे उभारून सर्वसामान्यांच्या मुलांना परवडणाऱ्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळावा व बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी बालाजी सहकारी सूतगिरणीची स्थापना केली.



वसंत खडसे
9373578429

संसदीय लोकशाही व्यवस्थेची जपणूक व जोपासना धर्मनिरपेक्ष, पुरोगामी विचारांची बांधिलकी आणि सार्वजनिक जीवनात सर्वधर्मसमभावाची जोपासना करणारे बाबाराव पाटील यांच्यावर मुळातच शरद पवार साहेब यांच्या राजकीय जीवनाचा प्रभाव होता. त्यातच १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. आणि बाबाराव खडसे पाटील हे नाव कायमस्वरूपी राष्ट्रवादीशी जोडल्या गेले. मात्र २ जुलै २०२३ रोजी कोणाच्याही मनोभावी नसताना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठा भूकंप झाला. आणि अजित दादांनी पक्षाची सर्व ध्येयधोरणे, नीतीमूल्ये बाजूला ठेवून शिवसेना ( शिंदे गट ) व भाजपशी घरोबा केला. आणि आपली वेगळी चूल मांडली. येथूनच खरी शरद पवार यांच्या तत्वाशी व एकनिष्ठ असणाऱ्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची कसोटी सुरू झाली. या कसोटीत बाबाराव पाटील यांनी पक्षाशी व तत्त्वाची असलेली एकनिष्ठा राखून शरद पवार साहेब यांची मुंबई येथे जाऊन भेट घेतली. यावेळी खुद शरद पवार साहेब सुद्धा भारावून गेले होते. वक्तृत्व संपन्न गुणाचे धनी असलेले बाबाराव पाटील खडसे यांचे संघटन कौशल्य व सर्वांना आपलेसे करून घेण्याची वृत्ती वाशिम जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पुनर्बांधणी करण्यास निश्चितच यशस्वी ठरेल असे अनेक राजकीय तज्ञ बोलत आहेत.

# लोकअभिरक्षक कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** येथील लोकअभिरक्षक कार्यालयाचे उद्घाटन उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमुर्ती उस्मानाबाद न्यायमुर्ती अरूण रामनाथ पेडणेकर यांच्या हस्ते व अध्यक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शंकरराव शेंडे तसेच बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे माजी अध्यक्ष ॲड. मिलींद शंकरराव पाटील यांच्या उपस्थीतीत पार पडला.

गरजू व्यक्तींना मोफत व कायदेशीर मदत मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण उस्मनाबाद अंतर्गत लोकअभिरक्षकांची 24 एप्रिल 2023 पासून नेमणूक केली आहे. त्यामध्ये मुख्य लोकअभिरक्षक ॲड. अमोल गुंड, उपमुख्य लोकअभिरक्षक ॲड. अभय पाथरूडकर व ॲड. गोरख कस्पटे तसेच सहाय्यक लोकअभिरक्षक ॲड. शुभम गाडे, ॲड. शशांक गरड, ॲड. विशाखा बंग व ॲड. मोहिनी शिरूरे यांचे नेमणूक करण्यात आली आहे. लोकअभिरक्षक कार्यालयामार्फत दररोज जिल्हा मध्यवर्ती कारागृहास भेट दिली जाते. कारागृहातील बंदींना मोफत विधी सेवा दिली जाते. तसेच कारागृहातील बंदीची भेट घेवून नातेवाईक आणि त्यांचे खाजगी वकील यांच्यात समन्वय करून दिला जातो. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे आयोजित विधी साक्षरता शिबीरामध्ये लोकअभिरक्षक भाग घेतात आणि लोकअभिरक्षक कार्यालयांमार्फत विधी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. यावेळी उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायमुर्ती उस्मानाबाद न्यायमुर्ती अरुण रामनाथ पेडणेकर यांचे स्वागत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व मुख्य लोकअभिरक्षक ॲड. अमोल गुंड यांनी स्वागत केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड. श्रीकांत कुलकर्णी यांनी केले. तसेच कार्यक्रम व्यवस्थीत पार पाडण्यासाठी ॲड. अरुणा गवई, शुभम सुर्यवंशी, प्रतिक्षा तोडकर, प्रिती बगाडे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सर्व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट; तणावाचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्रातील चंद्रपूर शहरातील बल्लारपूर शहरात धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. मुस्लिम समाजातील लोक मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यासमोर जमले होते. पोस्ट टाकणाऱ्या व्यक्तीचा तीव्र निषेध केला गेला. काही काळ आंदोलक मुस्लीम तरुणांनी शहराचा मुख्य रस्ताही रोखून धरला होता.घोषणाबाजी करत मुस्लीम समाजातील लोकांकडून त्या व्यक्तीवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.पोस्ट व्हायरल करणाऱ्या गोपाल रेड्डी यांच्या विरोधात पोलिसांनी कलम 255A अंतर्गत गुन्हा दाखल करून संपूर्ण प्रकरण शांत केले.यादरम्यान सुमारे तीन तास परिस्थिती तणावपूर्ण होती.






# क्रुझरची दुचाकीला धडक

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** भरधाव क्रुझर' वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार दोन युवक ठार झाले. बुलढाणा नजीकच्या राजूर घाटात आज दुपारी ही दुर्घटना घडली. मृत नांदुरा तालुक्यातील राहिवासी आहेत. बुलढाणा – मलकापूर राज्य मार्गावरील राजूर घाटातील पहिल्या वळणावर हा अपघात झाला. दोन युवक ( एमएच १४ए ए ८१६१ क्रमांकाच्या ) दुचाकीने बुलढाण्याकडे येत होते. दरम्यान भरधाव येणाऱ्या ( एमएच १४ एच डी ०८६७ ) क्रुझरने दुचाकीला धडक दिली. यामुळे दुचाकीस्वारांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

महाराष्ट्र Business Katta












# अधिक महिना आला रे आला

आधुनिक केसरी

**अधिक महिना जवळ येत होता तसतसे मैत्रिणींचे मेसेज भारंभार येऊ लागले.अधिक महिन्याला पुरूषोत्तम मासही संबोधतात.या महिन्यात पुण्यप्रद कामे करायची असा प्रघात आहे.आणि जनमानसात तो द्रुढ होऊन बसला आहे.त्यामुळे वर्षारंभी जशी माणसे काही संकल्प करतात तसे या महिन्याच्या आधीही काही जण संकल्प करतात काही काही.विशेषत:बायकांचे असतात.एका मैत्रिणीचा मेसेज आला "मी विष्णूचा रोज फोटो स्टेटसला ठेवणार,त्यावर काहीतरी लिहिणार .तर दुसरीने टाकले होते,"मी अधिक महिन्याचे महत्त्व विषद करणारे रोज काही तरी लिहिणार."तर तिसरीने लिहिले होते,"मी रोज एका भुकेल्याला जेवायला घालणार."तर एकीने लिहिले होते. ,"मी तीर्थयात्रा करणार."एकीने लिहिले होते "मी रोज देवापुढे बसून भजन म्हणणार. "एकीने लिहिले होते ,"मी जावयाला चांदीचे ताट देणार"रोज हे मी वाचत होते आणि आपल्याला यातील कोणते जमेल याची चाचपणी करीत होते. जावयाला काही तरी देणे हा सोपा मार्ग दिसत होता.**

तरी तेवढ्याने माझे समाधान होईल असे वाटत नव्हते. आणि काय आश्चर्य एक दिवस जोग बाईंचा मेसेज आला,"आपण शिवतांडव अधिक महिन्यात ऑन लाईन घेणार आहोत.आणि माझा प्रश्न चुटकीसरशी सुटला. मला एवढा आनंद झाला. माझ्या आराध्य दैवताचे स्तोत्र म्हणायचे तेही काही मैत्रिणींचे बरोबर.एक पर्वणीच चालून आली माझ्या समोर. आणि ठरल्याप्रमाणे झालाही क्लास सुरु. स्तोत्र म्हणून संपेपर्यंत समई राहायला हवी याची काळजी घेते आहे. मैत्रिणी दिसतायत रोज ऑनलाईन.श्रद्धा बर्वे, रसिका घाडगे, मालती देशपांडे, ममता, सुरेखाताई,जोगबाई, मधुवंती, वासंती ईत्यादी ईत्यादी. माझ्या श्रद्धा स्थानी असलेल्या शिवाचे स्तोत्र. रात्री ८ते९ वेळ कसा जातो ते कळत नाही. तसे ते पाठ तर आहेच माझे.पण काही चुकीचे उच्चार तोंडात बसलेत ते घालवण्याचा प्रयत्न करते आहे. काही जणी नवीन शिकत आहेत.मजा येते आहे अगदी.तरी मनात थोडी थरथर जाणवतेच आहे कधी कधी. ती का बरे असावी ?विचारते मनालाच कधीतरी. ते म्हणते ,"डोकावून बघ ना त्या आतल्या गुहेत थोडे .मग कळेल तुला त्याचे कारण. नाही नाही म्हणाले तरी डोकावलेच आत. तर दिसल्या तिथे ताई ( आजी )आणि आई. आजीला आम्ही ताईच म्हणायचो. तसे तिचे आई वडील तिला त्याच टोपण नावाने हाक मारायचे. तेच नाव तिचे कायम सर्वांच्या तोंडात बसले. पण त्यांचे चेहरे का मला दिसावेत असे अचानक ? दोघीही आता जाऊन बरीच वर्षे झालीत. पण माझे मन त्यांच्या कडेच धावते आहे. त्या काळात जाण्यासाठी धडपडते आहे. तो काळ किती रूतून बसलाय मनात. अगदी घट्ट. जरा काही झाले की तो येतो असा वर आणि मला घेतो त्याच्या कवेत.तेव्हा असाच अधिक महिना जवळ आला की ताई आणि आईचे बोलणे कानावर पडायचे "अधिक महिना जवळ येऊन ठेपला की ग.वाती वळुन झाल्यात. पुरतील त्या महिनाभर. धोंडे कधी करूयात" ?धोंडे म्हणजे पुरणाची दिंडे. आवडायची तशी ती.पण पुरणपोळी पेक्षा थोडी कमीच. या वर्षी ३३पेढ्याचेच वाण देऊ ब्राह्मणाला. कारण आजीला जावई नव्हता. आणि आईला तेव्हा असायचा प्रश्न नव्हता. श्रावण महिन्यात ग्रंथ वाचन जसे आमच्या घरी चालायचे तसे अधिक महिन्यात ही चालायचे .वेगळाच ग्रंथ लावला होता. पण ताईला व आईला अधिक महिन्याचा ग्रंथ ऐकायचा होता.आप्पांनी तो आणून दिला त्यांना कुठून तरी पण वाचणार कोण ? हा प्रश्न होता.कारण ताईला तर अक्षर ओळखही नव्हती. तिच्या वडिलांनी तिला शिकून दिले नव्हते. ९व्या वर्षी लग्न करून मोकळे झाले होते. आई तशी ७वी पर्यंत शिकली असावी पण अवघड शब्द वाचण्याचे तेही ताईपुढे ,तेवढे धाडस तिच्यात नसावे.मग पहिल्यांदा प्रकाशदादाला विचारले



."मला आल्यावर अभ्यास असतो असे म्हणून तो बाजूला झाला. विकासला जमणार नाही तो लहान आहे यावर दोघींचे एकमत झाले. आप्पा शाळेतून आले तरी त्यांच्या मागे विद्यार्थी असायचे.नाना दुकानात असायचे.मग राहिले मीच.मला आयतीच संधी चालून आली.महादबा गोळेंसारखे आपण पण ग्रंथ वाचन करायचे ही सुप्त ईच्छा होतीच मनात. त्यांनी विचारताच मी पटकन हो म्हणून सांगितले. तरी ताईनी शंका काढलीच ,"तुझी अडचण आली तर मग काय करायचे ?"मी दडपून सांगितले, नुकतीच झाली आहे आता काही काळजी नाही. आणि मग सुरु झाले आमचे वाचन.देवाकडे तोंडकरून मी पाटावर बसायचे. पुढे चौरंगावर पोथी ठेवायचे.. चौरंगाभोवती रांगोळी ताई काढायची. समई जवळ असायची .उदबत्ती पण लावलेली असायची. त्या दोघी भक्तीयुक्त अंतकरणाने ऐकत असायच्या. आता मी काय वाचले ?कुठल्या कथा त्यात होत्या हेही आठवत नाही .आठवतायत त्यांचे ते ऐकण्यात तल्लीन झालेले चेहरे फक्त.

आता अधिक महिना आला की या आठवणी न चुकता मनात रूंजी घालतातच.आणि डोळ्यात पाणी तरळते उगाचच.ताईच्या शरीराचा शेवटी झालेला काटकोन,तरआईची वेडीवाकडी झालेली बोटं .सगळं सगळं चित्र पुढे उभे राहत.आणि वाटत त्या म्हणतील अचानक,"तू वाचशील ना ग आमच्या साठी तो ग्रंथ ?पण असे काही होत नाही. ती चित्रं बोलत नाहीत काहीच. पण डोळ्यात आषाढातील मेघ बरसतात. आजही एवढा व्याप मागे असूनही अधिक महिन्यात काही तरी देवाचे करावे वाटतेच जादा.त्याला आतून काही तरी कारण असेलच की.आई वडील आणि मागच्या पिढीतील लोकांचे रंग रूपच नाही घेऊन येत तर त्यांच्या ईच्छा ही आपल्या बरोबर येतातच.त्या आपण नकळत पूर्ण करत राहतो..आपल्याही ईच्छा पुढच्या पिढीला देत राहतो.

कुणी कोणते वाण कुणाला देईल या महिन्यात माहिती नाही मला. पण काही तरी करून आनंदाचे वाण लुटले तर ते पुण्य जास्त मिळेल आपल्याला. हे वाचल्यावर तुम्हाला आनंद मिळाला तर खूप आनंद होईल मला.पुण्याबाबत मी काय सांगणार तुम्हाला ?तेवढे सांगण्याचा अधिकारही नसेल माझा.

**विधिज्ञा सौ. शुभदा कुलकर्णी.**
**वडूज, ता.खटाव, जि.सातारा**
**९४२१२१४७०८**

# ऋणनिर्देश



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**दुपारी सहज गैलरीत उभी होते. नुकताच पाऊस पडून गेला होता आणि सूर्य हळूहळू डोकावत होता. सोसायटीच्या गार्डन एरिया मधील लिंबाच्या झाडाची सावली थोड्या अंतरावर विसावली होती. नदीच्या काठावरील वाऱ्याची मंद झुळुक आली. नि मनीचे गूज कानी संगुनिया गेली. तेवढ्यात टेबलावरच्या माझ्याच वहिची पाने उगाच फडफडून तंद्रीचा भंग करत होती. आज ही सावली आणि काही दिवसा पूर्वी म्हणण्यापेक्षा वर्षांपूर्वीची ती सावली!**

तो दिवस....! कागद जेव्हा कोरा असतो तेव्हा त्याला किती महत्त्व असते.आणि त्याच्यावर उमटलेली काही अक्षरे जीवनात कधी कधी खूप मोठे बदल घडवून आणतात.मनात विचार येऊन गेला. आणि मनाच्या त्या चलबिचल अवस्थेला कृतज्ञता म्हणून फडफड नाऱ्या त्या पानांवर हात ठेवून बॉक्समधील लेखणी कडे हात वळले. आणि...!

तो दिवस ही असाच, त्या दिवशी आधुनिक केसरी मध्ये प्रकाशित झालेला तो गौरीपूजन चा लेख पाहून आनंदाच्या एका अत्युच्च शिखरावर पोहचले.म्हणजे खरचं आपण निर्माण केलेली कलाकृती ती आपलीच असते.म्हणजे आईला जसे स्वतःचे लेकरू कसेही असले तरी ते प्रियच असते.तसे आपले स्वतःचे लेखन हे स्वतःचे असते. आणि खरोखरच एक लेखिका म्हणून मला असे वाटते ते कसेही असू द्यात पण ते जे काही असते ते फक्त आपले स्वतःचे असते. स्वतःची वेगळी प्रतिमा त्यात उमटवत असते.आणि त्याच आपल्या प्रतिमेला एक स्वतःच असं अस्तित्व प्राप्त होते.त्याचा आनंद शब्दात नाही सांगू शकत.आणि तेच अस्तित्व मिळवून देण्याचे काम आधुनिक केसरी ने अर्थात मा. संजयजी व्यापारी सरांनी केले.

सर आज पर्यंत माझ्या बऱ्याच लेखांना आणि अनेक कवितांना ही प्रकाशात आणण्याचे काम माझ्यातील लेखिकेला अजून वृद्धिंगत करण्याचे काम तसेच चार भिंतीत कुठल्याशा कोपऱ्यात अडकून राहणाऱ्या माझ्या साहित्याला जगाच्या काना कोपऱ्या पर्यंत पोहचविण्याचे तसेच माझ्यातील लेखिकेला वृध्दिंगत करण्याचे काम आपण आणि आपल्या आधुनिक केसरी ने केले.

आधुनिक केसरी न्यूज पेपर हा अतिशय वाचनीय आणि वैविध्यपूर्ण असा आहे. आधुनिक केसरी पेपरच्या माध्यमातून अनेक दिग्गज लेखकांचे लेखन वाचावयास मिळते.ते अंतर्मुख करणारे असते. सुप्रभात पानावरील उसवतीचे रंग, निरूपण, तुकाराम गाथा,आनंदी पहाट,सद्गुरुंचा महिमा वगैरे वैचारिक आणि वाचनीय असतात. साहित्य कला संस्कृती मधून अनेक लेखकांच्या साहित्यातून ललित लेख,तसेच विविध संस्कृतीची ओळख होते. विचार पीठ, रविवार विशेष मधून विशेष सामाजिक राजकीय इत्यादी चा अनुभव येतो. तसेच काव्यधारा मधून मधील कविता वाचताना उमलत्या कळ्या फुलताना दिसत असल्याचा भास होते. राष्ट्र महाराष्ट्र मधून महाराष्ट्रातील माहिती, आज दिनांक, अवती भवती मधून विविध माहिती मिळत राहते. आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावत राहतात. त्यातून साहित्य क्षेत्रात प्रगती होते. वैविध्याने नटलेल्या आधुनिक केसरी ची ओढ लागून राहते. आधुनिक केसरी व्यासपीठा मुळे अनेक दिग्गज व्यक्तीची ओळख झाली. तसेच आधुनिक केसरी व्यासपीठ आणि केसरी कुटुंबाचा मी एक भाग आहे. हे माझे भाग्य आहे.आणि कुटुंबातील व्यक्तींची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भेट झाली न झाली.तरी त्या प्रत्येक व्यक्तीची मी मनोमन आभारी आहे. आधुनिक केसरी आणि आधुनिक केसरी ची संपूर्ण टीमचे मी मनःपूर्वक आभार मानते. ज्यांनी माझ्यासारख्या चार भिंतीत राहणाऱ्या एका गृहिणीला या आधुनिक जगाचा ओळख करून दिली. आधुनिक केसरीची ही वाटचाल उत्तरोत्तर प्रगती ची शिखरे चढत जावी. आधुनिक केसरीचा वाचक वर्ग खूप वाढत जावा. हीच मनस्वी इच्छा.

ऊन, वारा, पाऊस, पाऊलवाटा तुडवित
हि वाट दूरात धावते. विविधतेने मग ज्ञानाच्या
कक्षा रुंदावत जाते. ज्ञानाच्या या वाटेवर अन्
नभीच्या त्या पटलावर चमकावे 'आधुनिक केसरी' नाव ते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लांडोर बंगला (लळींग, धुळे)



आकाश सोनवणे, धुळे

आधुनिक केसरी

**धुळे जिल्ह्यातील लळींग येथील अत्यंत महत्वाचे स्थळ असलेले लांडोर बंगला अर्थात पिकॉक हाऊस येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९३७ साली भेट दिली होती. त्यानी तीन दिवस धुळे शहरातील लळींग किल्ल्याजवळील लांडोर बंगला येथे मुक्काम केल्याचे इतिहासात नमूद आहे.**



पोळा सणात कोणाच्या बैल पुढे असावा या वादावरून शिरपूर न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर युक्तीवाद करण्यासाठी पी.ए. तवर यांच्या वकिल या नात्याने खटला चालविण्यासाठी ३१ जुलै १९३७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुळे शहरात आले. मुंबई ते धुळे असा रेल्वे प्रवास त्यांनी केला होता. शिरपूर येथील त्यांचे न्यायालयीन कामकाज पूर्ण करून त्यांनी धुळे शहरातील संदेश भुमी ट्रावेल्स बंगला येथे पहिले भाषण केले व शहरातील विजयानंद चित्रमंदिर येथील सभागृहात जाहीर सभा घेवून बाबासाहेब यांचे भाषण झाले होते. यावेळी दलित जनतेला मार्गदर्शन केले. त्यानंतर बाबासाहेब धुळ्यातील असंख्य कार्यकर्त्यांसह लळींग येथील विश्वासू सहकारी पुनाजी आण्णा लळींगकर यांच्या सोबत लळींग येथील लांडोर बंगला येथे गेले. आपले आयुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी वाहणाऱ्या बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी पुनाजी आण्णा लळींगकर यांची ओळख होती. त्यांच्या कणखर आवाज व तेवढेच कणखर नेतृत्व ते अधिकच प्रसिद्ध होते. निळी टोपी पांढरा नेहरू शर्ट पांढरा पायजामा खांद्यावर घोंगडी हातात ८ इंच ची काठी असा त्यांच्या पोषक होता. त्यांना बाबासाहेबांनी खान्देश च्या ढाण्या वाघ हि पदवी दिली होती. ते फौजी होते, त्यांना बाबासाहेबांच्या उजव्या हात देखील म्हंटले जायचे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पार्टी या पार्टीचे हि नेतृत्व आण्णासाहेब पुनाजी लळींगकर यांनी केले होते. पुनाजी आण्णा लळींगकर यांच्या हट्टा मुळे बाबासाहेब आंबेडकर यांनी लळींग गावाला भेट दिली होती. बाबासाहेब यांचे भोजन करून लांडोर बंगल्यावर कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी करण्यात आल्या होत्या. या तीन दिवसांच्या मुक्कामात बाबासाहेबांनी कार्यकर्त्यांना, समाजाला आणि लांना मार्गदर्शन केले होते. बाबासाहेबांचा आगमनाची बातमी कळताच धुळे शहरातील व लळींग परिसरातील अनेक गावाच्या असंख्य नागरिकांनी लांडोर बंगल्यावर मोठ्या प्रमाणात एकच गर्दी केली होती. बाबासाहेबांची अहिराणी गाणी म्हणत हातात रूमाल मध्ये बोंबील ची चटणी व बाजरी ची भाकरी हे भोजन घेऊन महिला लांडोर बंगला येथे पोहोचल्या होत्या. उपस्थित जनसमुदाय पाहुन जनसमुहाला संबोधित करून आपला अनमोल संदेश बाबासाहेबांनी दिला होता. त्यात त्यांनी म्हटले होते की अंधश्रद्धा मोडा व आपल्या मुले बाळांना शिकवा मुले शिकलीत तर सामाजिक परिवर्तन होऊन मोठी क्रांती घडेल असा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून दिला होता. डॉ बाबासाहेबांच्या या बंगल्याच्या वास्तुस भेट देण्यासाठी असंख्य पर्यटक येतात. दर वर्षी ३१ जुलै या दिवशी लळिंग येथील लांडोर बंगला परिसरात मोठ्या उत्साहात भीम स्मुती यात्रा भरते व विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील केले जाते. डॉ.बाबासाहेबांनी ज्या बेडवर विश्राम केला होता. तो बेड देखील जतन करण्यात आलेला आहे. तसेच अलीकडे त्याच खोलीत बाबासाहेबांचा एक सुंदर अर्धकृती पुतळा देखील बसविण्यात आलेला आहे. ३१ जुलै १९९२ पासून प्राध्यापक जे.जी. खैरनार यांनी यात्रेची सुरुवात केली आहे. आज या यात्रेचे ३२ वे वर्षे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भेटीला जवळपास आज ८७ वर्षे पूर्ण होत आहेत.

ज्या प्रकारे चैत्यभूमी दादर मुंबई, महु जन्मभूमी व नागपूर दीक्षाभूमी तर थेट लांडोर बंगला धुळे स्मृतीभूमी म्हणून ओळखलं जावं अशी तमाम समाज बांधवांची इच्छा आहे म्हणून बाबासाहेबांनी जो परिवर्तनाच्या संदेश या ठिकाणी दिला होता त्याला उजाळा देण्यासाठी व त्याचे पवित्र स्मृती जपण्यासाठी दरवर्षी या ठिकाणी ३१ जुलै रोजी देशभरातून असंख्य दलित बांधव अभिवादन करण्यासाठी येत असतात. सर्व बहुजन समाजातील लोक, दलित नेते विविध संघटनांचे पदाधिकारी येऊन अभिवादन करतात.

# चित्त मिले तो सब मिले । नही तो फुकट संग।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**अथांग पसरलेल्या निळ्याशार समुद्रात जसं जसं मध्ये खोलवर जावं तसं तसं नवनवीन अनुभूती यायला लागते. अनपेक्षित एकावर एक सृष्टीचे विहंगम अविष्कार समोर यायला लागतात! आपण कधी विचारही केला नसेल असे अद्भुतरम्य दृष्य अचंबित करून टाकतात! एखाद्या निर्मनुष्य जंगलात खूप मध्ये गेल्यानंतर एखादे सुंदर लेणी-शिल्प दिसावे! त्यात खोलवर जायला लागले की; जगातील अप्रतिम नक्षीकामाने सजलेले, कोरीव दगडी बांधकाम आपलं सर्व आयुष्य विसरायला भाग पाडते! जगद्गुरू संत तुकोबांची अभंग गाथा म्हणजे अद्भुत, आखीव-रेखीव अनुभूतींचा अनमोल खजानाच आहे! डोळसच काय एखाद्या आंधळ्याला सुद्धा हा हिरे-माणकांचा कुंभ वेडावून टाकेल!**

सुलभ, साध्या भाषेतून प्रकट होणारा एक एक विचार म्हणजे जणू रत्नांची खानच! तुकोबांच्या गाथ्यात आणखी खोल गेल्यानंतर आपल्या लक्षात येते ती त्यांच्या ज्ञान-भक्ती-वैराग्य-विचारांची प्रचंड लाबी-रुंदी-खोली आणि उंची! हे सर्व मोजायला कोणतेही प्रमाण मात्र सापडत नाही ही विशेष बाब! तुकोबांच्या गाथ्यातून त्यांच्या महत्तम जीवनाचे एक एक पैलू आपल्याला सापडतात.

"तुकोबा एक महान हिंदी कवी आहेत" हे वाचून आणखी एक मोठ्ठा आश्चर्याचा धक्का बसतो. तुकारामांचे हिंदी अभंग वाचतांना "सांख्या" हे प्रकरण लागते. त्यात तुकोबांचे सलग ३० दोहे वाचायला मिळतात. हे तीसही दोहे वाचतांना कुठही आपण तुकाराम गाथा वाचतोय असं वाटत नाही. पहिला ते शेवटचा दोहा वाचतांना आपल्याला कधी संत कबीर, कधी संत मीराबाई, कधी संत तुलसीदास तर कधी संत रविदास वाचत आहोत याची अनुभूती येते! काय प्रतिभा आहे ही? एक अशिक्षित, शेतात काम करणारा, दिवसभर टाळ-वीणा घेऊन हरी हरी करणारा माणूस, एवढी उच्च कोटीची, मोठ्या विद्वानाला लाजवेल अशी हिंदी भाषा! प्रतिभा! कसं शक्य आहे? असे एक ना अनेक प्रश्न! याचं उत्तर म्हणजे तूकोबा! त्याकाळी लिहायला वाचायला शिकले. घरी शेकडो वर्षांची वारकरी परंपरा "वडिलांची मिराशी" असल्यामुळे अनायासे त्यांनी संत कबीर, संत मीराबाई, संत तुलसीदास, संत रविदास ही सर्वच संत मंडळी वाचली. त्यातून मराठी अभंग लिहितांना त्यांना संत कबीर, संत तुलसीदास, संत रविदास, संत मीराबाई बोलत असतील. त्यातूनच तुकोबाराय एवढे प्रतिभा संपन्न दोहे लिहू शकले.

**तुकारामनीती**
**भाग -62**

लोभी के चित धन बैठे, कामिनि के चित काम। माता के चित पूत बैठे, तुका के मन राम ॥ (११७५)

तुका बड़ो न मानूं, जिस पास बहुत दाम। बलिहारी उस मुख की, जिस ते निकसे राम ॥ (११७९)

तुका कुटुंब छोरे रे लड़के, जीरो सिर मुंडाय। जब ते इच्छा नहिं मुई, तब तूँ किया काय ॥ (११९८)

हे दोहे वाचतांना सर्वार्थाने जगद्गुरू तुकोबांची प्रतिभा दृगोचर होते. दोहा म्हणजे दोन ओळीतून आपल्याला जे सांगायचे ते प्रतिपादन करणे. संत कबीरांच्या वंशावळीतील रोखठोक लोककवी असलेले तुकाराम कुठेही लपत नाहीत. आपल्या अस्खलित मराठी अभंगांप्रमाणे हिंदी अभंगातून सर्वांना रोखठोक प्रश्न विचारतात.

संत तुकाराम महाराजांचे हे तीस दोहे त्यांच्या गाथ्यातील इतर मराठी अभंगापेक्षाही जास्त आक्रमक आणि रोखठोक आहेत. वरील तीन दोह्यांचे सूक्ष्म अवलोकन केले असता महाराज सामान्य माणसांचे गुणधर्म कथन करतात. लोभी माणसाला संपत्ती, कामुक माणसांना स्त्री-काम, आईला आपला मुलगा आवडतो परंतु तुकोबांना केवळ ईश्वर गुण आवडतात. ज्यांच्याकडे केवळ पैसे आहेत त्यांना तुकोबा मानत नाहीत, परंतु ज्यांच्या मुखातून महान माणसांची नावे येतात त्यांचा मात्र तुकोबा सन्मान करतात. तुकोबांचे हे दोहे वाचतांना सहजच आपल्याला संत कबीरजी यांचे

माया मरी न मन मरा, मर मर गये शरीर। आशा तृष्णा ना मरी, कह गये दास कबीर ॥

या दोह्यांची आठवण होते. हेच काय असे अनेक दोहे सहज नजरेसमोरून जातात. या दोन्ही संतांची नाळ एकच वाटते. आपल्या सडेतोड लेखणीने समकालीनच काय सर्वकालीन लोकांमध्ये विचारांची खळबळ निर्माण करण्याचे काम हे संतद्वय करतांना दिसतात.

संत तुकोबांचे हे दोहे वाचतांना सरळ ते संत कबिरांची जातकुळीचा मागोवा घेतांना दिसतात. संत कबीर आणि संत तुकारामांची तळमळ सारखीच दिसून येते. या दोघांनी समकालीन समाजात सद्विचारांची पेरणी करतांना आपल्या रोखठोक विचारांशी कधीच तडजोड केली नाही. हिंदी भाषेत अस्खलित लेखन करतांना तुकोबा तेवढेच शक्तिशाली दिसतात. आजचा शीर्षकाचा चित मिले तो सब मिले ।नही तो फुकट संग ।पानी पथर येक ही ठोर ।कोरन भिगे अंग ॥

पुन्हा एकदा तुकोबाराय मानवी मनाला अनन्यसाधारण महत्व देतांना दिसतात. कोणत्याही कामात माणसाचे मन किती सहभागी असते यावर त्या कामाचे यशापयश अवलंबून असते. याच अनुषंगाने माणसाच्या कार्यात जर मन असेल तरच ते कार्य शेवटाला जाते,



अन्यथा ज्याप्रमाणे दगडावर कितीही पाणी टाकले तरीही दगड कोरड्याला कोरडाच राहतो. त्याप्रमाणे आपण कितीही काम करत असलो आणि त्यात जर आपले लक्ष नसेल तर ते काम सफल होणारच नाही. याच अनुषंगाने तुकोबाराय माणसाने आपले मन आपल्या कार्याला समर्पित करण्याचे आवाहन करतात.


तुकाराम नीती लिहितांना जगद्गुरू तुकोबांचे लेखनातील आणि त्याच अनुषंगाने त्यांच्या अलौकिक, क्रांतिकारी जीवनातील विविध पैलू समोर आलेले पाहून एकावर एक आश्चर्याचे धक्के बसत जातात. बऱ्याच वाचकांना तुकोबांचे हिंदी भाषेतील काही अभंग माहित आहेत, मात्र तुकोबांचे दोहे खूपच कमी लोकांना माहित आहेत. आपण सर्वांनी संत तुकाराम महाराजांची गाथा वाचून त्यातील त्यांचे दोन ओळींचे हिंदी अभंग म्हणजेच तुकोबांचे दोहे वाचन करायलाच हवे. हिंदीतील लोककवी तुकाराम वाचल्यानंतर आपल्याला तुकोबांच्या लेखन-विचारांचा आवाका सहज लक्षात येऊन जाईल. वारंवार तुकोबा वाचतांना आपली आपल्याला कीव यायला लागते. आपण एवढे शिकलो, आपल्याकडे एवढ्या पदव्या असून, सर्वच सोयी-सुविधा आपल्या पायाशी लोळण घेत असतांना आपण आपला भोवताल तुकोबांसारखा प्रवाही ठेऊ शकत नाही याची खंत वाटते! आज बरेच लोक विविध माध्यमातून लिहित असतांना तुकोबांवर खूप कमी लोक लिहित असतात. यापुढे जाऊन संपूर्ण मराठी तुकोबा हिंदी आणि इंग्रजीत यायला हवेत. असे झाल्यास खऱ्या अर्थाने तुकाराम जगासमोर आणखी मोठ्या प्रमाणात येतील. त्यांच्या विचारांचा परीघ जगभर विस्तारला जाईल. याच्या सोबतीने वर्तमान काळातील व्याख्याते, कीर्तनकार, प्रवचनकार मंडळींनी आधुनिक, बदलत्या परिपेक्षात तुकोबांचे विवेचन करणे अगत्याचे आहे. असे झाल्यास सडेतोड तुकोबा लोकांसमोर येतील. समाजमनाचा तळ ढवळण्याचे महत्कार्य तूकोबांनी केले आहे याची जाण आणि तसे भान समकालीन वाचकांना आणि समाजाला येईल. यातूनच माझ्यासारखे अनेक लोक मिडीयावर लिहायला लागतील. सर्वत्र विचारांचे चिंतन-मंथन सुरु होईल. असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने जगद्गुरू तुकाराम महाराजांची समकालीनता समाजात खोलवर रुजायला लागेल. त्याचबरोबर तुकाराम केवळ वारकरी, भजनकरी न राहता ते एक मोठे विचारवंत, कृतीशील समाजसुधारक होते याचा प्रसार होईल! असे झाले म्हणजेच सर्वच अक्षरांचे सार्थक झाले असे म्हणता येईल! जय तुकोबाराय!

# तू जे लिहिशील ती कविता

आधुनिक केसरी

**महाकवी वाल्मिकी चा पहिला श्लोक स्फुरला तो करुण व रोष भावदशेतून. तसं पाहिलं तर त्या काळात शिकार करणे सामान्य गोष्ट होती. पण ज्या प्रणयावस्थेत क्रोंच पक्षाचे प्राण घेतले गेले त्या प्रसंगामुळे कवीचा संताप अनावर झाला व क्रोंच पक्षाबद्दल निर्माण झालेल्या शोक भावनेचे श्लोकात अवतरण झाले. आज आधुनिक भारतीय साहित्यातून हे भावतत्त्वच घायाळ, निष्प्राण झाले आहे. वास्तववादाच्या विस्तवाने सर्वत्र आग पाखड केली आहे. त्यामुळे बऱ्याच कथा, कविता, कादंबरीत भावतत्त्वाची राख रांगोळी झाली आहे. साहित्य निरस व विद्रूप झाले आहे. अशा विचित्र प्रदूषित वातावरणात मीरा सारख्यांच्या कविता आमच्या संवेदनांना उजळतात. आरंभापासून शेवटपर्यंत या बियांड किंवा परातत्त्वाच्या अध्यात्माच्या कविता आहेत. पण यात चिंतनाची किंवा दर्शनशास्त्राची कोरडी व्याख्या नाही. या कवितेतील सहज, सरस, एकांकिक अध्यात्म भाव सुखावणारा आहे. आध्यात्मिक कविता लिहिण्या, वाचण्या, समजण्यासाठी आध्यात्मिक अंगाची जाण असणे आवश्यक असते.**

पण ' भावांजली 'संग्रहाच्या कवितांचे वैशिष्ट्य हे की एक सहज अध्यात्मिक बोध असणारा संस्कारशील वाचक सुद्धा या कवितांशी एकरूप होऊ शकेल. अध्यात्माला व्यवहारिक, सांसारिक पातळीवरच उतरवण्याचा प्रयत्न यात आहे.



" राजा आसनस्थ व्हावा/तसाच तू आत्मस्थ झाला आहेस/दीर्घ आणि मंद श्वासाच्या अश्वावरून/जीवनाच्या अनंत मार्गांना/सरलत्व प्रदान करण्यासाठी..."(चाहूल)

या कवितांचे एक वैशिष्ट्य म्हणजे बऱ्याच कवितेत ' नर में नारायण ' दर्शनाचा मानवीय ध्यास दिसून येतो. योगेश्वर कृष्णाने तर गीतेत सृष्टीच्या 75 विभूतींमध्ये आपल्या अस्तित्वाचा उल्लेख केला आहे. संकलना च्या पहिल्या कवितेतच श्रीकृष्ण म्हणतो, " मी इथे आहे/इथे ही आहे/पूजेचा मोह कशाला? (पूजा) किंवा "या हातांना तुझ्या अनंत रूपाचे अश्रू पुसण्याचे दान दे/दरिद्री नारायणाच्या सेवेचे वरदान दे." (मौन संमती) विवेकानंद म्हणतात-" बहुरूपे सन्मुख तोमार छाडि/को धाय खुजिछो ईश्वर" आहे तशा जगातच कवींना जगायचे असते.

कवींचे कल्पना विश्व भलेही रंगा छंदानी बहरलेले असेल पण शेवटी वास्तवाचे चटके त्याला सोसावेच लागतात. त्यात ही आपल्या जीवन मूल्यांवर टिकून राहण्यासाठी जीवघेणी कसरत करावी लागते. " मी करते/आणि प्रत्येक वेळी/अर्ध्या वाटेवरच/प्रसंगाचे वारे/माझी भाव ओंजळी उधळून टाकते. (वचन) खरा कवी प्रवाहात वाहून जाऊ शकत नाही. भावांजली च्या काही मोजक्या कवितांमध्ये सामाजिक व मानवी विकृतीवर अल्प शब्दात संयमात सात्विक राग व्यक्त झाला आहे. अशा प्रसंगावर नव कवींनी पाण्याच्या पानेच्या पाने आग ओकली आहे. आदळ-आपट केली आहे. यासाठी सुद्धा हा काव्य संग्रह स्तुत्यच म्हणावा लागेल. नव्हे हे या लेखणीचे सुसंस्कृत वैशिष्ट्य आहे-"तू माझ्या सोबत जे वाटसरू नेमलेत ना/ते सहप्रवासी कमी आणि फार वेळा/अपव्ययी अधिक ठरतात/" (कातर नजरेचा करुणामय सोहळा).

"वैमनस्याच्या गहन तिमिराचा/बंधुत्वाच्या प्रकाशात नाश व्हावा" (क्रांतीसुर्य) अशा पवित्र उजाळलेल्या ओळी मंत्र वा श्लोक बनून व्यक्त होतात.महात्मा गांधी म्हणत "जो खरं बोलतो, तोच सर्वात मोठा कवी." याचा अर्थ कवितेत खरं बोलणाराच श्रेष्ठ कवी. राग, लोभ, प्रतिष्ठा अशा विकारांची कबुली यात आहे. हा लढा केवळ दुसऱ्यांबरोबर नाही, विकृती बरोबरच नाही तर स्वतःच्या षडरिपू बरोबर सुद्धा आहे. याबाबत ची स्वीकृती म्हणजे या कवितांचे व कवयित्रीचे वेगळेपण होय. कारण त्यासाठी विशेष संस्कारक्षम, सत्वशील मन लागते- मनाच्या भोवती नेहमीच/षडविकारांच्या सैन्याने वेढा दिला/कधी चाल केली... (लढाई).

'कुरुक्षेत्र' ही कविता या दृष्टीने फार बोलकी आहे. या कवितेतील सगळा नाट्यमय प्रसंग, त्यातील संवाद व व्यक्त झालेला विचार कवयित्रीच्या प्रतिभेची व चिंतन सामर्थ्याची साक्ष देतो - "त्यांच्यावर नव्हे स्वतःवर/तुझ्यातील अहंकाराचे हत्ती/अपेक्षांच्या घोड्यांवर स्वार/स्वार्थाचे सैन्य, वासनेचे पायदळ यांना नामशेष कर..."

हिंदी भाषेचे सुपरीचीत कवी हरिवंश राय बच्चन आपल्या आत्मकथेत लिहितात की कविता लिहिण्याची नाही जगण्याची वस्तू आहे व कवितेचं जगणं जगण्याचे सर्वात कठीण कार्य आहे. 'पोहच पावती' या कवितेत कवयित्री संकल्प सोडते की- "अर्जुनाला गीता सांगितली खरी पण/तुझ्याकडून तर ती जगवून घेण्यासाठी मी आलो आहे. (कुरुक्षेत्र)



संग्रहातील त्या कविता अधिक मनमोहक झाल्या आहेत जिथे कवयित्री ईश्वराची प्रार्थना आराधना करते अथवा आपला समर्पण भाव व्यक्त करते- "आणि ही पंच इंद्रिये म्हणजे/तुझ्या पूजेसाठी सुशोभित/केलेले ताटच नाही का? (आनंदवन)

"तुझ्या कोणत्या रूपावरून/प्राणाचा दीप ओवाळू? म्हणजे/माझे जीवनच तुझे औक्षण होईल?" (औक्षण)

"हृदय कमळातील इच्छा रुपी कमलाक्षीने/केवळ तुला आणि तुलाच वरले आहे. (तुझी भार्या)

श्री कृष्णा सोबतची भावनिक एकरूपता, जवळीकता, रुसवे-फुगवे, लाघवी तक्रार, विनवणी, विश्वास अशा अनेक भाव दशा या कवितांमधून व्यक्त झाल्या आहेत. अशा प्रसंगात भाषा अपसुकच अति मधाळ व लाघवी झाली आहे. या मुळे या कवितांनी एक साहित्यिक उंची प्राप्त केली आहे. या संग्रहातील प्रत्येक कविता जणू उजव्या हातानेच लिहिली गेली आहे. डावी कविता यात शोधून देखील सापडली नाही. कुठे ही पुनरावृत्ती नाही. कुठे ही निरसता नाही-"बोलना/शब्दातून नाही/निदान डोळ्यातून/तरी बोलना." या काव्य संग्रहाच्या काही कविता पहाट आणि सायंकाळच्या मोहक वातावरणावर लिहिलेल्या आहेत. कुठं तरी वाचलं होतं की रवींद्रनाथ दर दिवशी नित्य नेमाने सूर्य दर्शनासाठी घराच्या छतावर जात असत. अथर्व वेदात तपस्वी कवी म्हणतो-"पश्य देवस्य काव्यम/न मामार न जीर्यते! देवाच्या कवितेला, उशिरा पहा ती कधी मरत नाही, कधी जीर्ण होत नाही." या ही पुढे जाऊन हे म्हणणं किती खरं आहे की,"तुझी प्रत्येक हालचाल सूर ताल असलेले लयबद्ध गीत आहे/ब्रम्हलीन करणारे..."(कविता)

निसर्गा सोबतच समस्त प्राणी जगत व मानव सृष्टीत ईश्वराचा अंश आहे. गायत्री मंत्राचा ऋषी कवी प्रार्थना करतो 'भर्गोदेवस्य धिमहि' विनोबा अनुवादात म्हणतात, तेज देवाचे ध्याऊया देवाच्या तेजाचे ध्यान करूया. नव्हे नव्हे ते धारण करूया. या संग्रहातील बऱ्याच कवितेत हा विचार वारंवार आला आहे - "आणि तुझ्या मुख मंडलावरील तेज/माझ्या हृदयात वितळत आहे." (प्राजक्त पहाट) "मी धन्य झाले आहे/तुझा अंश होऊन"(अंश) "माझ्या प्रत्येक जबाबदारीत/तुझे तेज चमकते"(प्रतीक्षा) या कविता वाचताना टागोरांच्या प्रसिद्ध कवितेची 'चित्त जेथा भय शून्य...'(गीतांजली) एक ओळ सारखी आठवत होती. "जेथा वाक्य हृदयेर उत्समुख हते..." अर्थात जेथे वाक्य हृदयातून उचंबळून व्यक्त होतात, माझ्या देशाला तिथे घेऊन चल. मला वाटते भारतीय साहित्याचा खरा स्वर्ग तिथेच आहे.

रशियन अवर भाषेचा कवी हमजातोव रसूल म्हणतो की गद्य घोड्यावरची स्वारी आहे पण कविता फायटर जेट प्रमाणे वेगवान असते. कोणताही वेळ न दवडता आपल्या लक्षात कडे झेप घेऊनच विराम घेते. भावांजली या संग्रहाच्या कवितांमध्ये ही बाब प्रकर्षाने जाणवते. या कवितांमध्ये कुठेही आघळ-पाघळ पणा नाही. शब्दांची आरास नाही. अनावश्यक निसर्ग वर्णन नाही.

मुक्तछंदातील या कवितांची प्रसंग व विषयानुरूप आपली लय आहे. शब्द किंवा अर्थाच्या सोबत जाऊन तर या लयीला ऐकण्याचा प्रयत्न केला तर जाणवेल की-देवळातील घंटेचा निनाद यात आहे. ज्यात भक्ताची श्रद्धा, विनवणी, प्रेम व्यक्त होत आहे. गुरुदेव टागोरांच्या कवितेच्या ओळी आहेत-बाजे बाजे रम्य विना बाजे/विना रणन सुनि जे/प्रेमे-प्रेमे बाजे. भावांजली संग्रहाच्या एका कवितेच्या ओळी आहेत- "प्रभू हा श्वास होऊ शकेल एक अविट राग/आणि मधुर संगीत होईल हे जगणे? तुझ्यातच लुप्त होईल प्रत्येक सूर..."(समर्पणाचे अपूर्ण संगीत)

भावांजली संग्रहाच्या कविता वाचताना निश्चितच आपण सुखावतो काहीतरी नाविन्य यात जाणवते. हा संग्रह जणू अध्यात्माच्या धाग्यात गुंफलेला भाव फुलांचा हार आहे. या हाराला आपल्या ओंजळीत घेऊन कवयित्री मीराने आपल्या आराध्य देवतेच्या व भारतीय साहित्याचा साहित्याचा रसनायक श्रीकृष्णाच्या चरणी अर्पिला आहे व आपली ओंजळ रिती केली आहे. काव्य संग्रहाचे मुखपृष्ठ फार वेधक व बोलके आहे. काव्य संग्रहाच्या मुख्य आशय विषयाशी ते निगडित आहे. निळ्या सावळ्या कृष्णवर्णीय मोर पंखा समोर भक्ती भावनेची उमललेली श्वेत फुलाची पाकळी पाकळी बरेच काही सांगून जाते. सरते शेवटी आम्ही आशा करतो की अशा प्रकारचे तुमचे काव्यसंग्रह पुढे ही भारतीय साहित्याला समृद्ध करत राहतील. तुमच्याच शब्दात सांगतो- 'तु जे लिहहशील ती कविता......

**-प्रो. डॉ. महेंद्र ठाकुरदास, पुणे.मराठी हिंदी भाषा तथा लोकसाहित्याचे चे विद्वान**

**नाव - भावांजली**
**कवयित्री - मीरा निचळे**
**संपर्क -9284049765**
**प्रकाशन - ग्रंथाली, मुंबई**
**किंमत - 150**
**पृष्ठ -125**

# मोबाईलच्या पिंजऱ्यातून सुटताना



सागर ननावरे, पुणे
प्रख्यात स्तंभलेखक

आधुनिक केसरी

**तुम्ही कधी 'मोबिया' हा विकार ऐकलाय ?  हे काय आता नवीनच ? आधीच कोरोनाच्या नवनव्या व्हर्जन्सने जगणे मुश्किल करून टाकलेले असताना आता हा कोणता नवीन आजार आला बरं ! असा विचार तुमच्या मनात नक्कीच आला असणार. कारण आपण 'फोबिया' हा तीव्र भीतीचा मनोविकार नक्कीच ऐकलेला असेल. भीती वाटणे ही फार सामान्य आणि नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु जेव्हा हीच भीती तीव्र आणि अवास्तव वाटू लागते तेव्हा मात्र 'फोबिया' नावाचा मानसिक विकार झाला असे म्हटले जाते. परंतु आता हे 'मोबिया' प्रकरण काय आहे फोबियाचा पुढचा टप्पा तर नाही ना अशी शंकाही आपल्या मनात निर्माण झाली असेल.  परंतु असे काहीही नाही हा विकार वैगरे काही नाही.**

तर मोबाईलच्या अतिवापराची मनाला लागलेली सवय किंबहुना अतिवापराचा प्रकार असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मोबाईलमुळे आपल्याला आनंद मिळतो असे वरवर दिसत असले तरी आपल्या शरीरात नेमके काय बदल घडतात हे समजून घेणे गरजेचे आहे. कोणत्याही आनंदाचा, कृतीचा संबंध हा थेट आपल्या मेंदूशी जोडलेला असतो. याबाबत अनेक मनोविकारतज्ज्ञांनी संशोधनाअंती भाष्यही केले आहे. आपल्या मेंदूमध्ये डोपामिन नावाचे एक रसायन असते. जेव्हा एखाद्या विशिष्ट कृतीतून उद्दिपीत होऊन हे डोपामिन स्रवते तेव्हा तात्पुरती आनंदाची भावना निर्माण होत असते. आणि यामुळेच ती कृती पुन्हा पुन्हा केली जाते. मोबाईलच्या सवयींबाबतही असंच घडतं. लोक प्रत्येक कृतीमधून मिळणारं डोपामिन घेण्याऐवजी मोबाईल किंवा व्यसनातून ते सहज लगेच मिळवण्याकडे जातात. आणि त्यामुळे ते अधिकाधिक त्या चक्रात गुंतत जातात. आणि यातूनच पुढे मोबाईलची सवय ही कधी व्यसन बनून जाते हे साधे लक्षातही येत नाही.

हल्ली प्रत्येकाच्या हातात, घराघरात मोबाईल आले आहेत. मानवाच्या मूलभूत गरजा या अन्न, वस्त्र आणि निवारा या आहेत हे आपणास ठाऊक आहेच. परंतु आता प्रो-मूलभूत गरज मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. या तिन्ही गोष्टी आधुनिक तंत्रज्ञानाचाच एक भाग आहेत. ज्यामुळे जगात निश्चितच एक क्रांती घडून आली आहे. डिजिटलायझेशन मुळे जग जवळ आले आहे. ऑनलाईन माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यात जाणे सहज शक्य झाले आहे. स्मार्टफोनमुळे घर बसल्या अनेक गोष्टी करणे शक्य झाले आहे. ज्ञानाची द्वारे उघडी झाल्याने ज्ञानकक्षा रुंदावल्या आहेत . आणि यासह अनेक फायदे या डिजिटल क्रांतीने घडवून आणले आहेत.   परंतु ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीला देखील दोन बाजू असतात. एक सकारात्मक परिणाम दर्शविणारी तर दुसरी दुष्परिणाम दाखविणारी. हेच या मोबाईलच्या प्रगत तंत्रज्ञानालादेखील लागू होते. त्याचे जेवढे अगणित फायदे आहेत तसेच अनेक तोटेही आहेत. आणि यातील सर्वांत महत्वाचा तोटा म्हणजे अतिवापराचा दुष्परिणाम. मराठीत एक म्हण आहे 'ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये'. हीच म्हण मोबाईलच्या अतिवापरालाही लागू होते. ऊस मुळासकट खायचा प्रयत्न केल्यास ज्याप्रमाणे उसाचा वरचा गाभा कमी प्रमाणात गोड, मधला गाभा सुमधुर तर मुळाचा भाग मात्र तोंडात माती नेतो. तसेच मोबाईलच्या अती वापराने आयुष्याच्या स्वप्नांची माती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण या आभासी जगात माणूस हरवल्यास प्रत्यक्ष जीवनातील त्याचे अस्तित्व तितके प्रभावी ठरणार नाही.

आज आपण आपल्या आजूबाजूला सहज नजर फिरविली तर आपल्याला असे दिसून येईल की लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण मोबाईल घेऊन बसलेले असतील. पूर्वी जपमाळ, एखादे पुस्तक आणि पाण्याचा तांब्या उशाशी ठेऊन झोपले जायचे. पण हल्ली लोक रात्री झोपताना आपल्याजवळ स्मार्टफोन घेऊन झोपतात आणि सकाळी उठल्यावर झोपेतून पहिल्यांदा मोबाईल चेक करतात. जर तुम्हाला सुद्धा सकाळी झोपेतून जागे झाल्यावर मोबाईल वापरण्याची सवय असेल तर ही सवय भविष्यात घातक ठरू शकते. या सवयीमुळे तुम्हाला अनेक आजारांना सामोरे जाण्याची शक्यता सुद्धा वर्तवली गेली आहे , असे एका संशोधनात देखील सिद्ध झाले आहे. मोबाईलच्या अतिवापराने दृष्टिदोष ,ताणतणाव, चिडचिडेपणा, डोकेदुखी, एकाग्रता भंग होणे, अनिद्रा, नकारात्मक दृष्टिकोन, नातेसंबंधात दुरावा, डिप्रेशन अशा एक ना अनेक समस्या उदभवू शकतात.

आणि म्हणूनच मोबाईलचा वापर कामापुरतेच होणे गरजेचे आहे. मोबाईलच्या आहारी गेलेल्या व्यक्तींसाठी काही उपाय अवश्य नमूद करावेसे



वाटतात.

१. मोबाईल उपवास - महिन्यातील किंवा आठवड्यातील एक दिवस आपल्याला मोबाईल उपवास म्हणून पाळायचा आहे. यात मुख्य कामे वगळता सोशल मीडिया आणि तत्सम गोष्टी पूर्णपणे बंद ठेवायच्या. यातून आपल्यामध्ये बरेच सकारात्मक बदल घडलेले दिसून येतील.

२. मोबाईल वेळापत्रक - ज्याप्रमाणे आपण आपल्या दैनंदिन कामांचे वेळापत्रक करून नियोजन करतो.  तसेच मोबाईलच्या वापराबाबतही करायला हवे. दररोज केवळ ३० ते ४५ मिनिटे एवढाच अधिकाधिक वापर असावा. यातही अनावश्यक चॅटिंग, सर्फिंग ला आळा घालावा.

३. स्क्रीन टाइम ॲप - आपण मोबाईलचा किती वापर करतो हे समजल्यास आपल्याला हळूहळू तो कमी करता येऊ शकतो. यासाठीच याच तंत्रज्ञानातून काही ॲप्स विकसित केले गेले आहेत.  यातून तुम्ही किती वेळ स्क्रीनवर असता ? नेमकं कोणतं ॲप किती वेळ वापरता इथपासून सर्व बाबी नोंदविल्या जातात. यामुळे तुम्ही कोणत्या ॲपवर किती अनावश्यक वेळ वाया घालवत आहात हे ठरवता येऊ शकतं. एखाद्या ॲपचा अतिवापर होत असल्यास ठराविक वेळेनंतर ते आपोआप बंद कसे होईल यासारखे फायदेही यात आहेत.

४. छंद देतील आनंद - मोबाईल वापराऐवजी आपल्याला  भावणाऱ्या गोष्टी, खेळ, वाचन  किंबहुना छंद जोपासता आले पाहिजेत. या छंदांच्या प्रत्येक कृतीतून आपल्याला आनंद मिळणार असून कल्पनाशक्तीला देखील चालना मिळणार आहे.

५. मेडिटेशन- मेडिटेशन च्या माध्यमातून स्वतःला स्वयंसूचना देऊनही आपण मोबाईलचा वापर कमी करू शकतो. मात्र स्वयंसूचनांचे काटेकोर पालन होणे गरजेचे आहे.

६. जागाबदल - अनेकदा खिशात हात गेला कि आपण मोबाईल हातात घेऊन पाहत बसतो. अशावेळी आपण मोबाईल ची जागा सातत्याने बदलायला हवी. मग ती खिशात, गाडीत किंवा आपल्या आजूबाजूची नेहमीची असो.

७. नोटिफिकेशन्स बंद - मोबाईलचे स्क्रीनवर दिसणारे नोटिफिकेशन्स आपले मन विचलित करतात. परिणामी आपण हातचे काम सोडून अनावश्यक गोष्टी पाहत बसतो. यासाठी मोबाईलच्या सेटिंग मध्ये जाऊन नोटिफिकेशन्स बंद करून टाकाव्यात. जेणेकरून आपल्याला अनावश्यक मोबाईलचा वापर कमी करता येईल.

८. इंटरनेट बंद - मोबाईलच्या इंटरनेटचा वापर फक्त कामापुरताच करा. जेणेकरून इंटरनेट बंद असल्याने त्यावेळी मोबाईलकडे जास्त लक्ष जाणार नाही.

९. कुटुंबाला वेळ द्या - सतत मोबाईलवर राहण्यापेक्षा आपल्या कुटुंबाला, मित्रपरिवाराला, आप्तेष्टांना वेळ द्या. त्यांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन सुसंवाद वाढवा. याने आपोआपच आपले मोबाईलकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होईल.

असे एक ना अनेक उपाय करून आपण मोबाईलच्या व्यसनापासून सुटका मिळवू शकतो. परंतु यासाठी सर्वात महत्वाची गरज आहे ती आपल्या इच्छाशक्तीची. आपली आंतरिक इच्छाच आपल्याला यातून बाहेर काढू शकते.  लक्षात ठेवा मोबाईल आल्यापासून हे जग बिघडलं नाही. लोकांना चांगलं ते घ्यायचं आणि वाईट ते सोडून द्यायचं ! हे कळत नाही. चांगल्या गोष्टी दुर्लक्षित करायच्या आणि जे वाईट आहे ते चघळत बसायचं, मोबाईलच नाही तर सगळ्या आधुनिक सुखसोयींबाबतीत लोकांची हीच विचारसरणी आहे. काळानुसार बदल घडत गेले. आणि ते आवश्यकही आहेत. आपणही त्याचा वापर करून उपयोग करतो. याचं भान ठेवायला हवं. चला आजपासूनच या व्यसनापासून दुसरं राहण्यासाठी स्वतःला आणि आपल्यांना साद घालूया.

# सुशिक्षित माणसं भोंदूगिरीच्या चक्रव्यूहात अव्वल स्थानी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**शिक्षण म्हणजे जीवनातील ज्ञान  सुर्य असतो .पण हाच ज्ञान सुर्य आपल्या जीवनात प्रकट होऊन देखिल आयुष्यातील अंधकार जर संपुष्टात नसेल तर मग कठिण आहे. सुशिक्षित म्हणजे ज्ञानी असं साधारणतः आपण समजतो पण सध्या राज्यात जी काही आकडेवारी आणि घटना समोर येत आहेत त्यावरून उच्च शिक्षित सुशिक्षित माणसं हेच भोंदूगिरी च्या चक्रव्युहात अव्वल स्थानी असल्याच स्पष्ट होत आहे.विवेक जागृत ठेवून ज्ञान सदृश, सत्य स्वीकारणारी श्रद्धा असेल तर मनात अंधश्रद्धा निर्माण होत नाही आणि मनात अंधश्रद्धा निर्माण झाली नाही तर मग भोंदूगिरी कडे मन धावत नाही.  उलटपक्षी श्रम न करता अथवा प्रयत्न न करता भौतिक साधन संपत्ती मिळावी अथवा जीवनातील काही विशिष्ट समस्या ज्या सार्वजनिक करता येत नाहीत, अशा समस्या संपुष्टात याव्यात यासाठी शोधलेला मार्ग भोंदूगिरीकडे घेऊन जातो. सत्य आणि असत्य समजलं पाहिजे.**

सत्य समजलं आणि विवेक जागृत असेल तर आपण या मार्गावर जाणार नाहीत. अशिक्षित माणसं भोंदूगिरी च्या चक्रव्युहात अडकण स्वभाविक आहे कारण त्यांच्या मध्ये शैक्षणिक अज्ञान असल्याने त्यांची फसगत होणे अथवा प्रसंगानुरूप ते एखाद्या चक्रव्युहात आडकण इथं पर्यंत ठिक आहे. कारण ते बोलून चालून अशिक्षित आहेत अज्ञानी आहेत हा त्यांच्यावर शिक्कामोर्तब आहे.पण सुशिक्षित सज्ञानी माणसं देखिल भोंदूगिरी च्या चक्रव्युहात आडकत आहेत हे दुर्दैव आहे . जीवनात समस्या निर्माण होण नैसर्गिक आहे .अनेक समस्या गुंतागुंत हि आपल्या काही चुकीच्या निर्णयामुळे निर्माण होत असते वेळ निघून गेल्यावर आपल्याला चुका उमजतात आणि मग आपण त्या मधुन आपली सुटका करून घेण्यासाठी आपल ज्ञान वापरण्या ऐवजी भोंदूगिरी वापरतो. आणि त्या मधुन सुटका होण्या ऐवजी जास्तच अडकत जातो व शेवटी आपण भोंदूगिरीचे शिकर ठरतो .जीव , जीवात्मा, संसार समजला तर चुकीच्या घटना घडामोडी घडत नाहीत. सत्य स्वीकारता आलं पाहिजे सत्य स्वीकारलं तर जीवनातील बहुतांश समस्या अडचणी कमी होतात.जीवनाच्या संदर्भात ज्ञान, मोह , माय, हे सगळं व्यवस्थित पणे समजलं आणि कर्म कर्तव्य जबाबदारी निती, न्याय, धर्म संस्कारा यांचा पालन व्यवस्थित केले तर जीवनातील दुःख हे आपोआप कमी होईल. सृष्टी वर आपल्या मनासारखं काही घडत नसतं अथवा घडणार नाही हे वाक्य व्यवस्थीत समजलं आणि पचवता आलं तर डोक्यात भोंदूगिरी शिरकाव करत नाही . विश्वास संपुष्टात आला आणि आत्मबल कमी झालं कि बुद्धी आपोआप लोप पावतो आणि होश संपुष्टात येतो एकदा होश संपुष्टात येऊन बेहोश झाल्यावर आपण काय करतोय हे आपल्यालाच कळत नाही उलटपक्षी आपण केलेली कृती कशी खरी आणि सत्य आहे हे आपण पटवून देण्यासाठी प्रयत्नाशील असतो .मग आपल्या संपर्कातील इतर अनेक सहकारी सुद्धा आपल्यावर विश्वास ठेवून हा मार्ग स्वीकारतात. पण हे सगळं का घडतंय हे महत्वाचं आहे. जीवन विषयक आवश्यक ज्ञान आपण अर्जित केलं पाहिजे. प्रत्येक दुःखाचं मुळ अज्ञान आणि मृगजळ असतं. आत्मा अमर आहे शरिर नश्वर असुन जीवन हे क्षणभंगुर आहे तर मग दुःख कसलं .पण हे कळुन उमजत नाही म्हणून जीव संसारात अडकतो .आणि साक्षीभावाने राहता येत नसल्या कारणाने आपण लोकांना दाखविण्यासाठी अनेक उपद्व्याप करतो त्या मुळे अशा बाबी घडतात.जीवनातील प्रत्येक दुःखावर अडचणींवर ज्ञान हेच सर्वोत्तम औषधं आहे हे औषध आपण वापरत नाही आणि विनाकारण नको तिथे डोकं चालवुन भोंदूगिरी कडे आकर्षित होतो. जीवनाची फसगत होऊ नये म्हणून शिक्षण असतं पण शिक्षित माणसं स्वतः हुन स्वतःची फसगत करून घेत आहेत .मग शिक्षण हे वाघीणीचे दुध आपल्या वाट्याला येऊन देखिल आपण कुषोषितच राहत असु तर मग त्याला काही अर्थ नाही . उलटपक्षी आपण अशिक्षित लोकांना या चक्रव्युहातुन बाहेर पडण्यासाठी आपलं योगदान दिलं पाहीजे.

# मराठी अस्मितेचा बुलंद आवाज 'विश्वव्यापी दैनिक आधुनिक केसरी'

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजी नगर येथून प्रसिद्ध होणारे निर्भिड आणि अचूक, विश्वसनीय बातमी देणारे दैनिक आधुनिक केसरी वृत्तपत्र अल्पावधीतचं वाचकप्रिय झाले आहे नुकताच या वृत्तपत्राने २ वर्षे पूर्ण करुन ३ ऱ्या वर्षात यशस्वी वाटचाल केली आहे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या मुलाखती, अग्रलेख यामुळे "दैनिक आधुनिक केसरी" ला उभारी मिळाली आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही याचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल कोणताही राजकीय पक्ष, धर्म, जात, संप्रदाय, जातीविशेष, यांच्या बाजूने न राहता जे योग्य आहे, रास्त, चांगले आहे, जनहिताचे आहे त्याची पाठराखण करण्याची "दैनिक आधुनिक केसरी" ची खासियत आहे त्यामुळे या दैनिकाला  चांगला जनाधार मिळत असल्याचे दिसून येते आहे.**

लोकहिताची कामे, लोकप्रतिनिधी, समाजसेवक यांनी केलेलं कार्य शासन यंत्रणांचे विविध अधिकारी यांच्या चांगल्या कामाची नेहमीच "दैनिक आधुनिक केसरी"ने दखल घेवून यथोचित प्रसिध्दी देत आहे. याचा सार्थ अभिमान वाटतो. तसेच उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू, समाजकारणी, कर्तबगार व्यक्तिमत्वे, समाजाप्रती समर्पित स्वयंसेवी संस्था, पोलीसकर्मी अशांचा "आधुनिक केसरी"ने वर्धापनदिनी गौरव करण्याची परंपरा कायम जोपासली आहे त्यामुळे समाजप्रबोधनाबरोबरचं सामाजिक बांधिलकीही जपली आहे. खरचं नावाप्रमाणेच "आधुनिक केसरी" आहे. येथे हक्काने नमूद करावेसे वाटते " दैनिक आधुनिक केसरी"मधील वाटचालीबद्दल मागोवा घेतांना आजच्या घडीला मोठं - मोठी वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके चालवणे खूप कठीण झाले असताना "दैनिक आधुनिक केसरी "ने मात्र आपला रोख - ठोक बाणा कायम ठेवून वृत्तपत्र क्षेत्रामध्ये दबदबा निर्माण केला आहे. "आधुनिक केसरी" बद्दल म्हणायचे झाले तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या अभंगामधील दोन पंगतीप्रमाणे "इवलेसे रोप लावियेले द्वारी ! तयाचा वेलू गेला गगनावरी !! आणि ते खरं आहे. कारण आज आपण जिथं असू तेथे ऑनलाईन नेटवरुन "दैनिक आधुनिक केसरी" चा अंक वाचण्यासाठी उपलब्ध होतो त्यामुळे हा अंक लाखो वाचकांपर्यंत पोहचतो. आम्ही कर्नाटकातील बेळगांव जिल्ह्यामधील रहिवाशी असून नियमित "दैनिक आधुनिक केसरी" चा नेटवरुन अंक वाचतो नवोदित लेखकांना प्रोत्साहन देत लिहितं केलं जातं आहे तर जेष्ठ साहित्यिकांना लिहिण्यासाठी व्यासपीठ मिळवून देण्याचे महानकार्य करण्यात येत आहे. हे सर्व "आधुनिक केसरी "चे संपादक डॉ. प्रभू गोरे सरांच्या प्रेरणेनेचं शक्य झाले आहे हे नमूद करावे लागेल "दैनिक आधुनिक केसरी"ची मांडणी सुबक व आकर्षक असून मोहक वाटते. त्यामुळे या अंकातील विविध लेख, कविता, मुलाखती, कथा, प्रतिक्रिया वाचनीय वाटतात अंकातील भाषेचा दर्जा, शुद्धलेखन या साऱ्यांची कटाक्षाने दखल घेवून "दैनिक आधुनिक केसरी "ने वेगळेपण जपले आहे. येणाऱ्या काळात आणखीन हे वृत्तपत्र बहरत जावो अशी सदिच्छा व्यक्त करुन "दैनिक आधुनिक केसरी "चे संपादक, मुद्रक, प्रकाशक आणि मालक डॉ.प्रभू गोरे साहेब आणि त्यांची संपूर्ण टीम यांना दुसऱ्या वर्धापनदिनी खूप साऱ्या शुभेच्छा !

**राजू जाधव, मोबा. 9964702425**

# मोकळा श्वास कधी घेणार ?



सोनू दरेगावकर
संपर्क क्र. 7507161537

आधुनिक केसरी

**लहानपणी आम्ही शेताकडे जायचे, शेतात गेल्यावर आई-बाबाचा हात धरून सर्व शेतच फिरून पहायचं, मग निसर्गाच्या सानिध्यामध्ये राहून सर्वच आम्हाला सुख मिळायचं, परंतु आज ग्रामीण भागातून जेंव्हा आम्ही शहरी भागामध्ये भटकंती करतोय त्यावेळी कुठेतरी ग्रामीण भागाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्याचं कारण पहिले घर पडके असायचे, पत्राचे असायचे मग त्या घरावरील पत्रे सुसाट वाऱ्याने ते उडून सुद्धा जायचे. मग त्याच घरी राहून आम्ही आनंद साजरा करायचं. थोडा- थोडा बदल होत गेला, ग्रामीण भाग सुद्धा आज सुधारायला लागला. घरावरचे पत्रे निघून गेली, कारण वेगवेगळे वातावरण पाहून माणसात बदल होवू लागला आणि जीवन थोडं बदलूनच गेलं. पूर्वी प्रत्येकाच्या घरावर पत्रे असायचे आज पत्राचे घर कमी झाले आणि मोठा स्लॅबचा आणि काँक्रिट च्या इमारती उभ्या राहिल्या.**

आता वाटतं की ती गरिबी बरी होती, कारण अगोदरच्या काळामध्ये घरामध्ये तेव्हा लाईट नसायची तेव्हा दिव्यामध्ये तेल टाकून घरामध्ये प्रकाश असायचे, आज तो प्रकार बंद झाला. त्याचं कारण हे जग तंत्रज्ञानाचे जग निर्माण झाले. आज लाईटचा जमाना आला परंतु, नवीनबांधलेल्या घरामध्ये अगोदरच्या सारखी खेळती हवा ही आता ती बंद झाली. कारण इथे मोकळा श्वास कधी मिळालाच नाही. चारी बाजूने बांधलेल्या भिंती आजूबाजूंच्या परिसरामध्ये त्या सुद्धा बांधलेल्या भिंती एकूण एकाची उंची त्याची उंची कमी तर मी त्याच्यापेक्षा मोठी उंची बांधील अशी म्हणणारी माणसं या जगामध्ये निर्माण झाली. मग मोकळी हवा कुठून मिळणार.

जसं जसं जग बदलत चाललंय तसा तसा माणूस सुद्धा बदलत चालला. प्रत्येक गोष्टीची माणसांना सवय लागली. घरामध्ये बसल्यानंतर जर लाईट गेली तर माणूस तडफडत असतात, कारण अगोदरच्या काळामध्ये सुद्धा लाईट नसायचे परंतु तो माणूस तडफडत नव्हता. त्याचं कारण त्याला निसर्गाच्या सानिध्यामध्ये राहून सवय लागलेली होती. आज माणसं निसर्गाच्या सानिध्यामध्ये कमी परंतु ज्या गोष्टी स्वतःला आळशी बनवायला लागतात त्या गोष्टींच्या सानिध्यामध्ये जाऊन माणसांनी त्यांना आपला मित्र बनवला. मग जेव्हा कधी आपल्या घरातील लाईट जाईल तो फॅन बंद होईल, तो एसी बंद होईल मग माणूस मात्र तेव्हा तडफड करायला लागतो. जर त्याच्याकडे लाईनमन यांचा नंबर असेल तर त्याला फोन लावून लाईट कधी येईल म्हणून विचारपूस करायला सुद्धा एवढा तळमळ करत असतो.

ही प्रत्येकाला सवय झाली जगण्याची अजून याच्यामध्ये भर टाकायचा म्हटलं तर माणसांनी आजच्या युगामध्ये स्वतःपेक्षा इतरांच्या वैयक्तिक जीवनामध्ये महत्त्व द्यायला लागले आहेत. त्याचं कारण माझ्यासोबत पटत नाही माझं त्याच्या सोबत पटत नाही असं म्हणू म्हणू स्वतःच्या जीवनाला एका पिंजऱ्यामध्ये कोंडून ठेवलं. मला हे जमत नाही मी ते करणार नाही तुला सुद्धा ते जमणार नाही तू सुद्धा करू नको अशा आळशी पणाच्या ज्या गोष्टी आहेत. स्वतःच्या मनामध्ये आणि आपल्या सोबत राहणाऱ्या त्या माणसांच्या मनामध्ये सुद्धा हे लक्षण पेरण्याचे काम जी माणसं करतात ती माणसं या जगाच्या पाठीमागे नेहमीच राहतात.

अनेकजण ताण-तणावात राहतात ज्या गोष्टी आपल्याशी निगडित नाहीत त्या गोष्टीचा सुद्धा विचार करत असतात आणि ज्या गोष्टी आपल्या ला साध्य होत नाहीत त्या गोष्टी आपण सोबत घेऊन राहणे या विचारसरणीमुळे आपली स्वतःची मानसिक संतुलन बिघडण्याची वेळ सुद्धा येऊ शकते कारण



आपण जर ताण-तणावमुक्त रहिलोत्त तर आपल्याला आयुष्यामध्ये कधीच आपल्या वाटेला दुःख येत नाही आणि आपण आनंदाने जीवन जगण्यासाठी नवीन ऊर्जा प्राप्त होते.

जर का आपण योग्य वेळी आपल्या मनातल्या गोष्टी ज्या ज्या चांगल्या कामासाठी वापरता आल्या नाही, त्या-त्या वेळी आपल्यावर होणारे परिणाम आपल्यालाच धोकादायक ठरू शकतात. म्हणून बिनधास्त जीवन जगायचं असेल तर एकदम हसत खेळत जीवन जगता आलं पाहिजे. मन मोकळ्या गप्पागोष्टी त्यांच्याजवळ करा आपल्या शब्दातून त्यांना आनंद झाला पाहिजे आणि त्यांच्यासोबत आपलं सुद्धा दुःख हलकं झालं पाहिजे आणि आपल्याला जीवन जगताना एक गुंतलेलं जीवन न जगता कुठेतरी मोकळा श्वास घेऊन जीवन जगता आलं पाहिजे.

मुला बाळांना आई वडील शिक्षण शिकण्यासाठी बाहेर पाठवतात जीवाचं रान करून त्यांचे प्रत्येक हट्ट पूर्ण करतात, परंतु आजकालची पिढी खूप धोकादायक निघाली आई वडिलांच्या पैशाची उडवा उडव करून मित्रांसोबत नशा करून ते पैसे उडवले जातात आणि रोज कष्ट करणारा बाप.... आपल्या मुलांना कधीच कमी पडू नये याची दखल घेत असतो. पण आजकालची मुले कुठेतरी तडा देण्याचे काम करत असतात. कष्ट करून मुलांना शिकवणारा बाप तो कधीच स्वतः चा श्वास मोकळा घेत नाही त्याचे कारण तो आशेवर असतो की, माझी मुलं या जगामध्ये खूप विद्वान होऊन छोट्या मोठ्या नोकरीला लागून स्वतःच्या पायावर उभी राहवी. प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न असतं, जर का आपण त्यांचे स्वप्न पूर्ण केलं तर खरंच आपल्याला आणि आपल्या आई-वडिलांना मोकळा श्वास घेता येईल व आनंदाने जगता पण येईल...

# महाराज, येतो आम्ही... ड्रायव्हरला सांभाळा!



माधव अरुणराव डाके
संपर्क क्र. 9730115620

आधुनिक केसरी

**साधारणतः दोन हजार चौदा पंधरा ची गोष्ट असावी. नुकताच दिवाळी सण झाला होता. यावर्षी जरा जास्तच थंडी पडली होती. दिवाळी झाली की, आमच्या गावातील ऊसतोड कामगार कारखान्याला निघणार होते. आमच्या काठोडा व पंचक्रोशीतील वांगी इमामपूर या गावांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कर्नाटकातील कारखान्यांचे प्रतिनिधी अर्थात कारखान्याचे कुणी साहेब आलेले होते. मागच्या वर्षी ज्यांनी उचल फेडली नाही, त्यांची वसुली आणि नवीन वर्षाची उचल वाटप करण्यासाठी कारखान्याचे साहेब गावात आले होते.**

प्रामाणिक ऊसतोड मजुरांच्या शोधात ते गावातून, गावच्या वस्त्यातून फिरत होते. रात्री अपरात्री ऊसतोड कामगार मजूर, मुकादम आणि कारखान्याचे साहेब यांच्या बैठका होत होत्या. मागच्या वर्षाची ज्यांची उचल फिटली नाही आणि कारखान्याला जायची इच्छा नाही असे काही ऊसतोड मजूर कारखान्याच्या साहेबांची नजर चुकवून गावातून पसार होत होते.तर कोणी या वर्षी थोडी जास्त उचल द्या म्हणून साहेबांना गळ घालत होते.

कोणाला उपवर झालेल्या मुलीच्या लग्नासाठी पैसे हवे होते, तर कोणाला आपलं गळकं, पडकं घर पाडून नवं घर बांधण्यासाठी पैसे हवे होते, कोणाला मुलांच्या शिक्षणासाठी पैसे हवे होते, तर कोणाला सावकाराकडून घेतलेलं कर्ज फेडण्यासाठी पैसे हवे होते. कोणी सलग पाच-पाच वर्ष कारखाना खेटून आला असल्याने या वर्षी गॅप घेण्याच्या विचारात होता, तर कोणाकडे कारखान्याला जाण्याशिवाय पर्यायच नव्हता. कारखान्याचे साहेब मात्र प्रामाणिक आणि कष्टाळू माणसं हेरत होते. मुकादम साहेबांकडे शिफारशी करत होते, पण कोणाला किती उचल द्यायची, कोणाला उचल नाकरायची हे स्वतः साहेबच ठरवत होते. आज वरच्या या क्षेत्रातल्या साहेबांच्या प्रदीर्घ अनुभवावरून कारखान्याच्या त्या साहेबांना माणसं ओळखायचे अचूक ज्ञान प्राप्त झाले होते. खरंतर हे त्यांचे कसबच होते. पैसे घेऊन पळून जाणारे माणसे भेटले की मग कारखान्याला नुकसान सहन करावे लागते. आजवर असे अनेक अनुभव साहेबांच्या गाठीशी होते.काही लोकांनी तर दोन-दोन, तीन-तीन कोयत्याची उचल घेऊन कामावर न येताच ते फरार झालेले होते. तर काही प्रचंड प्रामाणिक माणसंही साहेबांना भेटली होती. असंख्य भल्याबुऱ्या अनुभवांची शिदोरी गाठीशी बांधून कारखान्याचे ते साहेब गावात वस्त्यां वरून फिरत होते.प्रामाणिक कष्टाळू ऊसतोड कामगारांच्या शोधात दारोदार भटकत होते.उचलीच्या देण्या घेण्याचे व्यवहार संपल्यानंतर एक दिवस ऊसतोड मजूर निघण्याची तारीख ठरली.

आपलं गाव, आपली माणसं, पावणे-रावळे, सोयरे - धायरे सोडून दूरच्या भागात, दूरच्या कुठल्यातरी अनोळखी गावात ऊस तोडणी ला जाताना त्यांची मनं डोळ्याद्वारे आसवं गाळत होती. पोटच्या गोळ्याला गावात ठेवून टीच भर पोटाची खळगी भरण्यासाठी हे लोक कारखाना खेटायला निघाले होते. तर काहीजण आपल्या लेकरांच्या शिक्षणावर पाणी फेरून, त्यांचं भविष्य अंधारात ठेवून त्यांना सोबत घेऊन कारखान्याला निघाले होते.

ठरलेल्या दिवशी सकाळी अकरा वाजल्यापासूनच गावाच्या वरच्या बाजूस, वांगी रोडवर दोन ट्राली जोडलेला ट्रॅक्टर लागला होता. त्यावरील भोंग्याने दिवसभर गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. दुपारचे जेवण उरकून ऊसतोड कामगार लोक भरलेल्या सामानाची पोते ट्रॉलीत टाकत होते. सामान तरी किती व कोणते ?

स्वयंपाकासाठी लागणारे आवश्यक भांडे ...ज्यात चार दोन ताटं, चार दोन वाट्या, पिठाचा डब्बा, तवा, पातेलं, पाण्याचा तांब्या, मीठ, मिर्ची, मसाला, धान्याचे पोतं, अंथरूण पांघरूणासाठीचे कपडे, नेहरू पायजमा, साडी, धोतर, लुगडं या पलीकडे दुसरं काय असेल ?

हे सगळं सामान पोत्यात भरून ते पोते ट्रालित टाकून ऊसतोड कामगार जाण्यासाठी तयार झाले होते. गावात महिना पंधरा दिवस अगोदरच कारखान्याला जाणाऱ्या लोकांच्या नावाची चर्चा असते. तेव्हा येता जाता लोकांची भेट झाल्यानंतर मी अनेकदा त्यांना आवर्जून विचारतो. काय मग यावर्षी कारखान्याला जायचे किंवा नाही... तेव्हा 'हो ' किंवा 'नाही ' मध्ये ते कामगार उत्तर देत असतात. यावरूनच कोण जाणार याची जवळपास माहिती झालेली असते.



या लोकांमध्ये प्रेमाचा अथांग सागर साठलेला असतो. हे लोक भेटले की अगदी तोंडभरून बोलतात.बहुतेक करून या ऊसतोड कामगारांचे चेहरे मला नेहमी हसरेच आढळून येतात. कष्ट सोसताना देखील जे आनंदी राहू शकतात मला वाटतं त्यांनाच ऊसतोड कामगार म्हणतात. ही माझी मी तयार केलेली व्याख्या आहे. ऊसतोड कामगार यांच्याशी माझ्या आलेल्या सहवासातून मी ती तयार केलेली आहे.

असो ... सायंकाळच्या साडेपाच-सहा वाजता गावातून ट्रॅक्टर हालला. वांगी रस्त्याने पुढे इमामपूर कडे हा ट्रॅक्टर निघाला होता. गावातल्या गीते वस्तीवर माझी श्रीमद्भागवत कथा चालू होती. दुपारी दोन ते पाच कथेची वेळ होती.कथा संपून गावात निघण्याच्या मी तयारीत होतो. एवढ्यात गावाकडून वांगीच्या दिशेने जाणारे दोन ट्रॉली जोडलेले ट्रॅक्टर समोरून येताना दिसले. आपल्या गावातील लोक पश्चिम महाराष्ट्रात ऊस तोडणी साठी निघालेले आहेत;हे माझ्या चटकन लक्षात आले. ट्रॉलीमध्ये खाली धान्याचे पोते, भांड्यांची पोते, लोखंडी पेट्या, त्यावर बसलेले महिला आणि पुरुष तसेच सोबत एखादी शेळी, कुत्रा, मांजर घेऊन निघालेले हे ऊसतोड कामगार नजरेस पडले. हे चित्र पाहताना का कोणास ठाऊक;पण माझ्या मनाला मोठाच पीळ पडत होता. ट्रॅक्टर माझ्याजवळ येऊन थांबला. सगळ्यांनी मला प्रेमपूर्वक जय हरी घातला. मीही मोठ्या प्रेमाने जयहरी केला. माझ्या गाडीचा ड्रायव्हर अमोल वाघमारे चे वडील आसाराम वाघमारे पुढच्या ट्रॉलीत हातात पाण्याची रिकामी घागर घेऊन बसलेले होते. दिवस मावळतीला गेला होता; पण आणखी अंधार पडला नव्हता. त्यांनी माझ्याकडे अत्यंत केविलवाण्या नजरेने पाहिलं. त्यांचे डोळे भरून आले होते. अंगातलं कोपरीचे बनियान आणि ट्राऊझर परिधान केलेले आसाराम तात्या मला म्हणाले, "महाराज येतो आम्ही, ड्रायव्हरला चांगलं सांभाळा. कमी-जास्त पैसे लागले तर द्या त्याला. मी आल्यावर तुमचे पैसे चुकते करीन."

प्रतिउत्तरात मी केवळ होकारात्मक मान हलवली. कारण आता माझे डोळे डबडबले होते. मन भरून आले होते.मला शब्द फुटणे अशक्य होते. मी प्रचंड भावूक झालो होतो. पंचावन्न - साठ वर्षाच्या वयात आसाराम तात्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी ऊसतोड मजूर म्हणून काम करावे लागते. ही गोष्ट माझ्या संवेदनशील मनाला मोठीच वेदना देत होती. माझ्यासमोरून ट्रॅक्टर आता निघून जात होता. ट्रॅक्टर मधील बाया बापडे, लहान मुलं माझ्याकडे पाहत हात हलवत माझा निरोप घेत होती. माझ्या पाणावलेल्या डोळ्याने त्यांच्याकडे पाहत मी सुद्धा त्यांना हात हलवून निरोप देत होतो. मनात मात्र माझ्या प्रचंड कालवा कालव होत होती.

# जेणे बोले विठ्ठल डोले



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**जगाची निर्मिती झाल्यावर माणूस जन्माला आला. ईश्वराने त्याला सर्वच शक्ती प्रदान केल्या. त्यात महत्त्वाच्या म्हणजे वाचा आणि भावना. ईश्वराने बोलण्याची, शब्द निर्माण करण्याची शक्ती फक्त आणि फक्त माणसाला दिली.**

बोलल्यामुळे खूप चांगले ही घडू शकते आणि खूप वाईटही घडू शकते. इतकी अगम्य भेट दिल्यानंतर आपण मात्र त्या शब्दांचा कसा, कुठे, काय वापर करतो हे आपल्यालाच माहीत. जी शब्द निर्मितीची शक्ती देवाने आपल्याला दिली आहे त्यायोगे आपण खरे तर असे बोलायला हवे की ज्यायोगे कोणाचेही मन दुखावणार नाही, कुणालाही त्रास होणार नाही. नामदेव महाराज म्हणतात,

**बोलू ऐसे बोल**
**जेणे बोले विठ्ठल डोले ॥१॥**
**प्रेम सर्वांगाचे ठायी**
**वाचे विठ्ठल रखुमाई ॥२॥**
**नाचू कीर्तनाचे रंगी**
**ज्ञानदीप लावू जगी ॥३॥**
**परेहुनी परते घर**
**तेथे राहू निरंतर ॥४॥**
**सर्व सत्ता आली हाता**
**नामयाचा खेचरदाता ॥५॥**

या अभंगातून नामदेव महाराज उपदेश तर करतातच पण त्याचवेळी सांगतात की मी कसा वागतो आहे आणि असे वागले तर देव आपल्यापासून दूर जाणार नाही. अर्थात आपल्याला दूर करणार नाही...म्हणजे ते स्वतः प्रथम वागतात आणि मग दुसऱ्याला उपदेश करत आहेत.

वाणी, वाचा हे आपल्याला वरदान मिळालेले आहे मग साधकाने कसे बोलायला हवे ..... ?की जे बोलल्यामुळे विठ्ठल डोलायला लागेल म्हणजे विठ्ठलाला जे ऐकायला आवडेल असे बोलावे. आता मंडळी तुम्ही म्हणाल की दगडाचा देव कुठे ऐकायला बसलाय तुम्ही गोड बोलता की कडू बोलता ते ..... ?पण विठ्ठल प्रत्येकात आहे.... आपल्या आजूबाजूला असलेल्या सर्व माणसांमध्ये सर्व वस्तूंमध्ये, प्राण्यांमध्ये विठ्ठल आहे .....मग आपल्याला जी वाचा, जो शब्द ईश्वराने प्रदान केला आहे ....त्याने आपण चांगले तेच बोलावे की.....जे आवडणार नाही ते सोडून द्यावे.... कोणाबद्दलही वाईट बोलू नये..... बोलणे हे एक वाचिक तप आहे त्या दृष्टीने बोलावे .....अर्थात कोणाला बरं वाटावं म्हणून खोटं खोटं नक्कीच बोलू नये..... खरेच बोलावे पण ते गोड बोलून सांगावे...... कितीही कडू असले तरी ते सत्य गोड करून सांगावे ......कोणाला टोचणार नाही अशा पद्धतीने सांगावे म्हणजे दुसऱ्याला ते भावते .कोणाची चूक दाखवताना देखील गोड बोलून दाखवावी..... असे म्हणतात जिभेने जखमा बऱ्याही होतात आणि जखमा केल्या ही जातात. नामदेव महाराज म्हणतात गोड बोलावे ज्यामुळे विठ्ठल प्रसन्न होतो आणि सगळी सत्ता आपल्या हाती देतो अर्थात तो सद्गुरूच्या रूपाने आपल्याला भेटत असतो म्हणून ते म्हणतात की सतत गोड बोलावे, चांगले बोलावे.



ज्याच्याबद्दल आपल्याला चांगले बोलता येत नाही त्याच्याबद्दल आपण वाईटही बोलू नये अशा वेळेला गप्प रहावे पण वाईट बोलू नये.

यासाठी कबीरांचा एक दोहा आठवतो ते म्हणतात,

**हम 32 तू अकेली**
**ऐसे खाउ चबाय**
**तर जीभ म्हणते**
**एक बात तेढी बोलू**
**32 निकल जायेंगे ......**
**असा जिभेचा महिमा आहे.....**

खरे महाभारत पण आणि आपल्या जीवनातले महाभारत पण जिभेनेच घडते आणि रामायण पण जिभेनेच घडू शकते म्हणून शब्दांसाठी संयम असावा योग्य ठिकाणी योग्य शब्द वापरावा कमी बोलावे आणि जे बोलू ते गोड बोलावे.

**विवेकाचे ठरेल ओल**
**ऐसे की बोलावे बोल**

ललिता सहस्त्रनामामध्ये म्हणले गेले आहे की आपल्या प्रत्येक वाणीवर सरस्वतीचा वास असतो

परा प्रत्यक् चितीरूपा पश्यन्ती परदेवता
मध्यमा वैखरी रूपा भक्तीमानसहंसिका ॥८१॥

म्हणजे आपण जे बोलतो त्याने श्री सरस्वतीची आराधना होत असते हा भाव लक्षात ठेवून बोलावे. जगद्गुरु तुकाराम महाराज तर म्हणतात,

**न बोलेसी करा वाचा**
**उपाधीचा संबंध**
**एक तुमच्या नामाविण**
**अवघा सीण कळतसे ॥८५३॥**

महाराज म्हणतात कोणाशी बोलण्याचा प्रसंगच येऊ नये , वाणी फक्त नारायणाच्या ठिकाणीच विसावा घेवो. घरातही वास्तू आपल्यास तथास्तु म्हणत असते त्यामुळे घरातही एकमेकांशी नेहमी सौहार्दाने बोलावे.... गोड बोलावे.... सकारात्मक बोलावे. आज आषाढी एकादशी. आजपासून चातुर्मास सुरू होतो. चातुर्मासाचा नेम म्हणून हा एक वसा घेऊया की बोलू ऐसे बोल, जेणे बोले विठ्ठल डोले

# मणिपूर का जळते आहे ?

आधुनिक केसरी

**मणिपूर हे एक निसर्गसुंदर असून अनेकदा त्याची तुलना स्वित्झर्लंडशी केली जाते. मणिपूर खोऱ्याच्या मध्यभागात वसलेले इंफाळ हे राजधानीचे शहर सांस्कृतिक, व्यापारी व राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे आहे. येथील बाजारपेठ, पोलो मैदान, वस्तुसंग्रहालय, राजवाडा, सुवर्ण मंदिर, नृत्य अकादमी इ. उल्लेखनीय आहेत मणिपूर राज्याच्या उत्तरेस नागालँड राज्य, पूर्व व आग्नेय दिशांना ब्रह्मदेश, दक्षिणेस मिझोराम हा केंद्रशासित प्रदेश, पश्चिमेस आसाम राज्य असून इंफाळ ही मणिपूरची राजधानी आहे. मणिपूर राज्यातील हवामान थंड, आरोग्यवर्धक आहे. उन्हाळ्यातही हवा सामान्यपणे थंडच असते.**

ईशान्य भारतातील म्यानमारला लागून असणाऱ्या सीमावर्ती राज्य मणिपूरमध्ये सध्या गृहयुद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. चुराचंदपूर, सेनापती, चंदेल, कांगपोकपी आणि टेंगनौपाल जिल्ह्यांमध्ये दंगली घडत आहेत. उपलब्ध व्हिडिओनुसार अनेक घरे जळून खाक झाली असून अनेक जण जखमी झाले आहेत. विविध प्रकारच्या बंदुका, घटक हत्यारे, क्रूड बाँब्ज इत्यादी वस्तू वापरून प्रचंड नासधूस करण्याचे काम आंदोलक करत आहेत. बंदुकीचे एक अख्खे दुकानच चुराचंदपूरमध्ये लुटले गेले. अशा भीषण परिस्थितीमुळे स्वाभाविकपणे सरकारने कर्फ्यू जाहीर केला आहे. विविध राज्यांतून सैनिकी व अर्धसैनिकी बलांच्या 120 तुकड्या, तसेच हवाई दलाच्या तुकड्या आजघडीला मणिपूरमध्ये दाखल झाल्या आहेत. यात अजूनही वाढ होत आहे. बाजारपेठा, सार्वजनिक वाहतूक ठप्प केली गेलेली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी नाइलाजास्तव इंटरनेटही बंद करण्यात आले आहे. आठ हजारांहून अधिक लोकांची सुरक्षित स्थळी व्यवस्था लावण्यात यंत्रणांना यश आले आहे. चाळीस हजारांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. इतकी प्रचंड दक्षता घेऊनही परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मणिपूर मध्ये ३४ अनुसूचित जमाती आहेत. त्यापैकी बहुतांश नागा आणि कुकी समुदायातील आहेत. राज्यात बहुसंख्येने असलेल्या मैतेई समाजाला अनुसूचित जातीचा दर्जा हवा आहे. मणिपूर राज्याच्या ५३ टक्के इतकी लोकसंख्या असलेल्या मेतई जमातीच्या लोकांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यावरून हा वाद हिंसाचार घडुन आला आहे. मणिपूर उच्च न्यायालयाने १९ एप्रिल रोजी एक फैसला सुनावला होता.ज्यात मैतई समाजाला अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करण्यात आले होते.पण मणिपूर उच्च न्यायालयाच्या ह्या निर्णयाला नागा अणि कुकी समुदायातील लोकांनी आपला विरोध दर्शवला आहे. मणिपूर राज्यातील मैतई समाजातील लोकांची अशी मागणी आहे की इंफाळ खोरयात मैतई समुदायातील लोकांची संख्या अधिक आहे. बांगलादेश तसेच म्यामनार मधील लोकांची घुसखोरी वाढत असल्याने मैतई समुदायातील लोकांना अनेक समस्या अडीअडचणींना संकटांना सामोरे जावे लागत आहे. अणि नागा अणि कुकी समुदायातील लोकांचा याबाबतीत विचार करावयास गेले तर टेकड्याच्या भागात असलेल्या नागा अणि कुकी समुदायातील लोकांना अशी कुठलीही समस्या नाही कारण त्यांना विविध कायद्यांदवारे याबाबत संरक्षण प्रदान करण्यात आले आहे.म्हणुन त्यांच्या जमीनीवर अतिक्रमण होण्याची कुठलीही भीती नाही.

मणिपूर राज्यामधील ९० टक्के इतका भाग टेकडींचा आहे.म्हणजेच मैतई समुदायातील लोकांनी बाहेरच्या लोकांकडून त्यांच्या वाडवडिलांपासुनच्या



वडिलोपार्जित जमिनी बळकावल्या जात असल्याचा दावा केला आहे म्हणून यापासून संरक्षण प्राप्त होण्यासाठी मैतई समाजाला अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी मैतई समुदायातील लोकांकडून केली जात आहे. सध्याच्या कायद्या मधील तरतुदीमुळे मैतई समाजातील लोकांना टेकडी भागात कायमस्वरूपी वास्तव्य करता येत नाहीये. मैतई समुदायातील लोकांच्या ह्याच मागणींच्या पुर्ततेसाठी शेड्युल ट्राईब डिमांड कमिटीकडुन आंदोलन केले जात आहे. हे आंदोलन केवळ नोकरीमध्ये आरक्षण मिळविण्यासाठी नव्हे तर आपल्या वडिलोपार्जित जमिनीचे पिढयान पिढ्याच्या जपल्या जात असलेल्या संस्कृतीचे परंपरेचे भाषेचे संरक्षण करण्यासाठी मैतई समुदायातील लोकांकडून हे आंदोलन केले जात आहे. मणिपूरच्या खोऱ्यात राहणारा मैतेई समाज आणि डोंगराळ भागात राहणाऱ्या कुकीसह अन्य आदिवासी जमातींमधील संघर्ष जुना आहे. आदिवासी वस्त्यांमध्ये अतिक्रमणविरोधी कारवाई, आरक्षण, प्रादेशिक असमतोल, शांतता करार आदी मुद्यांवरून या संघर्षात भर पडली. तो कमी करून हिंसाचार रोखण्यासाठी राज्याचे नेतृत्व कमी पडल्याचे स्पष्ट दिसते. आपण सर्व विकासाच्या गोंडस नावाखाली सामाजिक विषमता, बेरोजगारी, भ्रष्टाचार, संपत्तीचे असमान वितरण या समस्यांकडे या देशातील चंगळवादी माध्यमांमुळे डोळेझाक करत आहोत. विकास म्हणजे केवळ आर्थिक संपन्नता, दळणवळणाची आधुनिक माध्यमे, बाजारपेठ, रुंद रस्ते असे समजले; तर आपण स्वतःची फसवणूक करून घेऊ. माणसाचे आरोग्य, मनःस्वास्थ्य, निसर्गाशी त्याचा तोल राखून त्याचा जरुरीपुरता वापर, समाजस्वास्थ्य, माणसाचे परस्परसंबंध, समाजातील विविध धर्मांच्या आणि वंशांच्या लोकांचे ऐक्य, साहित्य, संगीतकला अशा सर्वसमावेशक प्रगतीमुळे मनास मिळणारा उल्हास - अशी विकासाची व्याख्या सर्वत्र रूढ होत आहे. भारत या गोष्टींमध्ये समृद्ध आहे. पण आपण डोळ्यांवर पट्टी बांधून फक्त आर्थिक उत्पन्नाच्या मागे धावत आहोत व तेसुद्धा अल्पशा लोकांच्या फायद्यासाठी. भारतासारख्या देशात स्त्रियांना देवीचा दर्जा आहे तिथेच जर स्त्रियांची नग्न धिंड काढून अत्याचार केले जातात हे किती क्लेशदायक आहे. माणसाला माणूस म्हणून जगताना उत्पन्नापेक्षा समाजाच्या तळागाळातील लोकांचे जीवन सर्वार्थाने सुखी व संपन्न व्हावे, हे जेव्हा समजेल, तेव्हाच भारतात खरा उषःकाल होईल.

**प्रा. जाधवर दयानंद**
**अर्थशास्त्र विभाग,**
**शंकरराव भेलके महाविद्यालय,**
**नसरापूर, मो. ८६६८६०२२१५**

# संवेदनशील कवितासंग्रह 'फुटूच लागतात पंख'



संजय वि. येरणे
संपर्क क्र. ९४२१७८३५२८

आधुनिक केसरी

**डॉ. सुधीर राजाराम देवरे यांचा 'फुटूच लागतात पंख' आणि 'भंग अभंग' कवितासंग्रह म्हणजेच आशावादी जीवनाचे फलित मांडणारे वैचारिक काव्यसंग्रह होय. "एवढं जगूनही कविता उभी रहात नाही दोन पायावर..." (पृ. १४०, भंग अभंग) डॉ. देवरे हे जेष्ठ कवी आहेत. तेवढीच त्यांची अनुभव समृद्धता अनेक उन्हाळे पावसाळे बघून तावून सुलाखून निघालेले हे कविवर्य त्यांच्या काव्यातील संदर्भांवरून दिसून येते. खरे तर त्यांच्या या संग्रहांवर वैचारिक मत मांडण्याचे धाडस माझ्यासारख्या नवख्या समीक्षकाने करणे म्हणजे सूर्याला गवसणी घालण्याचे कार्य होय. याची जाणीव ठेवत मी काही त्यांच्या काव्यातील संदर्भांतील प्राप्त जाणिवा इतरांनाही समृद्धीकडे नेत, अभ्यासात्मक मार्गदर्शन मिळावे याकरता मतप्रदर्शन रूपाने मांडत आहे. मार्मिक विचार मांडीत जीवनातील विसंगती आणि साहित्यातील प्रयोजन भूमिका दर्शवणाऱ्या ह्या ओळी इथल्या वास्तव मनातील भाव नागडे करतात. डॉ. देवरे यांची लेखणी ही काही प्रसंगी गूढ आहे.**

**(मागील अंकावरून)** या काव्यनिर्मितीचे संदर्भ बघू जाता, जीवनास समजून घेत, प्रबोधनदायी होत मनाच्या भावना, वस्तुस्थिती, मनस्थिती व्यक्त करीत चेतना जागृत करणारी ही कविता म्हणून समोर येते. या काव्यात अनेक विषय, उपविषय मांडलेले असून सशक्त समाज निर्मिती व सशक्त सुआचरण व्हावे, घटनात्मक मूल्य रुजावी हा हेतू सहज दिसून येतो. कवी अगदी काव्यात तल्लीन होत राहतो. सहज साध्या, सोप्या शब्दांत तत्त्वज्ञानाचा जागर उलगडणारी ही कविता आहे. काही कविता अतिशय तरल आकृतीबंधात नेमक्या शब्दांत आविष्कृत होतात. डॉ. देवरेंच्या कवितेचा एक बाणा आहे. यातून त्यांची

सकारात्मक भूमिका दिसून येते. खरे तर नवोदितांना, अभ्यासकांना, रसिकांना समंजसपणा देणारी दाणेदार तेवढीच बाणेदार कविता म्हणून या दोन्ही संग्रहांकडे बघावे लागेल. कवी कधी छंदातही रमल्याचे दिसून येतो. या कवितेतील अलंकृतता तर जिवंत जाणिवेचा आविष्कार केल्यागत भासते. ही अलंकृतता शोधायचे झाल्यास त्यावर एखादा ग्रंथ तयार होऊ शकतो, असा हा वेगळा विषय आहे. या काव्यातील रसशास्त्र रसिकांना काव्याची गोडी लावून जाते. या काव्यातील रस म्हणजे रसिकांच्या मनातील उत्कट भावना जागृत करीत काव्यातील वर्णन विशद करते. या काव्यात शृंगार, वीर, रौद्र, बीभत्स, शांती, भक्ती, हास्य, अद्भुत, भयानक, करूणा अशा सर्व रसांची मिसळण झालेली आहे.

**"तशी उतावीळ मादीहीन कवीची,**
**संभोगोत्सुक हस्तमैथुनासारखी कविता !."**
(पृ.११४ फुटूच...)

उपरोक्त ओळी शृंगारसात मिसळून गूढ भाव वाढवून जातात. या काव्यात प्रयोगशीलता,

नाविन्यता व कल्पकता आणत कवी कवितेचा पाईक होऊन जातो. मनात- मेंदूत ठाण मांडून बसणारे शब्द कागदावर प्रसवताना ते सहज कवितारूप घेतात इतकी ताकद या आविष्कारांत आहे. कवीला कवितेची

नाडी सापडली आहे. स्वमनातील भावनांचा विष्कार हे या कवितेचे काव्य वैशिष्ट्य होय. एकंदरीत वैशिष्ट्यपूर्ण काव्यशैली मांडणी साकार करीत घटना, प्रसंग, प्रवृत्ती, प्रकृती, व्यक्तीवर भाव व्यक्त करीत

शब्दसामर्थ्यातून आल्हाददायकता देऊन चिारगर्भता देत कधी हसू, कधी आसू, तर कधी करुणामय होत गडद भाव निर्माण करणारी एक सर्जनशील कविता म्हणून या समग्र कवितेकडे आपल्याला बघावे लागेल. डॉ. देवरेंची कविता ही सामाजिक जाणिवांची मांडणी करते. ही कविता खरे तर आता कवीची वैयक्तिक राहिलेली नाही. ही कविता सर्वसामान्य वाचकांची- आस्वादकांची होऊन गेलेली आहे. हेच खरे काव्याचे प्रयोजन होय. कवी सूक्ष्म विवेचन करीत मनातील नैराश्यवादाला नवी सकारात्मक दृष्टी प्रदान करून जातो. वास्तवाचे स्वरूप घेऊन चिंतनशील होत कधी मिश्किलपणे तर कधी भावूक होत आपल्या कवितेतून कवी रसिकांसमोर येताना दिसतो आहे. याच अनुषंगाने सामाजिक जाणीवेची मांडणी करणारी, समाज जीवनातील अनुभूती देणारी, शोषित, पिढीत व्यक्तींच्या सामर्थ्याला बळ देऊन जाणारी

ही कविता आहे, असे वाटते.

**"मिश्र संकरातून, अर्वाचिन काही जडले**
**तंतू... पुन्हा तंतू झाले धागे** - एक वळण पडले मागे ..." (पृ.९५, भंग अभंग) डॉ. देवरे काव्यातून शब्द चळवळ साकारतात. मानवी मनातील सुख आणि दुःख ह्या दोन भावनिक जाती होत. खरे तर दुःखाचा नायनाट करून सुख समृद्धता प्राप्त करणे हा जीवनाचा ध्यास

असतो. कवी या दुःखद भावाला दूर सारत सुखकारक प्रयोजनाचे अनुमान मांडीत इथल्या व्यवस्थेवर प्रहार करीत विज्ञान व प्रयत्नवादाला स्थान देत रसिकांना अलगद समंजस भाव देऊन जाताना दिसतो. कवी बरेचदा धर्मविषयक, देवविषय संकल्पनांना समोर आणतो. धर्म, देव ही भावनिक पातळीवरील मानवी मनाची संघर्षात्मक बाब होऊन बसलेली आहे. यावर भाष्य करताना कवी फार अंतर्मुख होत रसिकांसमोर प्रश्न निर्माण करून जातो. आज दैववाद आणि त्याचे अंधानुकरण बघू जाता आपण समाधान सुखाला प्राप्त करण्यास काय गरजेचे आहे, हे ओळखायला कवी अलगद भाग पाडतो. मात्र आपल्या राष्ट्राची धुरा धर्म, देव या पैलूवर उभी असताना तिथे होणारे ध्रूवीकरण व या विषयीचा विद्रोह म्हणजे यातून होणारी समाजाची

हानी होय. खरे तर 'कळत असूनही माणूस वळत नाही' या म्हणीगत कवी नीतिमान जीवनज्ञान देऊन

जातो आहे. **"भाळी गोंदलं कमळ**
**पुढं फाकलं आभाळ अन् रानामधे बाई**
**असा उठला कल्लोळ."** (पृ.१११ फुटूच...)

राजकारण, सत्तात्मक संघर्ष यातून समाजाचा विकास व्हावा हा हेतू मात्र आजच्या राजकीय

अनुभवातून फार दूरवर जाताना दिसतो आहे. इथे व्यवस्था बरबटलेली आहे, तेवढीच भ्रष्ट झालेली आहे, हे सर्वांनाच ज्ञात आहे. कवी या संदर्भात नव्याने काही मांडत नसले तरी जी व्यवस्था आहे, त्या अव्यवस्थेला ओळखायला भाग पाडणारी ही कविता अगदी मनात सुंदरता देऊन जाते, आशा निर्माण करते. कुठलीही टिप्पणी न करता अनेकार्थ विषद करणाऱ्या ओळी, इथल्या मूळ खऱ्या संस्कृतीला कवी आपल्या कवितेतून व्यक्त करताना दिसतो आहे. कवीच्या कवितेतून काही प्रमाणात शैक्षणिक जाणिवांचे प्रगटनही होताना दिसते.

**"वावराची काळी शेती कशी पांढरत गेली**
**उभी घोसातली शेती कशी करपत गेली !"**
**(पृ. ८७, भंग अभंग)**

परिस्थितीविषयी अंतर्मुख करून जाणारी ही कविता इथल्या शेती- मातीतील माणसाचे देणे

फेडणारी कविता होय. घामाचे गाणे गाणारी कविता होय. मानवाच्या घामाचे रक्त होत त्यांचे जीवन

सुगंधित करणारी कविता होय. इथल्या श्रमिक व्यवस्थेला नागावणाऱ्या लोकांवर तुटून पडणारी कविता होय. तर अत्यंत गरीब, शोषित, श्रमिक लोकांच्या मनातील भावनांच्या सावलीचे झाड झालेली ही त्यांची नैसर्गिक कविता वाटते आहे. ते आपल्या कवितेतून निसर्गाचे अनेक भाव पेरत, निसर्गाशी रमत, प्रतिमांचा साज दरवळत, जीवन साध्य करू बघतात. कवीचे मन निसर्गातल्या प्रत्येक वस्तूचे आकलन करीत एक उच्च कोटीची प्रतीकात्मकता मांडून जाते. त्या कवितेतून मानवी मनाचा स्वभाव व पैलू समजून घ्यायला बरीच मदत होते. डॉ. देवरे हे ग्रामीण शब्दांचा साज मांडीत ग्रामीण व शहरी लोकांच्या जीवनातील तफावत आपल्या कवितेतून मांडून जात विचार करायला प्रेरित करतात. त्यांच्या कवितेत येणारे अहिराणी बोलीतील ग्रामीण शब्द, शहरी शब्द, खेडूत शब्द, निसर्ग शब्द, इंग्रजी शब्द, घडवलेले शब्द अशा अनेक शब्दांची रेलचेल त्यांच्या काव्यातून दिसून येते. एकंदरीत शब्दसाज, त्यातील शैली वाखाण्याजोगी आहे. कवितेतून वैचारिक मांडणीचा आशय रसिकांना समाधीत्व देतो आणि सहज उद्‌गार निघतात, "फारच

छान! मनाला दिलासा देणारी कविता आहे, सरजी आपली." कवी कधी स्त्री मनाचे धागे उलगडण्याचा प्रयत्न कवितेतून करतात. स्त्री मनाची अवस्था,

भावनांना आपल्या काव्य ओळीतून मांडीत जागरूता निर्माण करून देतात. स्त्री भावनांचा आदर त्यांच्या

कवितेतून दिसून येतो. ही कविता कुटुंब, माजविकास व प्रगतीचा आलेख सांगण्यासाठी कटिबद्ध झालेली आहे. ही कविता संपूर्णतः वैचारिक दृष्टिकोन घेऊन येत तात्विक विचारसरणीच्या खांबावर दिमाखदारपणे उभी आहे. ही कविता नवे ज्ञानअर्क देत सृजनशीलत्वाचे भाव प्रसन्न करते. कवी कुठे कुठे स्वकेंद्री, आत्ममग्न होताना दिसत असला तरी तो शेवटी मानवतावादी दृष्टिकोनाचा जागर करीत समोर येताना दिसतो. सुआचरण जाणिवांचे व्यक्तित्व निर्माण करावयास निघालेला हा काव्यपांथस्त असल्याचे मत मांडणे फार सोयीचे होऊन जाते. त्यांच्या कवितेतील तात्विक वैचारिक मांडणीची आरास पानोपानी दिसून येते. कविता ही निव्वळ कविता न होता, शब्द न होता, त्यात जर जीवनाचे वास्तव तत्त्वज्ञान असेल, चिंतन

असेल, खरी वैचारिकता असेल, जनकल्याण आणि प्रबोधनाचे जीवन ध्येय साकार करण्याचे माध्यम असेल तर त्या कवितेतून निर्माण होणारी शब्दकळा काळजाला भेदून जात असते. अशी या कवीची चिकित्सकदृष्टी रसिकांच्या काळजाला भेदून जाणारी आहे. यामुळेच जीवनाचे अवघड तत्वज्ञान अगदी सोपे होऊन त्यांच्या काव्यातून आपणास दिसून येते. **"सुंदर ते वय। उभं ओट्यावर। वस्त्र वाऱ्यावर।** सोडुनिया।। (पृ. ४१, भंग अभंग)

या कवितेत प्रेम हा विषयसुद्धा थोड्या वेगळ्या आशयातून जीवनानुभव देऊन जाणारा आहे.

रंग, ढंग, साज, शृंगार, करुणा अशा विविध वास्तव विभ्रमात गुंतलेले मन म्हणजेच कवीची प्रीती होय. कवीचे प्रेम हे सामाजिक जाणीवेने उत्स्फूर्त भरलेले आहे. यात वैयक्तिक प्रेम जीवनाला मात्र त्यांनी स्थान दिलेले नाही. या दोन्ही कवितासंग्रहातून अनेक निरीक्षणे व अनुमाने आपण काढू शकतो. तरीही प्रत्येक

कवितेचे आकलन निरीक्षण मांडणे म्हणजेच मर्यादेला न सांभाळणे होय. मात्र प्रातिनिधीक स्वरूपात

कवितेची काही अलगद निरीक्षणे समोर येतात, ती अशी : डॉ. सुधीर देवरे यांची कविता चिंतनशील कल्पकता यांचा सुरेख समन्वय असलेली आहे. कवीची सखोल जीवन अनुभूती काव्यातून सकारात्मकता देऊन जाताना दिसते. समाज व्यवस्थेतील विविध क्षेत्रे, घटक, पात्रे, प्रसंगांना, दैनंदिन जीवनाला सामोरे जात त्यातून मार्ग काढायला लावणारी कविता वाटते, सामाजिक अवगुणांचे सहज चित्रण करून जाते. निसर्गात रममान होण्यास प्रेरित करणारी कविता अगदी साधी, सोपी परंतु आशय अभिव्यक्ती मात्र जीवनाच्या पलीकडे देणारी; समजपूर्वक समजून घ्यावयास बाध्य करणारी तर कधी विचारप्रेरित करीत गूढ भासणारी ही कविता आहे. कवीचे बोली भाषेतील प्रयोजन, अभ्यासवृत्ती, चिंतनवृत्ती ही भावी पिढ्यांना नवे संदर्भ देणारी आहे. श्रमिक जीवन, शेतकरी चिंतन, सामाजिक चिंतन, राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रसार की आक्रोश अशा विविध विषयाचे भेदक वास्तव चित्रण करीत समोर येणारी ही कविता आहे. एकंदरीत मानवी जीवनमूल्याला सर्जनशीलतेकडे नेणारी मानवी मनातील विसंगती व आत्मवृत्तीचे दर्शन घडवणारी ही कविता होय. कविता ही रसिकाग्न होताना त्यातील आंतरमुक्त वैचारिक गर्भता, विचार भावनांचा आविष्कार, कधी संवाद कधी स्वगत प्रवाही होणारे मन असे सर्वगुण संपन्न काव्याचे स्वरूप त्यांच्या कवितेतून समोर येत आहे. यामुळे ही कविता खरे तर मानवी मनावर अनंत कालावधीपर्यंत राज्य करणारी कविता ठरणार आहे. या कविता मोहक आहेत, शामक आहेत. उत्तम भाषाशैलीचा अर्थ- अनुभव देतात. त्यात समाजसापेक्षतासुद्धा आहे. चिंतन करीत मनातले भाव उलगडायला लावतात. अर्थाचे अनंत कवडसे निर्माण करीत त्या भावात बेधुंद होणारे रसिक मन बघू जाता या कवितेतून एक मनाला दिलासा मिळतो आणि रसिक त्यांच्या दुसऱ्या कवितेची वाट बघत असतो. कवीच्या अनेक ओळी मनात रेंगाळणाऱ्या, मनाला दिलासा देणाऱ्या, बळ देणाऱ्या, चांगूलपणाचे भाव देणाऱ्या, मनाला प्रेरणादायी

ठरणाऱ्या वाटतात. "जिच्या तिच्या शेजी
जिचा तिचा पती मनातील पोथी वाचुनिया "
(पृ.४१, भंग अभंग) कवीच्या मनातील ही वेधक गाथा, भावबंद आपण लक्षात घेत त्यांचा 'फुटूच लागतात पंख' आणि 'भंग अभंग' कवितासंग्रह रसिकमय होत वाचन करीत त्यातील अंतरंग स्वतः समजून घेतल्यास खरे तर काव्यप्रतितीचा उच्चकोटीचा परमानंद आपणास सहज मिळून जाणार आहे. ही कविता कलावादी आणि

सौंदर्यवादी असल्याने कवितेचे सत्व यातून आपणास प्राप्त होते आहे, असे वाटणे सहज आहे.

**पुस्तक- फुटूच लागतात पंख**
**कवी- सुधीर राजाराम देवरे**
**प्रकाशक- सहित प्रकाशन, गोवा**
**पृष्ठ संख्या- १६९**
**किंमत- २०० रुपये**
**पुस्तक : भंग अभंग**
**कवी : सुधीर राजाराम देवरे**
**मुखपृष्ठ : धनंजय गोवर्धने**
**प्रकाशक : सहित प्रकाशन, गोवा**
**पृष्ठ संख्या : १६३**
**किंमत : २०० रुपये**

## जन्म ऊसाचा ऊसाचा खुप घाईचा

पुरवा डोहाळे रोपवाटिकेत
एक डोळ्याचे
मोहरली काया काय सांगु
काय जाहले
अहो बीज अंकुरले,
अहो बीज अंकुरले
सव्वा महिन्यात पाच
फुट सरीत पहुडले
जन्म ऊसाचा,
ऊसाचा खुप घाईचा
नोंद झाली, नोंद झाली,
कारखान्याला
मालकाने बांधलं
वचननाम्याला
मायेने करी मालकीण
निंदणी खुरपणी
ऊस पोटरला मिळे
येळेला खत-पाणी
जन्म ऊसाचा, ऊसाचा
खुप घाईचा
पोटच्या पोरागतं
मालक गोंजारतसे
म्हणे ऊस डोक्यावरून
फिरला असे
म्हणे मालकीण यंदा
कर्ज फिटेल माझं
अहो कुणाच्या खांद्यावर
कुणाचे ओझं जन्म ऊसाचा,
ऊसाचा खुप घाईचा
केव्हा तरी नजर लागली
मुकादमाची अन टोळी आली
हो ताज्या दमाची
एका दिसात ऊस झाला
हो आडवा साखरेसाठी
घेतला हो घोट कडवा
जन्म ऊसाचा, ऊसाचा खुप घाईचा
आहेर वा.र.
नासिक, मो.९९५८७८२९८२



## विसर पडला

विसर पडला थोर संतांचा
विसर पडला महापुरूषांचा
कोणाला काय म्हणावे आता
त्यांना विसर पडला स्वतःचा

विसर पडला भारतमातेचा
विसर पडला क्रांतिवीरांचा
पडला विसर बळीराजाचा
विसर पडला त्यांच्या कार्याचा

विसर पडला पुस्तकांचा
विसर पडला ज्ञानाचा
अज्ञानी झाले कसे बघा...?
दरवाजा उघडती विनाशाचा

विसर पडला त्या नारीशक्तीचा
विसर पडला तिच्या दुधाचा
भर रस्तात तिची नग्न धिंड
काढली
सत्यानाश करतात जीवनाचा

विसर पडला सत्य,अहिंसेचा
विसर पडला समता, बंधूतेचा
पडला विसर निसर्गाचा
हा खरा दोष आहेत कोणाचा...?

विसर पडला माणुसकीचा
विसर पडला स्वाभिमानाचा
धावत सुटले मोठे व्हायला
भुत सवार झाला आहे
प्रसिद्धीचा

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## नक्कल

छकुलीने ठरविले एकदा
करावी आजीची नक्कल
जुने लुगडे नेसून
पाजू लागली अक्कल

आईला दरडावून म्हणाली
सूनबाई आला मला ताप
साजूक तूपाचा शिरा कर
टाकून बदामाचे काप

अंग माझे दुखतय
हाता पायात भरला वात
गडवाभर मसाल्याचे दूध दे
खात नाही अळणी भात

सर्दी मला झाली
सुंठ मिऱ्याचा दे काढा
थोडे अपचनही झाले
पाण्यासोबत दे लिंबू सोडा

नक्कल तिची पाहून
आजी जोराने हसली
दातात जिभ दाबल
छकुलीने धूम ठोकली
- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## श्रावण

श्रावणामध्ये रिमझिम
बरसे सरीवर सरी
हिरवी सृष्टी बहरूनी
आली आहे काळ्या भुवरी

पाऊस मागे ऊन पुढे
रानवारा होई बेधुंद
आकाशी इंद्रधनु दिसे
मनमोहक सप्तरंग

पिसारा फुलवुनी मोर
नाचे थुईथुई रानात
कोकीळेचा गोड आवाज
घुमतो आंब्याच्या वनात

श्रावण महिन्यात होई
सारे सणावारात दंग
निसर्ग वातावरणात
उधळे उत्साहाचा रंग

श्रावणातल्या सृष्टीमध्ये
चैतन्य वाटे क्षणोक्षणी
निसर्ग होतो जादूगार
आनंद भरे मनोमनी

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण. मो. ९७६४३५०३७४

## आशिक पाऊस

लांब वेणीवर पडतो पाऊस
चक्क गजऱ्यावर अडतो पाऊस.

राजसाच्या त्या इशाऱ्यानेच
भ्याड कुठला बडबडतो पाऊस.

गोपिकेला मज सोबत पाहून
का अजूनी तडफडतो पाऊस.

द्वाड हृदयाची धडधड ऐकून
पावसाळ्यागत रडतो पाऊस.

कामिनी मृगनयना दिसते तूच
ना पिता ही व्हलगडतो पाऊस.

आवडे इश्काचा कारावास
सात जन्मी मग झडतो पाऊस.

स्पर्श करते तू जेव्हा अधरास
वातिसम तो फडफडतो पाऊस.

- रज्जाक शेख ,श्रीरामपूर
9665778558



## श्वास माझा फुलतो

श्वास माझा फुलतो
आणि दरवळतो
जेव्हा माझ्या प्रीतीच हास्य
तुझ्या गालावर खिळत
जीवनाची वाट माझ्या
तुझ्या येण्याने फुलली
खऱ्या आयुष्याची किंमत
मला तुझ्यामुळे कळली
माझी भक्ती तू
माझी शक्ती तू
माझ्या देहाची अर्ध अंग तू
तुझ्यामुळे माझ्या आयुष्याचा रंग
खुलतो
श्वास माझा फुलतो
आणि दरवळतो
जेव्हा माझ्या प्रीतीच हास्य
तुझ्या गालावर खिळत
- लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## ऋण शहिदांचे...

शान आमच्या तिरंग्याची,
जरा कमी ना झाली...
कारगिलच्या विजयाने त्याला,
नवी झळाळी आली...

पुत्र कुणाचे ,बंधू कुणाचे ,
सौभाग्य कुणाचे गेले...
माय भूमीची लाज राखण्या,
अपंगत्व कुणाला आले...

जरा न ढळला निश्चय त्यांचा,
प्राणपणाने लढले...
शूरवीर ते पुत्र भूमीचे,
धारातीर्थी पडले...

तिरंग्यात लिपटून जेव्हा,
पार्थिव त्यांचे आले...
नतमस्तक त्या वीरांपुढती,
सारे भारतीय झाले...

त्यांच्या बलिदानाची फलश्रुती,
विजय दिवस हा पाहू...
त्या शहिदांच्या ऋणात आम्ही,
सदैव आता राहू...
सदैव आता राहू...

सौ.शारदा श्रीकृष्ण
वानखेडे -चोपडे परभणी.
९८२३०६६६०६

## गूढ...

स्वप्नामध्ये नदी
नदीला ही पाणी
जरी अनवाणी
पाय तीचे
निवडुंगा वरी
दव बिंदू थेंब
तरी ओले चिंब
ओठ त्याचे
गाढ अंधारात
फुले रातराणी
गंध ध्यानी मनी
विसावला
पावसाच्या संगे
पिसाटला वारा
ढगा नाही थारा
अंबरात
बलराज संघई, 9420015108

## श्रावण सरी

श्रावण मासी हर्ष मानसी
आल्या आल्या श्रावण सरी
स्वागत करण्या सज्ज होऊनी
क्षणात भिजल्या सा-या परी

ऊन पावसाच्या या लपंडावात
सूर्यही मनमुराद चिंब न्हाला
त्याचा हा खेळ बघूनी
झाडांनाही मग हुरुप आला

त्याच्या अशा अवचित आगमनाने
हिरवा शालू ओला झाला
चराचरच्या या अद्भूत चमत्काराने
गुलाब मोगरा सुगंध फुलला

चिव चिवाटाच्या कल्लोळात
मयुर-कोकिळेचा आवाज खुलला
धरणी वरती बदल बघूनी
श्रावण सरी मस्तीत बरसला

सुरु झाल्यात बघा आता
रिमझिम श्रावण सरी
सुस्वागतम करू आनंदाने
त्याचे सारे आपल्या दारी

कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

## नवीन वाट

कठीण असते फार
चालणे नवीन वाट

गर्दीची, वर्दळीची
सरधोपट साधी वाट
टाळती सारेच ते, जे
चालती नवीन वाट

ध्येय साधणे उद्दिष्ट
त्यासाठी प्रयत्न करावा
आरंभ करावा जिद्दीने
चालावी नवीन वाट

राजरस्ते वाटे सोयीचे
त्यात प्रलोभने फार
विनाश्रम मिळवणे
त्यात नसे काही सार

आपण शोधावी एक
स्वतंत्रशी पाऊलवाट
ध्येय गाठण्या मनातले
चालावी ही नवीन वाट

-अरुण वि.देशपांडे-पुणे
9850177342

## सूर्योदय

दिवस नवा नवी
किरण ती सोन्याची
होणार वेळ हीआता
सूर्योदयाचे आगमन होण्याची
पहाटे च्या धुक्यां तुनी
एक किरण ती सोनेरी
पडे अलगद निरंतरी
ह्या संपूर्ण सृष्टी वरी
क्षणांत पाहता पाहता ही
हळुवार सारी बहरून गेली
धुक्यांची ही चादर जणू
नाहीशी अशी होऊन गेली
रात्र संपता पहाटझाली
पहाटेच्या धुक्यां नंतर आली
तेजस्वी किरणांनीजणू ही
सृष्टी सारीच न्हाऊनी निघाली
दूर होताच अंधक्कार सारा
लख्ख पडला प्रकाश आता
किरणांचा हा चारही दिशांना
आगमन होताच सूर्य देवाचे
आता
आगमन सूर्य देवाचे ज्या क्षणी
दिशा चारहीलख्ख उजाळली
तेजस्वी सुर्य-किरणे पाहुनी ही
जीवसृष्टीसारी प्रफुल्लित झाली

तेजस्वी ह्या किरणांनी सर्वांसी
मिळाली एक उमंगनवी
जगण्याची जीवसृष्टी ही करणार
सुरवात पुन्हा नव्यादिवसाची
अन नव्या आयुष्याची

- तुषार राजेश लाखे.
वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

## कवडसा

तांबडी माती अन् माडांचा तो थाट,
दूर... दूर...हिरवाळीत हरवलेली ती पाऊलवाट.

तांबूस सोनेरी किरणे पाना पानातून हळुवार काढीत वाट
माहित नाही कुठवर, वळण घेत जाते ही स्मरणवाट.

उत्कंठेची ही अपूर्वाई अवचित पुढे येई.
जुन्या जुन्या त्या हळव्या क्षणांत मन हरवूनी जाई.

मनाचे नि उन्हाचे कोवळे हृदयापासून जपलेले नाते.
हरवलेल्या निवांत क्षणी अगदी जिव्हारी भिडते.

मनाची नि उन्हाची नाती कितीतरी जुनी,
मन पटलावर कोरली आहेत जशीच्या तशी अजूनी.

लहानपणी कोणाचे तर घर बांधायचे होते उन्हात,
पण तेच ऊन केव्हांचेच ऋतून बसलेय मनात.

कधीतरी केव्हां तरी दूरची ती स्मरण वाट निशेत विरते
जेव्हा. आठवणींचा हळवा काठ,
अश्रूत भिजतो तेंव्हा तेंव्हा.

©सौ. वैशाली इंदुमती- जाधव महाडिक.
सं. क्र.- ९७६७४३७९२३.



## तुला चोरून बघताना

तुला चोरून बघताना वेगळीच खुप मज्जा भासते,
तुझ्या आठवणीत रमताना... तुझ्या सोबत फिरावस
वाटते, तुझं ते निरागस हास्य
निहारून पहावस वाटत, हातात हात घालून
तुझ्या सोबती चालावस वाटत, तुझ्या त्या लाजऱ्या कडे
एकटक पहात राहावस वाटत, तुझ्या समोर उभा राहून
तुझा चेहरा मनात भरावसा वाटत, तुझ्या सोबत खूप
बोलावंसं वाटतं, आयुष्याचे सारे क्षण
तुझ्या सोबतीने जगावं वाटतं बस एक गोष्ट सांगावीशी
वाटते... मी तुझ्यावर जिवापा
प्रेम करतो, खरच तुझ्यावर जिवापार
प्रेम करतो..
आदित्य झिनागे

## बाप

आईचं गुणगान खूप झाले,
बिचाऱ्या बापाने काय केले.
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी,
आपण फक्त गातो आईचीच गोडवी.
आईकडे असतील अश्रूंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट.
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई.
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही,
देवकी यशोदेचं प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा
वासुदेवही आठवा.
रामासाठी कौशल्येची झाली
असेल कसरत, पुत्र वियोगाने मरण
पावला बाप दशरथ.
काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी,
आपण मात्र वापरी शर्ट-पँट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी,
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी.
वयात आल्यावर मुले आपल्याच
विश्वात मग्न, बापाला दिसे मुलांचे
शिक्षण, पोरीचे लग्न. मुलाच्या
नोकरीसाठी जिना चढून लागते धाप,
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे
झिजवणारा बाप, जीवनभर
मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा.
त्यांनी समजून घ्यावं हीच माफक इच्छा.

## सुखी जीवनाचा मंत्र घराघरात रुजावा

आधुनिक केसरी

नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरापासून ते भारतातल्या ग्रामीण स्तरापर्यंत अनेक ठिकाणी काम करण्याची संधी मला मिळाली आणि यातून लैंगिक समस्यांबद्दलचं गांभीर्य अधिक तीव्रतेनं माझ्यापर्यंत पोहोचलं. लैंगिकतेविषयी एकूणच भारतीय समाजात असणारे गैरसमज, प्रथा-परंपरा यांची बंधने, समाजाची चौकट या सर्व गोष्टींमुळे मुस्कटदाबी होत असलेल्या लैंगिक समस्यांनी ग्रस्त रुग्णांना जेव्हा मी पाहातो, भेटतो, त्यांच्याशी चर्चा करतो तेव्हा मन विषण्ण होतं. खरं तर माझ्या मते अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसारखीच सेक्स ही एक गरज आहे. मात्र त्या गरजेचा स्तर समाजानं एवढ्या खालच्या दर्जाला नेऊन ठेवला आहे की त्यावर बोलणं सुद्धा महापाप समजलं जातं. मात्र आता काळ बदललाय. स्त्रियाही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजात पुढे आलेल्या आहेत. अजून एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे साम टीव्ही या वाहिनीवरील दर शुक्रवारी रात्री ११ वा. प्रसारित होणाऱ्या माझ्या 'सुखी जीवनाचा मंत्र' या कार्यक्रमात प्रश्न विचारणाऱ्यांमध्ये स्त्रियांचाच भरणा अधिक आहे. मानसिकता बदलत आहे. एवढं मात्र नक्की. आता गरज आहे ती योग्य अशा लैंगिक शिक्षणाची.




वाचकहो, प्रेम ही किती गोड संवेदना आहे. खरं तर मी म्हणेन की अखंड प्राणिमात्रांत मनुष्यप्राण्याला लाभलेलं हे एक वरदान आहे. प्रेम ही जाणीव, संवेदना, भावना इतर कोणत्याही प्राण्यामध्ये नाही. मग केवळ गैरसमजांपोटी, दबावापोटी, अंधश्रद्धेपोटी आपण त्या आनंदापासून, त्या गोड क्षणांपासून अलिप्त का राहावं? माझं असं अजिबात म्हणणं नाही की भारतात पाश्चात्य देशांसारखा ओपन सेक्स यायला हवा किंवा लग्नासारखी एक चौकट जी केवळ आणि केवळ भारतात प्रथेप्रमाणे स्वीकारली गेली आणि जी आजही विश्वासपूर्णरीत्या जपली जाते ती मोडून पाडावी. अजिबात नाही. समाजाच्या चौकटीत राहून, प्रथा परंपरांचा आदर करत सुद्धा आपल्या जोडीदारासोबत आपण लैंगिक संबंधांचा पुरेपूर आनंद आयुष्यभर मिळवू शकतो. बस्स आवश्यकता आहे ती तुम्हाला असलेल्या लैंगिक समस्यांबद्दल तुम्ही उघडपणे बोलण्याची, त्यावरचं योग्य मार्गदर्शन घेण्याची आणि वेळ आल्यास सेक्समधील अनेक गोष्टींचा जाणीवपूर्वक अभ्यास करण्याची.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

हजारो प्रश्न आहेत ज्याची ठोस अशी उत्तरे आपल्याला माहीत नसतात आणि ती माहीत करून घेण्याचा प्रयत्नही आपण कधी करत नाही. या पुस्तकाच्या माध्यमातून साध्या, सरळ, सोप्या भाषेमध्ये अशी अनेक प्रश्नांची या टीव्ही शोमुळे किंवा या माझ्या सदरामुळे समाजाची मानसिकता बदलण्यात काही अंशी का होईना निश्चितपणानं फरक पडेल. समस्यांचं गांभीर्य कसं असतं बघा... हल्लीच माझं 'सुखी जीवनाचा मंत्र' या साम टीव्हीच्या शोमध्ये मला एका ६५ वर्षांच्या विधवा स्त्रीनं प्रश्न विचारला की मला सेक्स भावना अनावर होतात तर मी काय करू? आता हे वाचून काही जण हसतील, काही जण त्या बाईला मूर्खात काढतील, काही जण ती बाई कशी निर्लज्ज आहे वगैरे म्हणतील. पण वाचकहो तसं नाहीच, बघा सेक्स ही एक अशी गोष्ट आहे की जिला वय, ठिकाण, व्यक्ती, कोण? विधवा आहे की विधुर आहे, ती व्यक्ती लहान आहे की मोठी आहे या गोष्टी कळत नाहीत. ती एक भावना आहे आणि ती योग्य अशा नैसर्गिक क्रियेने पार पडली नाही तर घुसमट होणारच, फ्रस्ट्रेशन येणारच. आत त्या ६५ वर्षांच्या विधवा स्त्रीला सेक्स करण्याची परवानगी आपला समाज देईल का ? आणि जरी दिली तरी तिच्याशी या वयात संभोग कसा होणार? किंवा आपल्या समाजरीतीप्रमाणे सेक्स करण्यासाठी लग्न करणे आवश्यक आहे का? तर या वयात तिनं लग्न करणं योग्य आहे का ? असे हे जे प्रश्न आहेत किंवा अशा ज्या काही समस्या आहेत त्यावर शास्त्रोक्त उत्तर मिळवण्यासाठी हे पुस्तक आहे.

परवा पुण्याच्या माझ्या ओपीडीमध्ये आलेल्या एका स्त्रीनं मला विचारलं की सर माझे अनेक पुरुषांसोबत लैंगिक संबंध आले आहेत तर मला एचआयव्ही एड्स होणार का? मला खूप भीती वाटत आहे. एका बाजूला आपल्या संस्कृतीनं, समाजानं, समाज सुव्यवस्थेसाठी निश्चितच आपल्याला लग्नासारखी चौकट घालून दिली आहे. ज्यामध्ये पुरुषानं एका स्त्री सोबत आणि एका स्त्रीनं एकाच पुरुषासोबत लैंगिक संबंध प्रस्थापित करणं बंधनकारक मानले गेलेय. समाज हे बंधन तेवढ्या कठोरतेनं ते पाळताना आपल्याला दिसतोही. पण समाजातल्या काही घटकांना असे प्रसंग किंवा घटना अनुभवायला येतात ज्याने तो अनेक स्त्रियांशी किंवा ती अनेक पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवते किंवा ठेवतो ज्याला समाजानं बाहेरख्यालीपणा, अश्लील वर्तन, अशा अनेक दुःशब्दांनी हिणवलं आहे. अर्थात सामाजिक दृष्टिकोनातून हे अयोग्यच आहे. पण असं झालंच तर काय करावं? असे संबंध प्रस्थापित होत असतील तर कोणती काळजी घ्यावी? आणखी एक वेगळा अनुभव तुमच्यासोबत शेअर करावासा वाटतो की मागच्या महिन्यात माझ्या नाशिकच्या ओपीडीमध्ये एक महिला आली. त्यांच्यासोबत त्यांची १६ वर्षांची मुलगी होती. त्या बाई म्हणाल्या की सर माझ्या या मुलीला समजवा ती सतत मुलांकडे बघत बसते. आता एक तर ती मुलगी १६ वर्षांची, त्यात ती दिसायला खूपच सुंदर, घरात एकुलती एक मुलगी. तिच्या वयाचं आजूबाजूला पण कोणी नाही, सर्व समवयस्क काय ते तिच्या शाळेत, आणि त्यात तिच्या शरीरात नुकतेच झालेले आणि होत असलेले बदल अशा सर्व मिश्रणामध्ये कदाचित आपल्याला नेमकं काय होतय हे सुद्धा त्या मुलीला कळत नसेल. अशा वेळी काय करणार? तिला कसं समजावणार? तिच्या मनात असलेल्या लैंगिक आकर्षणावर तोडगा काय? अजून एक वेगळी समस्या घेऊन एक पंचविशीतल्या मुलाचे वडील माझ्याकडे आले होते. त्यांचा मुलगा लग्न करणारच नाही असं त्यांना वारंवार ठणकावून सांगत होता. त्याला जेव्हा वडिलांनी कारण विचारलं तेव्हा सुरुवातीला त्यानं अनेक कारणं सांगितली. पण सरतेशेवटी जेव्हा वडिलांनी त्याचं काही ऐकलं नाही आणि त्यांचं लग्न ठरवलं तेव्हा त्या मुलानं खरं कारण आपल्या वडिलांना सांगितलं आणि तो म्हणाला की त्याचं लिंग आकारानं अगदीच लहान आहे म्हणून मी लग्न करणार नाही. आता ही समस्या मी पहिल्यांदाच ऐकत नव्हतो. हा प्रॉब्लेम अनेकांना आहे. किंबहुना पुरुषांचं लिंग हे जाडजूड, मोठ्ठं असंच हवं अशा काहीतरी भ्रामक आणि किळसवाण्या गैरसमजुती मला आढळून आल्या. आता लिंगाचा आकार आणि सेक्स यांचा काही संबंध आहे का? मोठं लिंग असेल तरच मूल होतं का? लिंगाचा नैसर्गिक छोटा आकार मोठा करता येतो का? स्त्रीला शारीरिक तृप्ती येण्यासाठी लिंगाचा आकार लहान, मोठा असण्याचा काही संबंध आहे का? असे अनेक प्रश्न या निमित्तानं निर्माण होतात. वाचकहो असे हजारो प्रश्न आहेत जे गेल्या २०-२५ वर्षांच्या माझ्या कारकीर्दीमध्ये एक सेक्सॉलॉजिस्ट म्हणून माझ्यासमोर आले आणि त्या त्या शंकांचे, समस्यांचे निरसन करून ते ते रुग्ण आता त्यांच्या त्यांच्या आयुष्यातला त्यांनी गमावलेला सेक्सचा आनंद घेत आहेत. आज अनेक रुग्णांशी माझं असलेलं नातं हे अत्यंत घरोब्याचं आहे. त्यांच्या घरातील आनंदाच्या क्षणी ते मला आठवणीनं आमंत्रित करतात. सतत संपर्कात राहतात. त्यांना त्यातून आनंद मिळतो. आपल्यासोबत आपल्याला मार्गदर्शन करणारा, योग्य मार्ग दाखवणारा कोणी जाणकार आहे आणि त्याच्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे ही भावना जेव्हा मला त्यांच्या चेहऱ्यावर दिसते त्याचं मोल मी शब्दांत व्यक्त करू शकत नाही. या सदररूपी पुस्तकाच्या माध्यमातून समाजात जागरुकता निर्माण होण्याबरोबरच लैंगिक समस्यांमधून मुक्ती मिळणे हे सुद्धा एक उद्दिष्ट आहे. याचा फायदा केवळ महाराष्ट्रापुरताच मर्यादित न राहता तो जगभराला मिळावा आणि सुखी जीवनाचा मंत्र घराघरात रुजावा हीच या मागची सदिच्छा आहे.

## महापूर आणि वास्तव



सागरकुमार झनके
संपर्क क्र. 9822575244

आधुनिक केसरी

**22 जुलैचा मरणाचा पाऊस. पाऊस एवढा की काही क्षणात जळगाव शहरात पाणीच पाणी. सातपुडा डोंगरात अक्षरशः पावसाने कहर माजवला.तो पाऊस नव्हताच ती होती ढगफुटी.या ढगफुटीने पहाडातून वाहणारे लहान मोठे नदिनाले ताकदीने वाहू लागले. सातपुड्यातून वाहणारी पद्मावती नदी आपल पात्र सोडून जीकडे वाट मिळेल त्या वाटेन वाहू लागली.**

तीलाही कधी स्वप्नातही वाटल नसेल एवढ पाणी घेवून मला वाहवं लागेल.माझ्यामुळे लोकांचे संसार उघड्यावर पडतील.त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहतील.ज्या शहरांने मला लहान मुलीसारख जपल.त्याच माझ्या माहेरातील लोकांच्या आयुष्याशी मला खेळावं लागेल.तीलाही या गोष्टीच दुःख झालं असेल.पण तीचाही नाईलाज होता.अखेर जे व्हायच तेच झालं. *पद्मावती नदीचा महापूर त्यांन लोकांचा भरला उर,संसार पडला उघड्यावरवर,त्यांना प्रशासनाने सोडल वाऱ्यावर मग लोकांनी कोणाला धराव धाऱ्यावर. महापूर एवढा की,सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या जळगाव शहराचं एका क्षणात भयावह चीत्र कायमच रेखटल्या गेल. आजप्रयंतही असा पाऊस जळगाव करांनी कधीच पाहिला नसेल. शहराच्या मध्यभागातून वाहणारी पद्मावती नदीने आक्राळ विक्राळ स्वरूप धारण करत जळगाव शहराला आपल्या कवेत घेतलं.घरात पाणी दारात पाणी जीकडे जीकडे पहावं तीकडे पाणीच पाणी...

शहरातील लहाण मोठ्या नाल्या तुडुंब भरल्या.त्यात पद्मवतीची भर...काही क्षणात जळगाव शहराला महापूराच स्वरूप प्राप्त झालं....

सकाळची वेळ होती.लोक नुकतेच झोपीतून ऊठले होते.पावसाचा जोर वाढतच होता पण लोक आपापल्या कामात व्यस्त होते.पुराच पाणी कित्येकांच्या घराच्या पायरीवर आलं. कुणालाही वाटल नसेल की काही मिनटात हे पाणी आपल्या घरात शिरेल आणि घरातील होत नव्हत सार या पाण्यात वाहून जाईल.आपला सोन्यासारखा संसार असा उध्वस्त होईल आणी आपल्याला जीव वाचवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागेल...तसे पाहता जळगाव शहर अनेक ऐतिहासिक घटनांच साक्षीदार राहिलेलं आहे. त्यामध्ये या एका घटणेची पुन्हा एक भर पडली. पूराच पाणी अनेक भगात शिरलं.लोकांच्या घरात,दारात,रस्त्यावर सारिकडे पाणीच पाणी दिसत होतं. नदीच्या पुराला महापुराच स्वरूप प्राप्त झाल होतं.



एकिकडे लोकांचा आक्रोश तर दुसरीकडे पूराचा कहर. लोक घर सोडून पुराच्या पाण्यातून जीव वाचवण्यासाठी धडपडत होते.उंच जागेवर जात होते.घरात एकाएकी पाणी शिरल्याने लोकांची एकच तारांबळ उडाली होती.फक्त जीव वाचवण्यासाठी कर्ते पुरुष लहान मोठ्यांना पाण्यातून बाहेर काढत होते.यावेळी जळगावकर एकमेकांच्या मदतीला धावून आले.जात पात बाजूला ठेवून माणूसकी हाच एकमेव धर्म या भावणेतून हिंदू मुस्लिम बांधवांनी एकमेकांना मदत केली.लोक वाचले पाहिजे.घ्या घरात पुराच्या पाण्यात लोक अडकले त्यांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयंत्न केल्या गेले. ज्यांच ऊंच ठिकाणी मजल्याच दुमजल्याच घर आहे अशा ठिकाणी लोक सहरा घेवू लागले.लोकांच्या डोळ्यादेखत घरच्या घर पाण्यत वाहून जात होती. लोक केविलवाण्या नजरेन हताश होऊन फक्त पाहत होते.कुणाच घर वाहून जात होतं.कुणाच्या घरातील वस्तू भांडी कुडी वाहत जात होती.गाय,बकरी म्हैस,बैल,कोबडी अशी छोटी मोठी पशु,पक्षी,जीवंत जणावरे पूरात वाहत जात होती.लोक हवालदिल झाले होते. बायाबापड्यांच्या डोळ्यात आसवे मावत नव्हती.तर काही आयाबाया धाय मोकलून रडत होत्या.पुरातून जीव वाचवलेल्या अनेक पुरग्रस्थांना मंदिर,मस्जिद यामध्य सहारा घ्यावा लागला. म्हातारे,लहान मोठे,चीले पीले,सारे आपला जीव वाचवित होते. एका गोष्टीचा मात्र या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावा लागेल.ही जी पूर परिस्थिती संपूर्ण तालुक्यासह जळगाव शहरात ओढवली;ती वेळ सकाळची होती.कदाचित हीच परिस्थिती रात्रीला झाली असती तर मात्र जळगाव तालुक्याच चीत्र फार भयानक असतं.त्या काळ्याकुट्ट रात्री पूराच्या पाण्याने पाठीमागून वार करत चीर निद्रेत असनाऱ्या अनेक कुटुंबातील जीवंत लोकांनसह मुक्या जणावरांना जल समाधी दिली असती.त्या भयान रात्री सारं भयानक घडलं असतं.बायाबापड्यांच्या किंचाळ्यांनी सारीकडे हाहाकार माजला असता. आपण कल्पनाही करू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असती. कायम दिवसाच्या उजेडाच्या प्रतीक्षेत असलेल्या काळीकुट्ट रात्रीत पुराच पाणी थयथय करत नाचल असतं.त्या अंधाराचा फायदा घेत पद्मवती नदीने बळजबरीने घराघरात घूसुन जीवंत लोकांचे जीव घेतले असते.पण नियतीला मात्र हे मंजूर नव्हते.काळ आला होता पण वेळ आली नव्हती. विधात्याच्या मणात काही वेगळच होतं अस म्हणायला काही हरकत नाही.त्यामुळे ही घटणा भल्या पाहटे घडली आणि जे अघटीत घडायच होतं ते घडलं नाही. लोकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. मानसिक त्रास झाला.पण यामध्ये कुणाच जीव गेला नाही.फक्त संग्रामपूर तालुक्यातील एक व्यक्ती पुराच्या पाण्यात वाहून गेला.त्याला वाचवण्यासाठी लोकांनी शर्थीचे प्रयंत्न केले.पण त्या व्यक्तीला वाचवण्यात अपयश आले. असो,ही घटणा भल्या पहाटे घडली त्यामुळे जीवित हाणी टळली एवढे मात्र खरे. लोकांना अशा नैसर्गिक संकटातून बाहेर काढणे,त्यांना आधार देने,त्यांना मदत करणे ही जबाबदारी शासण प्रशासनाची असते.मात्र चीर निद्रेत असलेल्या प्रशासनाला फार उशिरा जाग आली.आणि जाग येवूनही त्यांनी फारकाही केले नाही....

पूर ओसरला होता. घराघरात पाणी साचल होतं. गाळात सर्व भांडीकुंडी फसली होती.घरातील सामाण वाहून गेलं होत.कुणाच घर वाहून गेलं होतं.कुणाच्या भिंती पडल्या होत्या,गहू ज्वारी घरातील सार धाण्य वाहून गेल होतं.तर भिजलेल्या धाण्याला कोंब फुटले होते.शहरातील नदीकाठावरील घरे,दुकाणे पाण्यात वाहून गेले होते.वाहूनच गेले नव्हते तर घर,दुकाण कोण्या ठिकाणी होते ती जागाही ओळखता येत नव्हती.तशीच परिस्थिती शेतांची होती.गुरेढोरे गोठ्यात मृत्युमुखी होवून निपचित पडली होती.वडशिगी,येनगाव,पिंपळगाव काळे,सुनगाव,तरोळा,आसलगाव, गाडेगाव,धाणोरा महासिद्ध यासह अनेक गावात पुराने हाहाकार माजला होता.धाणोरा महिसिद्ध येथील एक तरुण कुटुंबातील बायको लेकराला वाचवण्यासाठी धडपडत असतांना पुराच्या पाण्यात वाहून गेला होता.पण नशीब चागले म्हणून चारशे पाचशे मिटर अंतरावर पाण्याबाहेर फेकल्या गेला.संपुर्ण तालुक्यातील रोडवरील लहान मोठे पुल उध्वस्त झाले.विजेचे खांब पाण्यासोबत वाहून गेले.त्यामुळे संपूर्ण तालुक्यातील विज बंद होती. पाण्याच्या पाईपलाईन वाहून गेल्या होत्या,अशा भयंकर परिस्थितीत संपूर्ण तालुका सापडला होता.आलेला पूर लवकर कमी झाला. दिवस माथ्यावर आला.घड्याळाचे काटे हळूहळू पुढे सरकत होते.पूर ओसरून बराच वेळ झाला होता.घटणा सकाळी घडल्यामुळे अनेकांना भुका लगल्या होत्या.काहीच्या डोळ्यातून आसवांचे महापूर वाहत होते.अशी परिस्थिती कुणावरही येवू नये.फार भयंकर होतं सारं.पूर गेल्यानंतरच चीत्र मनाला वेदना देणारं होत.काळीज पिळवटून टकणारी ही दृष्य डोळ्यासमोरून जाता जात नव्हती.काळीज आतून पाझरत होतं.दाटलेल्या हुंदक्यातून फाटलेल्या काळजावर वेदनेचे घाव होत होते.मणात आक्रोश खदखदत होता.काय गुन्हा होता आमचा.अशी कोणती चूक आमच्याकडून घडली की त्याची ही भयंकर सजा आम्हाला मिळत आहे.लोक मणातल्या मणात पुटपटत होते.बाया रडत होत्या.लेकरं पाण्यासाठी तहानलेली होती.पण झालेल्या नुकसानीने सारेच आवाक झाले होते....बस्सं...आता सरकार मायबाप मदतीला धावून येईल या भाबड्या आशेवर कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती आस लावून बसला होता.पण पदरात मात्र निराशाच पडली.नगरपरिषद आणि महसूल प्रशासनाने अशा संकटाच्या काळात लोकांना वाऱ्यावर सोडल असं म्हणायला हरकत नाही. लोकांना वेळेवर काहीच मिळालं नाही.तात्पुरत्या निवाऱ्याची आणि एक वेळ जेवणाची सोयही या प्रशासनकडून व्यवस्थित केल्या गेली नाही.शहरातील नदीनाल्याकठावरील गरिब,श्रिमंत,हिंदू, मुस्लिम,बौद्ध या साऱ्याचे पहापूराने हाल-हाल केले.पण या लोकांच्या मदतीला प्रशासनाच्या अगोदर तातडीने मदत केली ती शहरातील हिंदू, मुस्लिम बांधवांनी.अनेक दानशूर लोक मदतीसाठी धावून आले.स्वातीताई वाकेकर आणि त्यांचे सहकारी, विद्यमान आमदार डॉ..संजय कुटे साहेब आणि त्यांचे सहकारी,कार्यकर्ते पिडितांना मदत करत होते.शहरातील पूरग्रस्त भागात जावून लोकांना मदत करत होते.जेवणाची व्यवस्था करत होते. जीवनोपयोगी वस्तू देत होते.अनेक कुटुंबांचे संपूर्ण घर पाण्यात वाहून गेल्यामुळे त्यांच्या अंगावर फक्त कपडे तेवढे शिल्लक राहिले होते.अशा लोकांना कपड्यांची व्यवस्था करत होते.खरच जळगावकरांनी आपल्या समाजबांधवांसाठी अशा कठीण प्रसंगात केलेली मदत पूरग्रस्त कदापिही विसरू शकणार नाही. पण या उलट ज्यांची ही जबाबदारी आहे असे नगरपालिका प्रशासन आणि महसूल विभाग कोणत्या बिळात लपून राहिले होते... ?का त्यांना या लोकांसाठी पाझर फुटले नाही... ? लोकांसाठी सरकार म्हणजे मायबापच.या मायबाप सरकारच्या सामाजिक जाणीवा एवढ्या बोथट का व्हव्यात.असे अनेक प्रश्न मणात जागृत लोकांच्या मणात खदखदतात.....

शेवटी जे व्हायचे तेच झाले.तालुक्यातील, जिल्ह्यातील रविकांत तुपकर,आमदार,डॉ. संजय कुटे,प्रसेनजीत पाटील, प्रशांत डिंक्कर,स्वातीताई वाकेकर,यासारखे नेतेमंडळी गावागावात,शेतात जावून झालेल्या नुकसानीची पाहणी करून जणतेला धीर देवू लागले.आमदार आ.संजय कुटे साहेबांनी विधानसभेत पूरग्रस्तांना भरिव मदत मिळावी यासाठी आवाज उठविला आणि प्रत्येक कुटुंबाला दहा हजार सानुग्रह मंजूर करून घेतले,त्याला महाराष्टाचे उपमुख्यमंत्री अजीतदादानी हिरवा सिंग्नल दिला.मात्र पुन्हा सरकार मायबापाने पुरग्रस्थांच्या हाती नुसतच गाजर दिले. दहा हजरा ऐवजी पाचच हजार जणतेच्या खात्यात जमा झाले.पूरपिडीतांचे घराचे,शेतीचे पंचनामे करण्यासाठी तलाठी,ग्रामसेवक फिरू लागले.त्यातही बरेच सर्वे टेबलवर बसून झाले.सर्वेत हौसे,नवसे,गवसे सारेच घेतल्या गेले..

एकंदरीत जणतेचा जीव जात होता.अशा वेळी प्रशासनाकडून मिळालेली मदत मरता मरता तोडांत पाणी टाकण्याच काम करत होती. पूरपिडीत मदतीची आस लावून बसले होते.पण त्यांच्या आशेची घोर निराशा झाली. लोकांना निवारा आणि जेवणही वेळेवर मिळाले नाही. जळगाव जामोद नगरपालिकेचे सी.ओ.डोईफोडे यांनी पूरग्रस्तांना सपशेल वाऱ्यावर सोडले.कुठलीच मदत त्यांनी वेळेवर दिली नाही. लोकांच्या जीवणाशी खेळणाऱ्या या सी.ओ.साहेबांची कमालीची उदासिनता या ठिकाणी प्रकर्षाने दिसून आली. पाणी प्रश्न, आरोग्य,यावरही वेळकाढू पणाचे धोरण अवलंबविले.पत्रकार परिषद घेवून शहरात चालू असलेल्या परिस्थिती बाबात माहिती दिली.पण ऑँफिसात बसून माहिती देणाऱ्या सी.ओ.साहेबांना सांगेवेसे वाटते साहेब ग्राऊड लेवलरलची परिस्थिती वेगळी आहे.लोक सी.ओ. च्या नावाने आक्रोष करत होते.भाई.दिपक खरात यांनी शहरातील जणतेला सोबत घेवून नगरपरिषदेला घेराव घातला.नगरपरिषदेच्या दारात,सी.ओ.साहेबांच्या कँबीनसमोर नगरपालिकेच्या ढीसूळ कारभाराचे पाढेच वाचले.तेव्हा कुठ पुन्हा एकदा नगरपालिकेचे प्रशासन जोमाणे कामाल लागले.भिम नगर,सिद्धार्थ नगर,पंचशील नगर या भागात मुलभूत सुविधा पुरवू लागले.जेष्ठ पत्रकार विजय पोहनकर यांच्या लेखनितून प्रत्येक दिवशी पुरग्रस्थांच,प्रशासनाच जीवंत वास्तव रेखाटल्या जात होतं.पोलीस प्रशासनकाडे कमी मनुष्यबळ असून सुद्धा जळगाव जामोद तालुक्याचे पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे साहेब सर्व बाबीवर लक्ष ठेवून होते.आपल्या सहकाऱ्यांसोबत ते पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धावून जात होते. जळगाव शहर एका घटणेने हादरले होते.महापूर होवून एकच दिवस आड झाला होता. सातपुड्याच्या पायथ्याशी असलेले गोराळा धरण पुर्ण क्षमतेने भरले होते.दुपारची वेळ होती.गोराळा धरण फुटल्याच्या अफवेने जळगाव शहर हादरले होते.परिस्थिती बिकट झाली. काय करावं कुणालाच सुचत नव्हतं. लोक जीवाच्या आकांतांने सैरभैर पळत होते.पण अशा परिस्थितीत जळगाव जामोदचे ठाणेदार दिनेश झांबरे साहेबांनी क्षणाचाही विलंब न लावता गोराळा धरण गाठले.धरणाच्या परिस्थितीची पाहणी केली.आणि ताबतोब धरण न फुटल्याची माहिती तात्काळ शहरवासियांना दिली.तेव्हा कुठ धगधगणारं शहर शांत झाले...

पूर ओसरून आठ दिवस झाले.पण अजूनही जळगाव शहराचं जनजीवन पुर्वपदावर आले नाही. अजूनही कर्मचारी, अधिकारी वर्ग पंचनाम्यातच गुंतलेले आहेत.पूर ओसरल्यानतर चोवीस तासाच्या आत मिळणारी मदत तीन चार दिवस उलटल्यानंतर मिळू लागली. दहा हजारा ऐवढी पाचच हजार मदत पूरग्रस्थांच्या खात्यात जमा होवू लागली. अजूनही लोकांच्या घरादारात रस्त्यावर गाळ साचलेला आहे.

# लय भारी सुगरण

## पुरणाचे धोंडे



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



आधुनिक केसरी

अधिक मास म्हणजेच हा महिना 3 वर्षातून 1 वेळा येतो .याला पुरुषोत्तम मास ,धोन्ड्याचा महिना असेहि सम्बोधतात . या महिन्यात सासूने जावयाला वाण देणे खूपच पुण्याचे मानले जाते .लेक व जावई हे लक्ष्मी. .नारायणाचे रूप मानून त्यांना मान देतात. यावेळी 33 अनारसे, धोंडे किंवा ज्यामध्ये तूप असेल किंवा जाळीदार अशा पदार्थांचे वाण देतात मग अलीकडे म्हैसूरपाक, तुपात तळलेले गुलाबजाम, किंवा बत्तासे असेही देतात. त्यांपैकी धोंडे हे पुरणाचे किंवा नारळाचे सुद्धा करतात. आज आपण पुरणाचे धोंडे कसे करतात ते पाहू.

**साहित्य :** 1 वाटी हरभऱ्याची डाळ ,1 वाटी गूळ किंवा अर्धी वाटी साखर आणी अर्धी वाटी गूळ , अर्धा चमचा जायफळ पूड, हळद, तूप ,2 वाट्या कणिक ,2 चमचे बारीक रवा , पाव चमचा मीठ.

**कृती :** प्रथम डाळ स्वच्छ धुवून त्यात दुप्पट पाणी ,थोडीशी हळद व 1 चमचा तूप घालून कुकर मध्ये 4..5 शिट्ट्या काढून शिजवून घ्यावी . मग चाळणी मधे काढून सर्व पाणी म्हणजेच कट गाळून घ्यावा. पारंपारिक पद्धतीत डाळ व गूळ कढईत एकत्र करून शिजवून घेतात. कढई मधील पुरणात उलथणे ठेवून ते सरळ उभे राहिले की पुरण शिजले असे समजायचे. नंतर पूरणयंत्रातून पुरण बारीक वाटून घ्यायचे. पण आपण एकदम सोप्पी पद्धत वापरून झटपट ,कमी कष्टात व छान पुरण कसे करायचे ते पाहू. डाळीतुन कट काढला की डाळ मिक्सर मधून बारीक वाटून घ्यावी .नंतर त्यात गूळ व जायफळ पूड मिक्स करून ओव्हन मधे आधी 3 मिनिटे ठेवावी व बाहेर काढून व्यवस्थित परतून पुन्हा 2 मिनिटे ठेवावी. आपले पुरण तयार झाले. वाटायचा ,शिजवायचा वेळ आणि कष्ट दोन्ही वाचतात. ओव्हन नसेल तर मिक्सर मधून बारीक डाळ वाटून त्यात गूळ घालून छान मिक्स करून गॅस वर शिजवावे .पुरण झटपट तयार होते. ते गार करण्यास थोडे पसरून ठेवावे. आता कणकेत मीठ व थोडीशी हळद घालून रवा घालावा म्हणजे छान पारी होते . त्यात 1 चमचा तूप गरम करून घालावे .पुरणाची पोळी करताना आपण रवा घालत नाही व कणिक सुद्धा एकदम सैलसर भिजवतो कारण त्यामुळे पोळी एकदम मुलायम होते .पण त्याउलट इथे कणिक थोडी घट्टसरच भिजवावी म्हणजे वरची पारी खुसखुशीत व चवदार लागते . कणिक 10..15 मिनिटे भिजू द्यावी व नंतर ती छान मळून त्याच्या पुऱ्या लाटून त्यात पुरणाचे सारण भरून व्यवस्थित बंद करून घ्यावी .किंवा सारण भरल्यावर समोरासमोरच्या बाजू एकमेकांवर दुमडून चौकोनी आकाराचे धोंडे बनवून घ्यावेत व नंतर ते शक्यतो तुपात किंवा रिफाईड तेलात तळून खाताना त्याच्यावर तूप घालण्यासाठी तुपाची वाटी बाजूस ठेवावी .पोळ्या आपण शक्यतो गरम खातो ,पण हे धोंडे वाणासाठी असल्यामुळे थंडच खातात .म्हणूनवरची पारी किंचित जाडसर व खुसखुशीत तळावी.

**वैशिष्ट्य :** कोणी कोणी वरची पारी रवा व मैदा समप्रमाणात घेऊन त्यात गरम तुपाचे मोहन घालून सुद्धा धोंडे बनवतात. म्हणजे ते जास्त वेळ छान राहतात .गोड पदार्थ खाताना किंचित मीठ घातले की जास्त टेस्टी लागतो .म्हणून पारीमध्ये थोडे मीठ टाकावे.

# अतिवृष्टीग्रस्तांना न्याय मिळवून देणार : अशोक चव्हाण यांची ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात मागील तीन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू झाल्याने शेतीसह घरात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शुक्रवारी ( ता .२८ ) तालुक्यातील नूकसानग्रस्त भागाला भेटी देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. अतिवृष्टी ग्रस्तांना न्याय मिळवून देणार अशी ग्वाही दिली आहे.

तेलंगणातील सुधावागु प्रकल्पातील बॅक वॉटरनी नांदा म्हैसापट्टि,लगळुद, रावणगाव येथील गावात पाणी शिरल्याने अतोनात नुकसान झाले आहे.तेथील भागात पाहणी करून ग्रामस्थांशी चर्चा केली व ज्याभागात अतिवृष्टीमुळे नूकसान झाले आहे त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. मी माझ्या मतदारांना कदापी वा-यावर सोडणार नाही अशी ग्वाही दिली आहे.यावेळी माजी



आमदार अमर राजुरकर,तालूका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भगवान दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, नामदेव आयलवाड, उज्वल केसराळे,माधव अमृतवाड,सौ. मंगाराणी अंबूलगेकर, सुलोचना बाई ढोले,अनिता साबळे, यूवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आत्रिक पाटील मुंगल बेंबरकर, गणेश राठोड, संदीप पाटील गौड,मनोज गिमेकर, रामचंद्र मूसळे, विक्रम क्षिरसागर, आदिनाथ चिंताकुठे, उपविभागीय महसूल अधिकारी आनूपसिंह यादव, तहसील राजेश लांडगे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे, उपअभियंता श्री.शिंदे,तलाठी व्हि.एम.जोशी, याच्यासह महसूल ,कृषी ,शिक्षण, लघू पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**बॅकवाटर बाबत सतर्क रहा :** तालुक्यात अतिवृष्टीमुळे घराची पडझड,शेती, रस्ते व पूलाचे नूकसान झाले आहे . संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांनी एक बैठक घेऊन जिथे नूकसान झाले आहे तिथे पंचनामा करून सविस्तर आराखडा तयार करा म्हणजे मागणी करणे सोयीचे होईल .तेलगंणातील सूधावागू प्रकल्पाचा फटका आपल्या भागात बसतो आहे .त्यासाठी अधिका-यानी तेलंगणातील शासनासोबत समन्वय ठेवून योग्य त्या सुचना देऊन होणारी गैरसोय टाळावी याची खबरदारी घ्यावी . **अशोक चव्हाण, ( माजी मुख्यमंत्री**



# अंतर्मनाची ओळख हाच फार मोठा कायदा : न्यायाधीश वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** कायदा हा सर्वांच्यासाठी सारखा असतो. व्यवस्था सुधारण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर करण्यात आलेले कायदे ज्याचा अभ्यास शिक्षण घेत असताना देखील मुला-मुलींनी केला तर गुन्हेगारी वृत्ती वाढणार नाही. आपण जे काम करतो ते योग्य का अयोग्य ?हेच जर आपण अंतर्मनाला साद घालुन ओळखले तर सकारात्मक आणि चांगल्या कामाची प्रवृत्ती बळावत असल्याचे प्रतिपादन येथील दिवाणी न्यायाधीश माणिक वाघ यांनी केले.

खोलेश्वर महाविद्यालय आणि तालुका विधी सेवा समिती संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कायदेविषयक शिबीरात अध्यक्ष पदावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून राम कुलकर्णी,ॲड.मकरंद पत्की, प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी, वकिल संघाचे अध्यक्ष ॲड.अशोक कवडे, ॲड.शिवाजी केंद्रे, ॲड.मनजित सुगरे, ॲड.विकास भुरे, ॲड.बळीराम पुरी, सरकारी वकिल ॲड. लक्ष्मण फड, ॲड.श्रीनिवास कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रतिमा पुजन संपन्न झाल्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.
वकिल संघाचे सचिव सुगरे यांनी प्रास्ताविक करताना महाविद्यालयीन मुला- मुलींमध्ये कायदेविषयक जनजागृती करून देण्यासाठी शिबीराचा असलेला उद्देश त्यांनी समजावुन सांगितला. कार्यक्रमात बेटी बचाओ-बेटी पढाओ, लैंगिक गुन्हेगारापासून बालकाचे संरक्षण आदी विषयावर फड आणि कुलकर्णी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. वकिल संघाचे अध्यक्ष कवडे यांनी निर्भया प्रकरण त्यापासून पोस्को कायद्याची निर्मिती, बाल गुन्हेगारी यावर प्रकाश टाकला. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना राम कुलकर्णी म्हणाले की, न्यायदेवता जनतेच्या दरबारात जावुन जेव्हा कायद्याची जनजागृती करते कौतुकास्पद कार्य असुन वकिल संघाने घेतलेल्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. डोळे घालुन पाहिलं तरी शिक्षा होणारा कायदा तर सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यावरही कायद्याने शिक्षा होवु शकते. छेडछाड असेल किंवा टगेगिरी असेल मुलींचे संरक्षण व्हावे म्हणून सरकारी व्यवस्थेने अनेक कायद्याची प्रबलता पुढे आणली.
पण हिंमत आणि धाडस दाखवुन संकटाचा सामना करण्यासाठी कायद्याचा आधार घेत मुलींनी देखील पुढे यावे असे मत त्यांनी बोलुन दाखविले. अध्यक्षीय समारोप करताना श्री वाघ यांनी केलेले भाषण प्रेरणादायक ठरलं. त्यांच्या म्हणण्यानुसार देशाचा सुजाण नागरिक ज्याने सुज्ञ म्हणुन वागावे. देशभक्ती आणि सामाजिक जाणिव प्रत्येकाच्या मनात असली पाहिजे.

# अणणा भाऊ साठे जयंतीनिमित्त प्रज्ञाशोध परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या 103 व्या जयंतीनिमित्त लोहा शहरांमध्ये प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रज्ञाशोध परीक्षा ही दिनांक 30 जुलै रोज रविवार सकाळी ठीक 11. वाजता कै. विश्वनाथराव नळगे विद्यालय लोहा. या ठिकाणी आयोजन करण्यात आलेले आहे सदर परीक्षेसाठी गट अ 1ली ते 7वी तसेच गट ब 8वी ते 12वी असे दोन गट असून प्रत्येकी दोन्ही गटासाठी प्रथम पारितोषिक 3333 रुपये व सन्मानचिन्ह द्वितीय पारितोषिक 2222रुपये व सन्मानचिन्ह तृतीय पारितोषिक 1111 रुपये व सन्मानचिन्ह तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक 701 रुपये व सन्मानचिन्ह असे पारितोषिक ठेवण्यात आलेले असून सदर प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा.
असे आवाहन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष मा. नगरसेवक अनिल दाढेल व स्पर्धा परीक्षेचे आयोजक सिद्धार्थ पांडुरंग महाबळे यांनी केलेले आहे.

# परीक्षार्थ्यांकडून अतिरिक्त घेण्यात आलेले शुल्क परत करा

## आ. किशोर जोरगेवार यांची अधिवेशनात मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** ५ लाखांपेक्षा अधिक बेरोजगार युवक परिक्षेत सहभागी झाले असल्यास त्यांच्या उमेदवारी अर्जाचा शुल्क हा ४९५ रुपये आणि शासकीय खर्च भागविण्यासाठी १५ टक्के वाढ या निकशानुसार रक्कम आकारण्यात यावी असा नोव्हेंबर २०२२ चा शासन निर्णय आहे. या शासन निर्णयानूसार तलाठी परिक्षेसाठी अर्ज सादर केलेल्या १३ लाख उमेदवारांना त्यांच्याकडून घेण्यात आलेले अतिरिक्त पैसे परत करण्यात यावे अशी मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. अधिवशेनात पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनवर बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी बेरोजगार युवकांचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला. बेरोजगार युवकांच्या हाताला रोजगार नसतांना शासनाकडून त्यांची लुट सुरु असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले असून बेरोजगार युवकांच्या समस्यांकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले आहे.

यावेळी बोलताना ते म्हणाले कि, सरकारने ४ हजार ६४४ जागांसाठी तलाठी भरती प्रक्रिया सुरु केली आहे. यावेळी शासन निर्णय २०२२ नुसार पदभरतीसाठी ५ लाखाहून अधिक उमेदवारांनी अर्ज केल्यास त्यांचा परीक्षा शुल्क ४९५ रुपये, व प्रशासकीय कार्यालयाचा खर्च भागविण्यासाठी कंपन्यानी दिलेल्या दारांमध्ये १५% टक्के कर अशी वाढ करून एकूण परीक्षा शुल्क आकारण्यात यावा असे निश्चित करण्यात आले होते.
त्यामुळे ४९५ रुपयात १५ टक्के रकमेची वाढ केली असता ५५० रु. परीक्षा शुल्क असणे आवश्यक होते. परंतु तलाठी पदभरती करिता १३ लाखाहून अधिक अर्ज दाखल होऊनही उमेदवारांकडून दुप्पट परीक्षा शुल्क म्हणजे खुल्या प्रवर्गासाठी १ हजार रुपये तर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ९०० रुपये आकारण्यात आले आहे. यातून शासनाकडे जवळपास १ हजार कोटी रुपये जमा झाले आहे.





# अतिवृष्टीग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतक-याचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाने त्वरित पंचनामे करून नूकसान भरपाई द्यावी, अशी मागणी तालुका शिवसेना ( ऊध्दव ठाकरे गट ) तर्फे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

येथील तहसील कार्यालयास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,तालूक्यात बागायती क्षेत्रा पेक्षा कोरडवाहू क्षेत्र अधिक असल्याने शेतक-याची भीस्त पावसावर अवलंबून आहे.पाऊस दरवर्षी हूलकावणी देत असल्याने त्याचा फटका खरिप व रब्बी हंगामाला बसतो आहे.यावर्षी पावसाने प्रारंभी डोळे वटारल्याने शेतकरी हवालदिल झाला होता.मागील आठवड्यात तालुक्यात अतिवृष्टीमुळे घराची पडझड होऊन शेती काठावरील पिकाचे नुकसान झाले आहे.शासनाने घटनास्थळी पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनावर शिवसेना जिल्हा उपप्रमुख सतीष देशमुख,तालूका प्रमुख माधव पाटील वडगावकर, संतोष आलेवाड, पांडुरंग वर्षेवार, गंगाधर महादवाड,नागेश पिटलेवाड,वामन पर्वत,मारोती अंनतवार, रामेश्वर भूरे,सोहम शेट्टे, विठ्ठल गाडेकर यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

# कोणत्याही क्षेत्रात प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ देणार नाही : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय विकासात प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधवांचे, तेथील नागरिकांचे महत्वपूर्ण योगदान असल्याने प्रकल्पग्रस्त



कोणत्याही क्षेत्राशी संबंधित असला तरी त्यांच्यावर अन्याय होवू देणार नाही तसेच केंद्र व राज्य सरकारच्या नितीचा लाभ मागासवर्गीयांना मिळवून देवू अशी ग्वाही राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी केपीसीएल च्या बरांज खाण प्रभावीत बरांज, बरांज मोकासा व चेक बराज या गांवातील प्रकल्पग्रस्तांनी आयोजित केलेल्या बैठकीस संबोधीत करताना दिली.भद्रावती येथील आशिर्वाद मंगल कार्यालयात दि. 28 जुलै 2023 रोजी झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या बैठकीमध्ये सहभागी होवून हंसराज अहीर यांनी सागितले की, मागासवर्गीयांवरील अन्यायासंदर्भात ओबीसी आयोगास बृहत अधिकार असल्याने या घटनात्मक अधिकाराचा वापर करुन सर्वांना न्याय देण्याचा आपला संकल्प असल्याचा मनोदय त्यांनी उपस्थित मागासवर्गीय व अन्य प्रकल्पग्रस्त बांधवांशी चर्चा करतांना व्यक्त केला.

केपीसीएलच्या बरांज कोळसा खाणीसंदर्भात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या रखडलेल्या विविध प्रश्नांची दखल घेवून दि. 24 जुलै रोजी विभागीय आयुक्त व केपीसीएल अधिकाऱ्यांसोबत आयुक्त कार्यालय नागपूर येथे रा. मागासवर्गीय आयोगाच्या माध्यमातून झालेल्या सुनावणीमध्ये विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश देण्यात आले त्याबाबत उपस्थित प्रकल्पग्रस्त बांधवांना हंसराज अहीर यांनी सविस्तर माहिती दिली. आयोगाच्या मार्गदर्शनानुसार सर्व प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने कार्यवाही होईल असेही हंसराज अहीर यांनी या बैठकीत सांगितले ते म्हणाले की, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त, कामगार यांच्यासोबत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्वच प्रकल्पग्रस्त कामगारांचे प्रश्न राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या माध्यमातून मार्गी लावण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जाईल असे आश्वासनही अहीर यांनी बैठकीस उपस्थित बराज खाण प्रकल्पग्रस्त शेतकरी, कामगार व नागरीकांना दिले. या बैठकीला सर्वश्री रमेश राजूरकर, करण देवतळे, नरेंद्र जिवतोडे, विजय वानखेडे, प्रविन सातपूते, प्रशांत डाखरे, किशोर गोवारदिपे, अफजल भाई, अंकुश आगलावे, अमित गुंडावार, बरांज चे उपसरपंच रमेश भुक्या, रामा मत्ते, नितीन चालखूरे, गणेश जिवतोडे, राजू मत्ते, रवी डोंगे, पवन हुरकर, प्रदिप मांडवकर यांचेसह प्रकल्पग्रस्त बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.



# बंडू आव्हाड यांची तालुकाध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बंडू आव्हाड यांची खुलताबाद तालुका तलाठी संघाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीनिमित्त विविध मान्यवरांच्या हस्ते बंडू आव्हाड यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दत्तू शेलार यांची कार्याध्यक्षपदी, सरचिटणीसपदी प्रकाश बंड, एन.डी. पट्टे सहसचिव, के.सी. कुलकर्णी उपाध्यक्ष, श्रीमती माधवी हिवरकर महिला उपाध्यक्षा, शिवाजी सोळुंके कोषाध्यक्ष, कल्पना डिघोळे संघटक, श्रीमती उज्जवला वाघमारे महिला प्रतिनिधी, तर सल्लार म्हणून विजय चव्हाण यांची निवड करण्यात आली.

# राजभाऊ माने व इतरांना अटकपूर्व जामीन

## हायकोर्टात ॲड. श्रीकांत जी. कवडे यांचा युक्तिवाद

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील भूम पोलीस



स्टेशन अंतर्गत दाखल असलेल्या ॲट्रॉसिटी व इतर कलमांतर्गत गुन्ह्यात धाराशिव जिल्हा टायगर ग्रुप चे संपर्कप्रमुख राजाभाऊ माने व अजित शिर्के यांना माननीय हायकोर्ट संभाजीनगर यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला

याबाबत सविस्तर वृत्त असे की, भूम येथील अंबाबाई देवीच्या मंदिरा जवळील फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला येऊन असे कळविले की, राजाभाऊ माने व अजित शिर्के यांनी फिर्यादीस व फिर्यादीच्या सुनेस त्यांच्या राहत्या घराजवळ येऊन जागा खाली करण्याबाबत दमदाटी केली व जातीवादी शिवीगाळ केली.सदरील तक्रारीनुसार भूम पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला होता.

सदरील गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी राजभाऊ माने व अजित शिर्के यांनी माननीय सत्र न्यायालय भूम अर्ज केला होता,सदरील अर्ज माननीय सत्र न्यायालयाने फेटाळून लावला.

ॲट्रॉसिटी व इतर गुन्ह्यात जामीन मिळवण्यासाठी राजभाऊ माने व अजित शिर्के यांनी ॲड. श्रीकांत जी. कवडे यांच्या मार्फत माननीय हायकोर्ट मध्ये अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता,

आरोपींच्या वकिलांनी माननीय हायकोर्ट समोर युक्तिवाद केला की,फिर्यादी राहत असलेल्या जमिनीचा दिवाणी वाद चालु आहे. सदरील दाव्यातील व्यक्तींनी फिर्यादीला गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले,सदरील युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय हायकोर्ट ने दोन्ही आरोपीस अटकपूर्व जामीन मंजुर केला, आरोपीच्या वतीने ॲड. श्रीकांत जी. कवडे यांनी काम पाहिले.

# पंचायत राज व ग्रामविकास विभाग सहसंयोजकपदी डॉ.धर्मराज सुरोसे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** भारतीय जनता पार्टी पंचायतराज व ग्रामविकास



विभाग महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने प्रदेश संयोजक गणेश काका जगताप व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रोहिदास धुमाळ यांनी शेवगाव येथील महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठान तथा राष्ट्रीय अटल फाउंडेशनचे राज्य कार्यकारी अध्यक्ष डॉ.धर्मराज सुरोसे यांची अहमदनगर जिल्हा सहसंयोजक पदी मा.रोहिदास धुमाळ यांनी नियुक्ती केली.

डॉ.धर्मराज सुरोसे हे गेली अनेक वर्षापासून भाजपात विविध पदावर यशस्वीपणे जबाबदारी पार पाडलेली आहे. केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना,राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना ग्रामीण भागामध्ये पोहोचण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

या निवडीबद्दल मा.ना.राधाकृष्णजी विखे पाटील,मा खा.डॉ. सुजय दादा विखे पाटील मार्गदर्शक आ.मोनिकाताई राजळे, मा.आ.रामजी शिंदे, मा.आ.बबनराव पाचपुते,मा.शिवाजीराव कर्डीले, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपभाऊ भालसिंग,अभयजी आगरकर,अरुणभाऊ मुंढे, आदि भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी यांनी डॉ.धर्मराज सुरोसे यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# शेतकरी पती पत्नीने गळफास घेत केली आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** रांजणगाव खुरी येथील दर्गा परिसरात तरुण पतीपत्निने



गळफास घेत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.राजू दामोधर खंडागळे वय वर्ष अंदाजे 25 तर पत्नी अर्चना राजू खंडागळे वय वर्ष 22 ते 23 असे दोघांची नावे समजतात.मिळालेली माहिती अशी की 28 जुलै शुक्रवार रोजी दोघे पतिपत्नी सकाळी शेतात गेले होते सायंकाळी अंधार पडला तरी घरी न आल्याने कुटुंबातील सदस्य त्यांना शोधत शेतात गेल्यावर सगळा प्रकार उघडकीस आला. साधारण 6 ते 6:30 वाजेदरम्यान दर्गा ते शेंदूर वादा रोडवरील शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. नातेवाईक व गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना बिडकीन ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले असून बिडकिन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश सुरवसे यांना घटनेची माहिती समजताच तात्काळ घटनास्थळी व ग्रामीण रुग्णालयात धाव घेत घटनेची पाहणी केली. ग्रामीण रुग्णालयाचे

# चित्रपट, साहित्य, कला व सांस्कृतिक आघाडी विदर्भाच्या अध्यक्षपदी रहिकवार

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** दुर्बल भारतीय शोषित हमारा आम दल ( निषाद पार्टी )





चे संस्थापक अध्यक्ष डॉ.संजय निषाद यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच बल्लारपूर निवासी चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक गणेश मुरलीधर रहिकवार यांची कला आणि सांस्कृतिक आघाडीच्या विदर्भ अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीवर संस्थेचे अध्यक्ष गणेश रहिकवार, आदरणीय डॉ.संजय निषाद, अधिवक्ता प्रवीण निषाद ( राज्य प्रभारी व राष्ट्रीय सचिव - निषाद पक्ष ), कैलाशभाऊ केवडे ( महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष- निषाद पक्ष ), सुनीलभाऊ हजारे ( महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष ), प्राध्यापक राहुल जी. गौर ( विदर्भ अध्यक्ष - निषाद पक्ष ), राजू भाऊ लांडगे ( चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष - निषाद पक्ष ), सर्व निषाद पक्षाचे पदाधिकारी, संचालक, सदस्य यांचे मनःपूर्वक आभार.

गणेश मुरलीधर रहिकवार हे आपल्या आयुष्यातील गेली 40 वर्षे कला क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आत्तापर्यंत 70 लघुपटांची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. अलीकडेच श्री गणेश रहिकवार 'नटलीला, द ट्रुथ' या अडीच तासांच्या मराठी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन करत आहेत. याआधी अवनी आणि तुझा संसार आई या दोन 78 मिनिटांच्या चित्रपटांना लघुपट महोत्सवात अनुक्रमे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन भारताच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ वर आधारित सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय गणेश रहिकवार यांना 100 हून अधिक तरुण निर्माते, दिग्दर्शक, कथाकार, संकलक, जीवन गौरव, कला गौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून त्यांच्या नावाची नोंद OMG इंडियन बुक्स ऑफ रेकॉर्ड 2020 मध्येही झाली आहे. गणेश रहिकवार यांच्या या उपक्रमांमुळे व कर्तृत्वामुळे त्यांना निषाद पक्ष चित्रपट, साहित्य, कला व संस्कृती आघाडी विदर्भ अध्यक्षपदाची सुभेदारी मिळाली आहे.



# अभियांत्रिकीचा सुयोग्य पर्याय : छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग

आधुनिक केसरी

बदलती जीवनशैली, जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानामुळे आज विविध क्षेत्रात इंजिनिअर म्हणून करियर करण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे, हळूहळू संपूर्ण भारत आणि जगभरात सर्व शाखांमध्ये कुशल इंजिनिअर्स ची मागणी वाढत आहे, ही दृष्टी डोळ्यासमोर ठेऊन संस्थेचे अध्यक्ष इंजि . रणजित मुळे आणि सचिव श्री पद्माकरराव मुळे यांनी सी. एस. एम. एस. एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनियरिंगची उभारणी २०१३ साली केली.

आमचा विश्वास आहे कि, विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य घडवण्यात महाविद्यालयांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. कोर्पोरेट जगतातल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जबाबदाऱ्या पेलण्यासाठी तयार असलेला तरुण इंजिनीयर घडवण्यासाठी आम्ही वचनबध्द आहोत. विद्यार्थी केंद्रित शिक्षणासोबतच आम्ही त्यांच चारित्र्य घडवण्यासाठी तसेच नैतिक मूल्यांची जपवणूक करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आमच्या विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविण्यासाठी आम्ही नियमितपणे अप्टीट्यूड डेव्हलोपमेंट, सॉफ्ट स्किल्स, इंडस्ट्री ओरियंटेड ट्रेनिंग देतो. उदयोगासाठी कुशल इंजिनीयर देऊन आम्ही अल्पावधीतच नामांकित कंपन्यांकडून प्रशंसा मिळाली आहे. अनेक प्रमुख कंपन्या आमच्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट्सच्या संधी देण्यासाठी आमच्या संस्थेला सातत्याने भेट देतात. नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एनहॅन्सड लर्निंग ( एनपीटीईएल ) आणि कोर्सेरा या प्लॅटफॉर्मच्या मदतीने प्रयोगशील व व्यावहारिक शिक्षण देण्याच्या प्रक्रियेवरही संस्था लक्ष केंद्रित करते. या पद्धतीमुळे आमचे विद्यार्थी विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवत आहेत, त्यापैकी काहींनी विद्यापीठ श्रेणी आणि सुवर्णपदक देखील मिळवली आहेत. चांगल्या शैक्षणिक कामगिरीसोबतच आमचे विद्यार्थी गेट, कॅट, यूपीएससी, एमपीएससी आदी परीक्षांमध्ये उत्तम कामगिरी करीत आहेत. येणाऱ्या काळात आमचे विद्यार्थी टॉफेल, जीआरई, आयईएलटीएस मध्ये उत्कृष्ट कामगिरी करू शकतील.  यासाठी आम्ही अधिक लक्ष केंद्रित करत आहोत. शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच आम्ही विद्यार्थ्यांना सांस्कृतिक आणि क्रीडा प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देतो. आमच्या अनेक विद्यार्थीयांनी सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवले आहेत. नियमित अभ्यासक्रम, सह-अभ्यासक्रम आणि अभ्यासोत्तर  उपक्रमांच्या माध्यमातून आंमचे विद्यार्थी शैक्षणिक तसेच इतर स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. अलीकडेच आमच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय स्तरावर स्मार्ट इंडिया ह्यकेथॉन २०२२ मध्ये प्रथम पारितोषिक व अखिल भारतीय स्तरावरील एसएई एम- बाजाच्या एटीविसी २०२३ च्या इन्होवेशन श्रेणीमधील प्रथम पारितोषिक तसेच द्वितीय पुरस्कार एन्ड्युरन्स रेस पटकावलं आहे. तसेच नॅशनल एआयआरसी गो-कार्टिंग २०२३ मध्ये बेस्ट इन्होवेशन तसेच सर्वोत्कृष्ट महिला रेस कार ड्राइवर पुरस्कार मिळवला आहे. एसएई तिफण २०२३ मध्ये द्वितीय पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवामध्ये प्रथम पुरस्कार




मिळवला आहे. विशेष म्हणजे आमचे प्राध्यापक, कर्मचारी वृंद, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्या अधिक परिश्रमामुळे आणि दूरदृष्टी असणारे आमचे अध्यक्ष इंजि . रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे आम्हाला इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली ( आयएसटीई ) यांच्या कडून सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय - २०२२ या पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे. आमच्या संस्थेत सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा दिल्या जातात. उत्कृष्ट क्लासरूम, सुसज्य प्रयोगशाळा, मुला- मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, २४ तास सतर्क सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरा, २४x७ वैद्यकीय सुविधा, व्यायामशाळा, भव्य क्रीडा संकुल, वातानुकूलित सभागृह, कॅफेटेरिया, शहराच्या कानाकोपऱ्यातुन बस सुविधा उपलब्ध आहे.


उद्योग आणि शैक्षणिक महाविद्यालय यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी आम्ही आयजीटीआर, आयआयटी बॉम्बे ( ई-यंत्र रोबोटिक्ससाठी नोडल सेंटर, व्हर्च्यूअल लॅब आणि स्पोकन ट्युटोरियल ), जीआयझेड, सीएसआय, सीआयआय, टीएएसीटी, सीएमआयए, मसिआ, एनआयपीएम, आयएसटीई, आयईटीई आदी नामांकित संस्थेसोबत जोडले गेलो आहोत. तसेच महाविद्यालयात विविध प्रोफेशनल ऑर्गनायझेशनचे स्टुडन्ट चॅप्टर्स असून ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता अनेकविध उपक्रम राबवतात.

विविध क्षेत्रातील सेंटर ऑफ एक्सलन्स उदा. ई-मोबिलिटी रिसर्च अँड स्किल डेव्हलपमेंट, रेड हॅट, एडब्ल्यूएस अकॅडमी, हनीवेल, पाउलो अल्टो नेटवर्क्स, सेलोनीस, ज्युनिपर नेटवर्क्स इत्यादी केंद्रांची संलग्नता असल्यामुळे विद्यार्थ्याचे कौशल्य विकसित होते. सेंटर फॉर टेक्निकल स्किल्स अँड आंत्रप्रिनरशिप या केंद्रांतर्गत स्टार्ट-अप इन्क्युबेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना संस्थेच्या सहकार्याने त्यांच्या कल्पनांवर काम करण्याची आणि इन्क्युबेशनची संधी प्राप्त करून देण्यात आली आहे. आमच्या विद्यार्थ्यांच्या काही स्टार्टअप्सना इंटरनॅशनल सेंटर फॉर आंत्रप्रिनरशिप अँड टेक्नॉलॉजी ( आयक्रिएट इन्क्युबेशन सेंटर, अहमदाबाद ) आणि मराठवाडा असोसीएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर ( मसिआ ) तसेच मराठवाडा एक्सलरेटर फॉर ग्रोथ अँड इन्क्युबेशन कौन्सिल ( मॅजिक ) यांच्या कडून निधी देखील मिळाला आहे. स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी आमच्या संस्थेने कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणेच्या भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इन्होवेशन, आंत्रप्रिनरशिप अँड लिडरशिप तसेच केपीआयटी टेक्नॉलॉजीज लिमिटेड,पुणे  यांच्याशी सामंजस्य करार केले आहे. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडवण्यासाठी आम्ही कायम तत्पर आणि कटीबद्ध राहू.

**प्राचार्य डॉ. उल्हास बी. शिंदे**
**सी.एस.एम.एस.एस.**
**छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग**

# ज्येष्ठ पत्रकार जोसेफ पिंटो यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** ज्येष्ठ पत्रकार आणि वृत्तपत्र विद्या क्षेत्रातील ख्यातनाम प्राध्यापक, विद्यार्थीप्रिय शिक्षक जोसेफ पिंटो यांचे अल्पशा आजाराने शनिवारी पहाटे पुण्यात निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या मागे दोन भाऊ व एक बहीण, तसेच पत्नी व कन्या, जावई असा परिवार आहे.

दीपक फर्टिलायझर्समध्ये काही काळ वरिष्ठ पदावर नोकरी केल्यानंतर ज्यो पिंटो यांनी वृत्तपत्र क्षेत्रात आपला ठसा उमटविला. सुरुवातीला संडे ऑब्झर्व्हर या दैनिकात काम केल्यानंतर त्यांनी गोमंतक टाईम्स व महाराष्ट्र हेरॉल्ड या दैनिकांमध्ये मुख्य संपादक म्हणून काम केले. संपादकीय क्षेत्रात स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या पिंटो यांनी वृत्तपत्र विद्या क्षेत्रात ज्ञानदानाचेही कार्य केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागासह ( रानडे इन्स्टिट्यूट ), सिंबायोसिस महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, नानासाहेब परुळेकर महाविद्यालय इत्यादी अनेक वृत्तपत्र विद्या महाविद्यालयांमध्ये शिस्तप्रिय परंतु अतिशय लोकप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले विद्यार्थी वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये आणि वृत्तवाहिन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर काम करत आहेत.

पिंटो यांनी स्वतःच्या महाविद्यालयीन जीवनापासूनच लोकविज्ञान संघटना या संस्थेमार्फत सामाजिक कार्य केले. वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी वृत्तपत्र क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ पत्रकार, त्यांचे विद्यार्थी व स्नेहीजन उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागासह पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि पुणे पत्रकार प्रतिष्ठान यांच्या वतीने पिंटो यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद




# वैजापूर नगर पालिकेचे विक्रमी वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** "ठेवू आपण एकच लक्ष्य--लावू सर्वत्र वृक्षच वृक्ष"झाडे लावू या-झाडे जगऊ या-झाडांचे रक्षण आपण करू या" अशा घोषणा देत, शहरातील विविध बारा ठिकाणी पालिकेच्या राखीव जागी शहरातील लोकप्रतिनिधी, नागरिक, अधिकारी,पदाधिकारी, शालेय विद्यार्थी, शिक्षक,   एन, सी,सी छात्र तसेच त्या-त्या वसाहतीतील नागरिक,महिला बचत गट  वसाहतीतील महिला ,पुरुष यांनी पालिकेने जाळी लावून संरक्षित केलेल्या १२ठिकाणी शनिवार( ता,२९ )रोजी दहा हजारांवर रोपटी लावून ती जगविण्याचा संकल्पही केला. जिल्हाधिकारी अस्तिकुमार पांडे यांच्या मार्गदर्शन खाली वैजापूर पालिकेचे  प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत( राजपूत ) यांनी पुढाकार घेतलेल्या या महावृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ प्रा,आ, रमेश पा,बोरनारे,माजी नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, माजी उपनगराध्यक्ष साबेरखान,तहसीलदार सुनील सावंत,व मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत ,स्वच्छता दूत धोंडीराम ठाकूर यानी स्टेशन रस्त्यावरील अयोध्यानगरी येथे वृक्षारोपनाने केला,या स्थळी हजार रोपटी लावण्यात आली प्रास्ताविक भागवत बिघोत यांनी केले सूत्र संचलन व आभार धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.

सकाळ दहा ते दुपार बारा वाजेपर्यंत शहरातील विविध भागात दहा हजारांवर रोपटी लावण्यात आली, ह्या सर्व रोपट्याच्या चारही बाजूला कुंपण रुपी जाळी लावण्यात आलेली आहे,मुख्याधिकारी यांनी सांगितले की आणखी पन्नास हजार रोपटी शहराच्या विविध भागात दुसऱ्या,व तिसऱ्या टप्प्यात लावण्यात येणार आहेत. लावलेल्या रोपट्यांना ठिबक पध्दतीने पाणी देण्याची व्यवस्था पालिका करणार आहे. या प्रसंगी माजी नगरसेवक स्वप्नील जेजुरकर, इम्रान कुरेशी,सखाहरी बर्डे,ज्ञानेश्वर ,टेके,  तालुका शिवसेना प्रमुख राजेंद्र साळुंके, शिवसेना शहर प्रमुख पारस घाटे,अंकुश हिंगे,सीताराम पाटील, उपमुख्याधिकारी राहुल साठे,अभियंता सुरेश चिमटे, प्रमोद निकाळे,  मोदानी,विष्णू आलूले, रमेश त्रिभुवन ,वाल्मिक शेटे,शांताराम मगर पालिकेच्या शाळेचे शिक्षक, सेंट मोनिका शाळेचे प्राचार्य किशोर साळुंके,श्री गणवीर,गोठूसिंह राजपूत यांच्या सह महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# वाढते अपघात टाळण्यासाठी पोलिसांकडून जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**हर्सूल :** सावंगी पेट्रोल पंप येथे प्रवासादरम्यान आलेल्या वाहनातील चालक यांना समृद्धी महामार्गावर प्रवास करताना कोणत्या दक्षता घेणे आणि नियम पाळणे गरजेचे आहे. त्याबाबत खालील प्रमाणे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक जाधव एस. आय. मोहिते यावेळी यांनी प्रबोधन केले. वाहन चालवताना नेहमी चालकांनी तसेच इतर प्रवाशांनी स्वीट बेल्ट चा वापर करावा वाहन महामार्गावर अन्यापूर्वी वाहनाची हेडलाईट ब्रेक लाईट टायरमधील हवेचा दाब ब्रेक थंडीत बाबतीत बाबींची तपासणी करावी महामार्गावरील दुसऱ्या वाहनाला त्यांच्या उजव्या बाजूने ओव्हरटेक करावी व नेहमी निर्धारित केलेल्या नियंत्रणात वेगात चालवावे जळवा आणि नेहमी तीन महामार्गीपैकी रस्त्याच्या डाव्या बाजूच्या मार्ग के मधूनच चालावे कार यासारखे वाणी मधल्या मार्गीचे मधून योग्य वेगा चालवणे महामार्गावर कोठे आपल्या ताब्यातील वाहने पार करू नये महामार्गावर कुठे जवळच खाद्यपदार्थ खाऊन उरलेले अन्न प्रस्ताव फेकू नये त्यामुळे वन्यप्राणी कुत्रे माकडे यासारखे प्राणी रस्त्यावर येतात आणि अपघात होतो. वाहन चालवताना मोबाईलवर संभाषण करू नये टायर मधील हवा तपासून साध्या हवे ऐवजी नायट्रोजन हवा भरावी सतत वाहन चालवल्याने सारखा प्रकार घडवून अपघात होऊ शकतो, अशा परिस्थितीत उद्‌भवल्यास काय करावे याबाबत मार्गदर्शन.

# पैठण मार्गावर छत्रपती संभाजीनगर डेपोच्या बसेस सोडण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकिन :** पैठण आगारची दररोज बस सेवेचे नियोजनामध्ये अनिवार्यमतपणा दिसून येत असून कोणत्याच प्रकारची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत असून वेळेवर बस सोडविण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी व प्रवाशांनी निवेदनाव्दारे प ध चव्हाण वि.भा वाहतूक अधिकारी यांच्याकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की पैठण आगारातून दर पंधरा मिनिटांत पैठण -छत्रपती संभाजीनगर बस सोडण्यात फलक बस्थानकात लावलेले असून सुद्धा फक्त हे शोभेलाच फलक तर लावले नाही ना असा प्रशन निर्माण होत आहेत. पैठण तालुक्यातील छोटे-मोठे गांव खेड्यापाड्यातले कायम अपडाऊन करणारे विद्यार्थी,कामगार,खाजगी, शासकीय नोकरी करणारे नागरिकांना उशिरा बस सोडण्यामुळे ते वेळेवर पोहचू शकत नाही. तरी पैठण आगर डेपोचे बसेस पैठण आगर यांनी वेळेवर दर १५ मिनिटांनी सोडण्यात यावे अशी मागणी डेली अपडाऊन ग्रुप तसेच प्रवाशी व विद्यार्थीकडून निवेदनाव्दारे केली आहे

# बाजार सावंगी येथे देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत रोगनिदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह निमित्ताने डॉः भागवत कराड आमदार प्रशांत बंब यांच्या संयुक्त विद्यमाने निमाई हॉस्पिटलच्या वतीने बाजार सावंगी ( ताः खुलताबाद ) येथे शुक्रवार ( ताः२८ ) सकाळी 11 ते दुपारी तीन या वेळात मोफत रोगनिदान शिबिर घेण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य व स्वास्थ्य निरोगी रहावे असा हेतू होता. शून्य ते अठरा वर्ष वयोगटातील मुले मुलींच्या आजाराबाबत थंडी ताप डोळे तपासणी सर्दी खोकला पडसे डोकेदुखी शारीरिक अशक्तपणा वय शरीर उंची याचे साम्य अशा विकारांबाबत 158 रुग्णांची विनामूल्य तपासणी करण्यात आली तसेच औषधीचेही वाटप केले तर काही रुग्णांना तपासणी अंती उपचाराचा सल्ला दिला. वैद्यकीय तपासणी उपचार व सल्ला यासाठी डॉः गणेश वाघ डॉः वैभव निकम डॉः विकास गोरे शुभम सोन गिरे गायत्री दुसाने दीपिका शिंदे यांनी काम पाहिले. शिबिर यशस्वी करण्यास भाजपा जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर नलावडे माजी पं. स. उपसभापती प्रभाकर शिंदे भिकन घुले सुखदेव नलावडे लक्ष्मण जाधव आनंदा काटकर प्रकाश दांडगेसह ग्रामस्थ मुले व मुली यांची उपस्थिती होती.





सर्व प्रकारच्या छत्र्या
रेनकोट
स्टेशनरी
स्कूल बॅग
कंपास व टिफीन बॉक्स
वॉटर बॉटल
सर्व प्रकारचे बोर्ड गेम्स
टॉईज इत्यादी
AT अजय ट्रेडर्स
ठोक विक्रेता

गांधी पुतला, शहागंज, छत्रपती संभाजीनगर (म.हा.) -431001
9423393145, 9834243932

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर